
अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक


# मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी २०१४ | किंमत १५ रुपये

## सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

## ‘मृत्युंजय’, ‘छावा’ आणि ‘युगंधर’ ह्या साहित्यकृती आता नवीन स्वरूपात









'परीघ' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याच्या प्रसंगी सौ.सुधा मूर्ती, सौ.वीणा देव व सौ. उमा कुलकर्णी.



'रूचिरा' भाग १ - ५० वी आवृत्ती व 'रूचिरा' भाग २ - २१ वी आवृत्ती प्रकाशन सोहळा ख्यातनाम पत्रकार श्री. विजय कुवळेकर व श्रीमती शोभा बोंद्रें यांच्या हस्ते पार पडला.




'सचिन दिलखुलास' या कार्यक्रमात श्री. सुधीर गाडगीळ व सचिन पिळगांवकर.

DIGITAL EDITION
SAVE PAPER SAVE TREE

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जानेवारी २०१४ ◆ वर्ष चौदावे ◆ अंक पहिला

## – अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्यवार्ता | ८ |
| दखल | ३८ |
| पुरस्कार | ४० |
| पुस्तक परिचय | ५४ |
| भेटीगाठी | ८२ |
| अभिप्राय | ८८ |
| श्रद्धांजली | १०८ |
| बालनगरी | ११० |



संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
मेहता पब्लिशिंग हाऊस



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग)** - २२७/२४३

E-mail : info@mehtapublishinghouse.com


**वार्षिक वर्गणी १०० रु., तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*




# नववर्षाचे स्वागत

इ.स. २०१४ चे स्वागत करताना गेल्या वर्षातील वाटचालीची धावती चित्रमालिका समोर आल्याशिवाय राहत नाही. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या संदर्भातही २०१३ मधील बऱ्याच गोष्टींची नोंद करता येईल. गेल्या वर्षी मेहता पब्लिशिंगने खऱ्याखुऱ्या अस्सल प्रादेशिक ई-बुकचे लाँचिंग केले. गेली तीन-चार वर्षे त्या दिशेने प्रयोग चालू होते.

इंग्लिशमध्ये वेगवेगळ्या मातबर प्रकाशन संस्थांना गुगल, ॲमेझॉन वगैरेंच्या सहकार्याने ई-बुक क्षेत्रात स्वैरसंचार करणे सुलभ होते. परंतु भारतात मराठी, हिंदी, तमीळ, तेलुगु, मल्याळी, कानडी, गुजराती, बंगाली वगैरे भाषांतील एकूण ग्रंथव्यवहार सीमित आणि प्रत्येक भाषेची लिपी वेगळी; यामुळे ई-बुकमध्ये त्या लिप्यांमधील वेगवेगळे फाँट्स आणणे हे प्रचंड आव्हान होते. त्यातील तांत्रिक समस्यांना अंतच नव्हता. एकेक समस्या वा अडथळा दूर करीत सर्वांना सुलभ ठरेल अशा प्रकारे ई-बुकची निर्मिती करणे मोठे खर्चाचे आणि कौशल्याचे काम होते. जे कोणी ई-बुक्समधले तज्ज्ञ म्हणून ओळखले जात, त्यांना इंग्लिशमध्ये काम करण्याचा अनुभव असे. प्रादेशिक भाषांतील किचकट लिप्या आणि त्यातील उच्चार, प्रत्यक्ष लेखन आणि उच्चार यातील गुंतागुंती, जोडाक्षरे वगैरे अडचणींपुढे त्यांची मती कुंठीत होई आणि ते हा व्याप काही आमच्या आटोक्यातला नाही म्हणत हात झटकून मोकळे होत. मराठीतील अर्धा र -पूर्व, मार्ग, सुऱ्या, कैऱ्या, दृष्टी, सृष्टी, चमत्कृती, प्रकृती, जाड्या, सुद्धा शस्त्र, सहस्त्र, आक्रित,कार्यक्रम वगैरेंचा घोळ कसा निस्तरावा हे कळत नसे. भारतात बोलल्या-वाचल्या जाणाऱ्या घटनामान्य २२ भाषांमधील एकूण ग्रंथव्यवहाराची शक्यता मोठी असल्याने एक भावी बाजारपेठ म्हणून भारताकडे पाहण्याचा मायक्रोसॉफ्ट, गुगल, ॲमेझॉन वगैरेंनी निर्णय घेतल्याने प्रादेशिक भाषांतील लिप्यंतरांचा प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या तज्ज्ञांना कामाला लावले,

त्यासाठी प्रचंड आर्थिक तरतुदी करताना मागेपुढे पाहिले नाही. भारत सरकार जे करू शकत नाही, करू शकले नाही ते पेलण्याचे मायक्रोसॉफ्ट, गुगल यांनी ठरवले. मायक्रोसॉफ्ट, गुगल यांनी ठरवले. मायक्रोसॉफ्टने या प्रयत्नात आघाडी घेतली असावी असे वाटते.

अर्थात मायक्रोसॉफ्टचे प्रयत्न हे एका व्यापक परिप्रेक्ष्यातून चाललेले आहेत. ते केवळ ई-बुकशी संबंधित नाहीत; तर आसामी, बंगाली, मराठी, हिंदी, कोकणी, गुजराथी, उडिया, पंजाबी, उर्दू, नेपाळी वगैरे १४ भारतीय भाषांतून संगणकावर काम करणे सुलभ व्हावे म्हणून मायक्रोसॉफ्ट इंडिया कंपनीने भाषा हा प्रकल्प हाती घेतला असून सरकार, शिक्षणक्षेत्र, संशोधन संस्था, स्थानिक स्वतंत्र सॉफ्टवेअर विक्रेते, औद्योगिक उपक्रम यांना एकत्र आणले आहे. नॅशनल ई-गव्हर्नन्स अकादमीच्या अंतर्गत भारतीय प्रादेशिक भाषांतील माहिती-तंत्रज्ञान विकास केंद्राच्या वतीने शिक्षण, सरकार, उद्योग, तंत्रज्ञान या सर्वांना संगणकाद्वारे स्थानिक भाषांतून व्यवहार, आदानप्रदान करणे शक्य व्हावे, आपापल्या भाषांत संगणक हाताळत इतर भाषांमध्येही आपला संपर्क साधत राहावे या व्यापक उद्दिष्टाने मायक्रोसॉफ्ट काम करणार आहे. त्याचा फायदा प्रकाशनक्षेत्राला ई-बुक संदर्भात मिळू शकेल आणि सध्याच्या अनुवाद उद्योगाला त्याचा लाभ निश्चित होईल. सध्या भिन्न लिपीमुळे आपल्याला एक-दोन भाषांपलीकडे जाता येत नाही. या संशोधनाने भाषाभाषांतील आदानप्रदान करण्यासाठी एकमेकांना दुसऱ्या भाषा आत्मसात करण्याची गरज उरणार नाही. कुठलेही मराठी पुस्तक या प्रकल्पाच्या माध्यमातून चौदा भाषांत उपलब्ध होऊ शकेल, एक लेखक वा प्रकाशन संस्था म्हणून ही केवढी मोठी सिद्धी ठरेल याची केवळ कल्पनाही किती थ्रिलिंग वाटते!

हे कधी घडेल याची आज तरी प्रतीक्षा करणे भाग आहे.

मेहता पब्लिशिंगने स्वत:चे मराठी ई-बुक तंत्रज्ञान विकसित करून सुमारे आपली दोनशे पुस्तके संकेत स्थळावर उपलब्ध केली आहेत. आणखी तीन-चार हजार पुस्तके लवकरच वाचकांना मिळू शकतील. भारतातील प्रकाशक संस्थांमध्ये आपण घेतलेल्या या आघाडीचा रास्त अभिमान प्रत्येक मराठी भाषकाला सुखावणारा वाटेल यात शंका नाही.

अष्टपैलू चित्रपट अभिनेते सचिन पिळगांवकर यांच्या 'हा माझा मार्ग' या आत्मकथनाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मुंबई व पुणे येथे झालेले कार्यक्रम खूपच भव्य आणि देखणे झाले. अमिताभ बच्चन यांच्यासारख्या अग्रगण्य कलावंताची उपस्थिती, मुलाखत, दृक्श्राव्य सादरीकरण यांचा मेळ घालणाऱ्या 'दिलखुलास सचिन'ला मिळालेला प्रतिसाद दिलासा देणारा होता.

'रुचिरा' या मराठीतील अग्रगण्य पाककलांवरील पुस्तकाच्या ५०व्या आवृत्तीच्या

निमित्ताने झालेला कार्यक्रमही कौटुंबिक जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेला होता. ओगले परिवार आणि मेहता परिवार यांचे नाते किती दृढ आहे याचा त्यातून प्रत्यय आला. लेखक आणि प्रकाशक यांचे नाते व्यावसायिक व्यावहारिक नात्यापुरतेच सीमित असते असे नाही. ते त्या सीमा ओलांडून जिव्हाळ्याचे, प्रेमाचे, परस्पर आपुलकीचे स्वरूप धारण करते. अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून ते आपल्या मनावर ठसल्याशिवाय राहत नाही. मेहता पब्लिशिंग हाऊसने आपल्या लेखक सहकाऱ्यांशी असेच मैत्रीचे सेतू बांधलेले आहेत. अनेक परदेशी प्रकाशन संस्थाही आपला नव्या आगामी पुस्तकांच्या प्रकाशनाबाबत मेहतांना अग्रक्रम देतात; त्यामुळे केवळ मराठीच नव्हे तर भारतीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही मेहतांची ओळख स्थिरावत आहे. अनेकविध ज्येष्ठ लेखकांचा आमच्यावरील लोभ आणि विश्वास आमचे आत्मबल वाढवत असते.

२०१३ मध्ये आमच्या ग्रंथदालनाच्या आणि कार्यालयीन वास्तूच्या विस्तारीकरणाचाही योग आला. त्यामुळे वाचक-ग्राहकांना नवनवे ग्रंथ निवांतपणे बघता येतील. गावेगावांच्या ग्रंथप्रदर्शनांमधील मेहतांच्या स्टॉलवर रसिक वाचकांची चांगलीच वर्दळ असते. वाचकांचे समाधान आणि प्रेम ही पुण्याई अशीच कायम राहावी ही कामना मराठी ग्रंथजगतच्या चौदाव्या (खरेतर अठराव्या) वर्षातील हा पहिला अंक सादर करताना करीत आहे. जानेवारी १९९७ पासून ग्रंथजगतचा आरंभ झाला. परंतु प्रेस रजिस्ट्रारच्या नव्या धोरणामुळे जानेवारी २००१ पासून पुन्हा प्रथम अंक असे गृहीत धरून नव्याने गणती सुरू केली गेली.

२०१४ मध्ये आपल्या अनुभवाच्या कक्षा विस्तृत करणाऱ्या आकर्षक आशयसंपन्न पुस्तकांचा नजराणा आपल्याला बघायला मिळेल.





नवे कोरे

# मृत्युंजय

## शिवाजी सावंत




**किंमत : ३७५/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

कर्णाच्या दानशूरत्वाला तोड नाही हेच खरं! 'मृत्युंजय' एवढी अमाप लोकप्रियता कुठल्याही मराठी कादंबरीकाराच्या पहिल्याच कादंबरीला लाभलेली नाही.

भारताच्या राजकीय पुनरुत्थानाबरोबरच महाभारताचे आणि विशेषत: त्यातील प्रसंगांचे आणि व्यक्तिरेखांचे नव्या, व्यापक, मानवतावादी दृष्टिकोनातून साहित्यिक पुनरुज्जीवन झाले. कुंतीपुत्र राधेयाविषयी तर विशेष आस्था व्यक्त झाली आणि कुसुमाग्रजांच्या 'कौंतेय'सारख्या अनन्यसाधारण साहित्यकृतींचा लाभही मराठी साहित्याला याच आस्थेतून झाला. 'कौंतेय'ने नाट्यक्षेत्रात जी यशस्वी कामगिरी केली, त्यासारखी कामगिरी तशा यशस्वी तऱ्हेने कादंबरीच्या क्षेत्रात 'मृत्युंजय'ने केली आहे, हे आता सर्वमान्य झाले आहे.

'अनिवार्य नियतीचं गरगर फिरणं महान संयमानं सहन करीत जगायचं असतं,' हे कर्णाचं सांगणं आहे. कृष्णाप्रमाणेच कर्ण पौरुष चैतन्याचे आणि वर्णनिर्भयतेचे समर्थ आविष्करण आहे. जो कोणी जीवनसंघर्षात पिचला आहे, त्याच्या संघर्षात आणि पिचण्यातसुद्धा पुरुषार्थी आणि शक्तिशाली 'जीवन' सामावले आहे, हा कर्णाचा तेजस्वी संदेश आहे. पांडवांच्या विजयाचे डांगोरे फिके पाडणारा हा संदेश आहे; मौनाच्या विलक्षण रूपांत! या मौनाच्याच जोरावर मृत्यूच्या महाद्वारातसुद्धा जीवनाचाधुंद विजय कर्णाने अनुभविला. म्हणूनच त्याच्या या भावकथेचे नावही आहे, 'मृत्युंजय' हेच!



# साहित्य वार्ता

## ‘सदाबहार सचिन’

मेहता पब्लिकेशन्सतर्फे आयोजित ‘सचिन दिलखुलास ’ या कार्यक्रमात सुधीर गाडगीळ यांनी सचिनशी साधलेल्या संवादातून हरहुन्नरी अभिनेता, सुरेल गायक, समजूतदार सहकारी आणि सच्चा माणूस... सचिन शरद पिळगावकर या व्यक्तिमत्त्वाची अनेकविध रूपे समोर उभी राहिली.

वयाच्या पाचव्या वर्षी ‘हा माझा मार्ग एकला’ या चित्रपटासाठी डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते मिळालेला राष्ट्रपती पुरस्कार... पं. नेहरूंनी स्वत:च्या कोटाचा गुलाब काढून देत दिलेला आशीर्वाद... संजीवकुमार, अमिताभ बच्चन, साहिर लुधियानवी यांसारख्या प्रतिभावंतांचा स्नेह... वडिलांचा मिस्कीलपणा... अशा कितीतरी जिव्हाळ्याच्या आठवणींचा कप्पा सचिनने उघडला. सचिन म्हणाले, “श्रीकांत मोघे, ग. दि. माडगूळकर अशा अनेक वडीलधाऱ्यांच्या सहवासातून मी घडलो. वडिलांनी माझ्यातल्या अभिनेत्यासह दिग्दर्शकालाही वळण दिले. वयाच्या चोविसाव्या वर्षी मी त्यांच्यामुळे दिग्दर्शक बनू शकलो. अभिनेत्री मीनाकुमारी या माझ्यासाठी ‘मीनाआपा’ होत्या. त्यांनी मला उर्दूचे धडे दिले.” मुनव्वर राणा आणि साहिर लुधियानवी यांच्या गझलांचे आवडते शेर सचिनने उर्दूचा लहेजा लीलया सांभाळत म्हणून दाखवले. सुप्रियासोबतच्या सहजीवनाविषयी गाडगीळ यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सचिन म्हणाला, “एकमेकांचा सदोदित आदर करणे, हाच आमच्या सहजीवनाचा पाया आहे. आजही प्रत्येक गोष्टीत मी तिचा सल्ला घेत असतो. कुठलेही लहानमोठे काम मी तितेकच जीव ओतून करतो. रसिकांची भरभरून मिळणारी दाद मला कायम नवे काही करण्याची ऊर्जा देते. मी कायम काळाबरोबर राहतो. दिग्दर्शक-अभिनेता, म्हणून आजही मी शिकतोच आहे, मी अजूनही विद्यार्थीच आहे.” अशी नम्र कबुली सचिनने दिली.

## ➾ 'मायक्रोसॉफ्ट'तर्फे १४ भाषांतून स्थानिक भाषा संगणन सुविधा

स्थानिक भाषांतून संगणकाला (कॉम्प्युटिंग) उत्तेजन देण्यासाठी, तसेच माहिती व संपर्क तंत्रज्ञानाचे फायदे सर्वसामान्यांपर्यंत पोचविण्यासाठी मायक्रोसॉफ्ट इंडिया कंपनीने 'भाषा' हा प्रकल्प हाती घेतला आहे. कंपनीने आसामी, बंगाली, गुजराती, हिंदी, कन्नड, कोकणी, मल्याळम, मराठी, उडिया, पंजाबी, तमीळ, तेलुगू, उर्दू व नेपाळी अशा १४ भारतीय भाषांतून वापरता येणारी उपकरणे व उत्पादनांचा संग्रह पुरविला आहे.

भारतीय भाषांत संगणकास उत्तेजन व वेग मिळवून देण्यासाठी 'मायक्रोसॉफ्ट' प्रयत्नशील असून, त्याचाच भाग म्हणून 'भाषा' या सहयोगात्मक कार्यक्रमांतर्गत कंपनीने सरकार, शिक्षण क्षेत्र, संशोधन संस्था, स्थानिक स्वतंत्र सॉफ्टवेअर विक्रेते व विकसक आणि औद्योगिक संघटना यांना एकाच व्यासपीठावर आणले आहे. नॅशनल ई-गव्हर्नन्स ॲकॅडमीच्या अखत्यारीतील 'द सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर आयटी इन इंडियन लॅंग्वेजेस' या केंद्राच्या कार्यकारिणीत 'मायक्रोसॉफ्ट'ची नुकतीच सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. शिक्षणक्षेत्र व विकसकांसमवेत संपर्क दृढ करण्यासाठी 'मायक्रोसॉफ्ट' भारतीय भाषांतील संगणकांसाठी भक्कम परिसंस्था उभारण्यासाठी साधने व साधनसंपत्ती पुरवत आहे, असे मायक्रोसॉफ्ट इंडियाचे प्रमुख उत्पादन विपणन व्यवस्थापक मेघश्याम करणम यांनी सांगितले.

ते म्हणाले, ''भारतीयांना आपापल्या मातृभाषेतून संगणक वापरण्यास सक्षम करून डिजिटल विभाजनाची दरी बुजविण्यामुळे देशात माहिती व संपर्क तंत्रज्ञानाचे फायदे मोठ्या प्रमाणावर पोचविण्यास मदत होईल. त्यासाठीच भारतीय भाषांतून संगणन सुविधा साध्य करण्यास व भारतात संगणकांच्या वापरास चालना देण्यास मायक्रोसॉफ्ट कंपनी प्रयत्नशील आहे.''

## ➾ रवींद्र धारिया 'वनराई'चे अध्यक्ष

पर्यावरण, वृक्षारोपण तसेच ग्रामीण विकास यासाठी झटणाऱ्या 'वनराई'चे नवे अध्यक्ष म्हणून रवींद्र धारिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी वनराई संस्थेच्या संसदीय मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. वनराईच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर तर डॉ. विजय केळकर, डॉ. विजय भटकर, डॉ. माधव गाडगीळ आणि डॉ. भूषण पटवर्धन हे सदस्य आहेत.

## ➾ स्मार्टफोन देणार भूकंपाची पूर्वसूचना

रोजच्या जीवनात विविध प्रकारे उपयोगी ठरणारे स्मार्टफोन पुढील वर्षापासून भूकंपाची पूर्वसूचनाही देऊ लागतील. संशोधकांनी नुकतेच यासाठीचे ॲप तयार केले असून, ब्राझीमधील रिओ दि जानेरो येथे झालेल्या 'वर्ल्ड सायन्स फोरम' मध्ये

हे ॲप सादर करण्यात आले.

'कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी' या भूकंपशास्त्र प्रयोगशाळेचे संचालक प्राध्यापक रिचर्ड ॲलन यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांच्या गटाने हे ॲप विकसित केले आहे. 'कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी'मध्ये नैसर्गिक आपत्तींची पूर्वसूचना देणारी यंत्रणा विकसित करण्यासाठी संशोधन चालू आहे. कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर जेरी ब्राऊन यांनी यावर्षी सप्टेंबर महिन्यात अशा प्रकारची यंत्रणा विकसित करण्यासाठी विधेयकही मंजूर केले होते. या संशोधनाच्या आधारेच हे ॲप तयार झाले असून भूकंपाचा धक्का बसण्यापूर्वी सुमारे एक मिनिट हे ॲप स्मार्टफोन्स युजरना सावधानतेचा इशारा देईल. भूकंप केंद्रापासून दूर असलेल्याना मात्र केवळ काही सेकंद आधी हा इशारा मिळू शकेल. या ॲपमध्ये भूकंपाचा धक्का बसण्यापूर्वी निर्माण होणारी ऊर्जालहर (प्रायमरी वेव्ह) पकडण्यात येईल व तिचे मोजमाप करून भूकंपाची पूर्वसूचना मिळू शकेल.

या ॲपच्या तंत्रज्ञानामध्ये अल्गोरिथमचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे भूकंपाचा धक्का केंद्रापासून आसपासच्या किती क्षेत्रामध्ये जाणवणार आहे, याची माहिती उपलब्ध होईल व संबंधित क्षेत्रामधील स्मार्टफोन युजर्सना 'अलर्ट' मिळेल. या अलर्टसाठी भूकंप केंद्रावर फोन असणे आवश्यक असल्याचे ॲलन यांनी सांगितले. या फोनमध्ये भूगर्भातील हालचाली टिपता येतील व त्याचे संदेशवाहन अन्य ठिकाणी करता येऊ शकेल. एकाच वेळी अनेक फोनमध्ये या हालचाली टिपल्या गेल्यास भूकंपाचे अचूक केंद्र व त्याचे तीव्रता समजू शकेल असेही ते म्हणाले.

## ✍ विविध विषयांवरील महेश एलकुंचवार यांचे विचार

'भाषा टिकवण्याची जबाबदारी सरकारवर कशी टाकता? त्यात सरकार काय करणार? अखेर भाषा आणि संस्कृती टिकविणे ही लोकांची जबाबदारी असते', असे स्पष्टपणे बजावतानाच ज्येष्ठ साहित्यिक आणि नाटककार महेश एलकुंचवार यांनी मराठी मध्यमवर्गाच्या दुटप्पीपणावर नेमके बोट ठेवले.

हल्लीच्या महाराष्ट्रात मला विचारवंत दिसत नाही, असे सांगून त्यांनी महाराष्ट्राच्या वैचारिक दैन्यावस्थेबद्दलही खंत व्यक्त केली.

'लोकसत्ता'च्या 'आयडिया एक्स्चेंज' उपक्रमात बोलताना त्यांनी मराठी साहित्य, भाषा, संस्कृती आणि मुख्य म्हणजे मराठी नाटक अशा विविध विषयांवर दिलखुलास आणि तितक्याच थेट परंतु संयतपणे आपली मते मांडली. होळीपासून वाडा चिरेबंदी आणि अगदी अलीकडच्या सोनाटा या नाटकांनी मराठी नाट्यविश्व अधिक गहिरे करणाऱ्या एलकुंचवार यांनी या वेळी लेखक आणि समाज यांच्या नातेसंबधांचा नकाशाच उलगडून दाखविला. ते म्हणाले, 'माझा राग मध्यमवर्गावर

आहे. मुलांना इंग्रजी शिकवा, पण घरात मराठी का बोलत नाही? संस्कृती, भाषा टिकवणे ही काय सरकारची जबाबदारी आहे? सरकारनेच सगळे काही करावे हा सांस्कृतिक आळशीपणा आपल्याकडे आहे,' अशी चपराकही त्यांनी लगावली. 'विचारवंत या प्रकाराची मला भीती वाटते. व्यावसायिक यश मिळाले की त्या कलावंताचे मत छापले जाते. असे दहा वेळा छापून आल्यावर तो विचारवंत होतो,' असे निरीक्षण नोंदवून ते म्हणाले, 'हल्ली मला महाराष्ट्रात विचारवंत दिसतच नाहीत. ज्यांची राजकीय आणि सामाजिक भूमिका निश्चित आहे अशा लेखकाने मूलभूत स्वरूपाचा विचार द्यायचा असेल तरच मत व्यक्त करावे. सगळ्या कलावंतांना अशी भूमिका घेता येत नाही.'

आपल्या नाटकांनी मराठीच नव्हे, तर जागतिक रंगभूमीवर आपली नाममुद्रा कोरणाऱ्या या नाट्य-अवलियाने या वेळी आपली नाट्यनिर्मितीची प्रक्रियाही उलगडून दाखविली. 'नाटक हा पोहण्यासारखा वैयक्तिक अनुभव नसतो, तर तो क्रिकेटसारखा सर्वसमावेशक असतो. एकच नाटक वेगवेगळ्या पद्धतीने रंगमंचावर सादर होते, त्यामुळे त्याचा अनुभव हा एकार्थ राहत नाही. थोरपणाचा कोणताही भाव आणि आव न आणता हे समजावून सांगत असतानाच, 'माझ्याच नाटकाचे प्रयोग पाहण्याचे धैर्य मी करीत नाही. कारण प्रयोग पाहताना लेखनातील त्रुटी जाणवतात,' असेही वऱ्हाडी मनमोकळेपणाने सांगून सध्याच्या आपल्या 'साध्यासुध्या' जगण्यावर तितकेसे साधेसुधे नसणारे भाष्य करीत होते.

### राघवेंद्र जोशी यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन

'प्रेम ही काही चिरंतन टिकणारी गोष्ट नाही. ती कधी ना कधी संपतेच. प्रेम संपल्यावर नाते संपवले असे करता येत नाही. कोणाच्याही भावविश्वाची इन्शुरन्स पॉलिसी काढण्याची सोय नाही. त्यामुळे बाईने आजच्या काळात स्वावलंबीच झाले पाहिजे. आर्थिक स्थैर्य असलेली स्त्री एकटी स्वाभिमानाने जगू शकते,' असे मत साहित्यिका मेघना पेठे यांनी व्यक्त केले.

शब्द पब्लिकेशनच्या राघवेंद्र भीमसेन जोशी यांच्या 'गाणाऱ्याचे पोर' या आत्मकथनाचे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक हरिश्चंद्र थोरात आणि पेठे यांच्या हस्ते झाले. शब्द पब्लिकेशनचे येशू पाटील यावेळी उपस्थित होते. पाटील यांनी पुस्तकाच्या रॉयल्टीतून अपेक्षित १३,७५० रुपयांचा चेक सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर यांच्या संस्थेला दिला. राघवेंद्र यांनी या वेळी भीमण्णांचा मारवा गायला आणि उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

वडिलांचे कर्तृत्व एका बाजूला राहून पाहिल्याचे सांगत जोशी म्हणाले, 'भीमसेनांवर खूप काही लेखन झाले असले, तरी त्यांचे पुण्याला येण्यापूर्वीचे आयुष्य आणि त्यांची पहिली पत्नी, माझी आई याविषयी काही लिहिले गेले नाही.

नवे कोरे




# युगंधर

**शिवाजी सावंत**

**किंमत : ४८०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

हजारो वर्षांपासून श्रीकृष्ण भारतीय मन व्यापून दशांगुळे उरला आहे. भारतीय समाज व संस्कृती यांवर त्याचा अमीट असा ठसा उमटलेला आहे.

'श्रीमद्भागवत', 'महाभारत', 'हरिवंश' व काही पुराणांत श्रीकृष्णचरित्राचे अधिकृत संदर्भ सापडतात. परंतु गेल्या हजारो वर्षांत त्यावर सापेक्ष विचारांची आणि अतर्क्य चमत्कारांची पुटंच पुटं चढलेली आहेत. त्यामुळे त्याचं 'श्री'युक्त सुंदर, तांबूस-नीलवर्णी, सावळं रूपडं घनदाट झालं आहे, वास्तवापासून शेकडो योजनं दूर दूर गेलं आहे.

श्रीकृष्ण हा 'भारतीय' म्हणून असलेल्या जीवनप्रणालीचा पहिला उद्गार आहे! त्याच्या चक्रवर्ती जीवनचरित्रात भारताला नित्यनूतन व उन्मेषशाली बनविण्याचा ऐवज ठासून भरला आहे.

श्रीकृष्णाच्या जीवनसरोवरातील दाटलेलं शेवाळ तर्कशुद्ध सावधपणे अलगद दूर सारल्यास त्याचं 'युगंधरी' दर्शन शक्य आहे, हे 'मृत्युंजय'कारांनी जाणलं. आणि त्यांच्या प्रदीर्घ चिंतनातून, सावध संदर्भशोधनातून, डोळस पर्यटनातून व जाणत्यांशी केलेल्या संभाषणातून साकारली ही साहित्यकृती – 'युगंधर'!!

मात्र त्याच गोष्टीला चिकटून राहण्यापेक्षा मी या पुस्तकात त्यांच्या स्वराला चिकटून राहणे पसंत केले, हे पुस्तक लिहिताना पूर्वीचे दिवस पुन्हा जगल्यासारखे वाटले.'

'संयत शैलीने लिहिले गेलेले हे स्फोटक पुस्तक आहे,' असे मत पेठे यांनी मांडले. 'भीमसेनांनी पहिल्या पत्नीला टाकण्याने झालेल्या अपमानाची आणि अवहेलनेची पार्श्वभूमी आहे. कलावंत काही वेगळा नसतो. प्रत्येक माणूस द्वैताच्या झगड्यातील एक प्रॉडक्ट असतो, राघवेंद्र यांच्यासोबत घडलेल्याला घात म्हणावे लागते,' असे त्या म्हणाल्या.

## ➾ पुलोत्सव

''कवितेकडून काही अपेक्षा ठेवली असती, तर ती मला सोडून गेली असती. अभिव्यक्त होतानाच उत्तम संवाद झाला पाहिजे, अशी धारणा ठेवली तरच कविता साधते.'' अशा शब्दात फ. मुं. शिंदे यांनी कवितेचे गमक उलगडले.

'आशय सांस्कृतिक' तर्फे आयोजित 'पुलोत्सवा'च्या उद्घाटनाला डॉ. हमीद दाभोलकर, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, सतीश कुबेर, वीरेंद्र चित्राव, सतीश जकातदार, मिलिंद देशमुख उपस्थित होते. महोत्सवात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना मरणोत्तर आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीस 'पुलोत्सव कृतज्ञता सन्मान' प्रदान करण्यात आला. या प्रसंगी उद्धव कानडे यांनी शिंदे यांची मुलाखत घेतली.

शिंदे म्हणाले, ''कवितेकडून काही अपेक्षा ठेवली नाही. त्यामुळे हे स्थान मिळू शकले. कवी माणसाच्या जगण्यातले कंगोरे शोधतो. नवीन कवींच्या लेखनातील जाणिवा समजून घ्यायला हव्यात.''

''विनोद आणि विचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. 'पुलं'चे लेखन वैचारिक धाटणीचे होते; मात्र त्यांची शैली विनोदी होती. मराठी भाषा किती अंगांनी वाचकांपर्यंत पोचवता येऊ शकते, यासाठी पुलंच्या साहित्याचा अभ्यास झाला पाहिजे. 'पुलं'नी पाठीवर हात फिरवला नसता, तर इथपर्यंत पोचलोच नसतो. ते कवींसाठी एक तीर्थक्षेत्रच होते,'' अशी भावना फ मुं. शिंदे यांनी व्यक्त केली.

साहित्य संमेलनात दर वर्षी सीमाप्रश्नाबाबत होणाऱ्या ठरावावर ते म्हणाले, ''भाषा कधीही एकमेकींचा द्वेष करत नाहीत. सीमाप्रश्नाबाबत राजकीय पार्श्वभूमी आहे. संपूर्ण महाराष्ट्र सीमा भागातील मराठी माणसांच्या मागे उभा राहिल्यास हा प्रश्न सुटायला वेळ लागणार नाही.''

अध्यक्षाला जास्त पैसे का मिळू नयेत याविषयी ते म्हणाले, ''चाळीस वर्षांपासून साहित्याच्या माध्यमातून समाजात काम होण्यासाठी पैसे दिले जातात. पण हा प्रश्न पैशाने सुटणार सुटणार नाही. त्यासाठी समाजप्रबोधनाची गरज आहे. ते न करता दहा लाख जरी दिले तरी ते कुठे गेले हे कळणार नाही.''

''पुलोत्सवा'मुळे 'पुलं'ना अखेरचे भेटता आले. शहरातील आणि गावागावांतील

रसिकांना अभिरुची जपण्यासाठी नक्कीच अशा उपक्रमांचा फायदा होईल. दाभोलकरांची हत्या विचारांची बैठक ढासळून टाकणारी घटना आहे. या घटनेच्या वेदनेला दाभोलकर कुटुंबीय अत्यंत शांतपणे सामोरे जात आहेत, हे थक्क करणारे आहे.'' अशी भावना सोनालीने व्यक्त केली.

### मराठीवर अभिजाततेची मोहोर उमटायला हवी

'मराठी भाषेला सुमारे दोन हजार वर्षांचा प्राचीन इतिहास आहे. तसेच या भाषेला श्रेष्ठ परंपरा लाभली असल्याचे अभ्यासपूर्ण दाखले देण्यात आले असल्याने मराठी भाषेवर निश्चितपणे अभिजाततेची मोहोर उमटेल,' असा विश्वास ज्येष्ठ साहित्यिक आणि अभिजात भाषेसंदर्भातील विशेष समितीचे अध्यक्ष रंगनाथ पठारे यांनी व्यक्त केला.

राज्य सरकारतर्फे मराठी भाषेला अभिजाततेचा दर्जा का देण्यात यावा या संदर्भातील ४२३ पानांचा अहवाल नुकताच केंद्र सरकारला सादर करण्यात आला. या अहवालासाठी राज्य सरकारने पठारे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन केली होती. त्या समितीमध्ये प्रा. हरी नरके, सतीश काळसेकर, डॉ. मैत्रेयी देशपांडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. कल्याण काळे, प्रा. मधुकर वाकोडे, परशुराम पाटील, डॉ. श्रीकांत बहुलकर आदींचा समावेश होता.


या पूर्वी जूनमध्ये याच समितीने तयार केलेला अहवाल केंद्र शासनाला देण्यात आला होता. मात्र, केंद्र शासनात असलेल्या विविध प्रदेशातील सदस्यांना मराठी कळत नसल्याने हा अहवाल इंग्रजीतून देण्याची सूचना करण्यात आली होती. त्यानुसार हा अहवाल नव्याने इंग्रजीमध्ये तयार करण्यात आला आहे. हा अहवाल ४२३ पानांचा झाला असून, चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी या अहवालाचे मुखपृष्ठ तयार केले आहे.

या संदर्भात समितीचे अध्यक्ष पठारे यांनी या अहवालाविषयी सविस्तर माहिती दिली. 'या अहवालात मराठी भाषेसंदर्भात उत्तम पद्धतीने माहिती देण्यात आली आहे. मराठी भाषा अभिजात का आहे याची पुष्टी देणारे अनेक पुरावे संदर्भासह देण्यात आले आहेत. राज्य शासनाने हा अहवाल केंद्र सरकारला सादर केला असून, भाषेच्या अभिजातसंदर्भात काही महिन्यांत निर्णय जाहीर केला जाईल.'

'एखाद्या भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाचे चार नियम आहेत. या चारही नियमांच्या चौकटीत मराठी भाषा, तिची प्राचीनता आणि वैविध्य संपूर्ण योग्य आहे. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यात कोणतीही अडचण येणार नाही.' असे पठारे यांनी सांगितले.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यास केंद्र शासनाकडून मराठीच्या विकासासाठी

## नवे कोरे




# छावा

## शिवाजी सावंत

**किंमत : ४८०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

'राजा शिवाजी' हा निर्विवाद सिंहपुरुष होता.
परंतु शिवपुत्र 'संभाजी' हाही एक छावाच होता.
महाराष्ट्राला हे नव्याने; पण पुरेपूर उमजले आहे.
'छावा'च्या जोरदार स्वागताने ते सिद्धही झाले आहे. एक-दोन नव्हे; तर एकाचवेळी पाच आघाड्यांवर निकराची पंजेफाड करणारा हा सेना-धुरंधर!
मराठ्यांच्या इतिहासात असा सेनापती एकमेव 'संभाजी'च होऊन गेला.
जंजिरेकर सिद्दी, गोव्याचे फिरंगी, मुंबईचे टोपीकर आणि तीस लाखांची फौज व चौदा कोटींचा खजिना घेऊन मराठ्यांचे पारिपत्य करण्यासाठी दक्षिणेत उतरलेला अवाढव्य औरंगजेब - या त्या चार आघाड्या.
पाचवी आघाडी होती, स्वार्थांध स्वजनांची, अगदी घरचीच! विखारी विश्वास घातक्यांची!
सतत नऊ वर्षे पाठीशी घेत मुलूखभर दौडणारा हा झुंजार राजा जन्माला येताना कविमनाचे संचित बरोबर घेऊन यावा आणि 'बुधभूषणम्' काव्याची रचना करून तो कविराज म्हणून मान्यता पावावा;
हे पाहिले की, प्रतिभा देवदत्त असली; तरी एक अजब आणि विस्मयकारी देणगी आहे, असे म्हणावे लागते. तसाच अटीतटीचा प्रसंग आला तर मराठी कविमन एकदा का निर्धाराने राजवस्त्र ल्याले की,
मृत्यूलाही कसे धडक सामोरे जाऊ शकते; हे या छाव्याने तुळापुरी सिद्ध केले.
ही शोकांतिका तर खरीच;
पण उत्कट आणि भव्य समर्पणाचा वेध घेणारी!

तीनशे कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. यामुळे मराठीच्या एकूणच विकासाला, साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्राला गतिमानता प्राप्त होईल.

### ☞ स्मार्टफोन्स होणार माणसांपेक्षा स्मार्ट

हातातले एक काम संपल्यावर तुम्ही पुढे काय करणार आहात, हे आगामी काही वर्षांमध्ये स्मार्टफोन्स आधीच ओळखू शकतील. तुमच्या सवयींवरून तुमच्या खरेदीविषयींचे अंदाजही बांधू शकतील. २०१७ मध्ये स्मार्टफोन्स हे मानवांपेक्षा अधिक 'स्मार्ट' होतील.

क्लाउड कम्प्युटिंगची पुढची पायरी असलेल्या कॉग्निझंट कम्प्युटिंग या यंत्रणेद्वारे युजर्सच्या आवडीनिवडी, सवयी इत्यादींचा डाटाबेस तयार करण्यात येईल.

मोबाईल फोन्स हे स्मार्टफोन्स झाल्यापासून तंत्रज्ञान आणि ॲप्स वेगाने अद्ययावत होत आहेत. कॅमेरा, लोकेशन सेन्सर्स इत्यादी तंत्रज्ञान आता स्मार्टफोनमध्ये अंतर्भूत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित करण्यात आलेल्या ॲप्सचा वापर आपल्या सामाजिक, ज्ञानविषयक, करमणूकविषयक, तसेच उत्पादनांशी संबंधित गरजा भागवण्यासाठी करता येऊ शकेल. ही दिवसेंदिवस अधिक स्मार्ट होत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये मानवांच्या मदतीशिवाय ॲप्स कार किंवा तिकिटे बुक करणे, कॅलेंडर पाहून साप्ताहिक वेळापत्रक निश्चित करणे, आप्तेष्टांना जन्मदिनी ग्रीटिंग्ज पाठवणे, आलेल्या मेल्सना उत्तर देणे ही कामे परस्पर करू शकतील.

२०१७मध्ये क्लाउडद्वारे स्मार्टफोन्सकडे माहितीचा प्रचंड साठा उपलब्ध होईल. आपण स्वत:विषयीची योग्य माहिती स्मार्टफोन्सना पुरवली तर ते मानवांहून अधिक वेगाने त्या माहितीवर प्रक्रिया करू शकतील.

### ☞ दृष्टिहीन मुलांना अतिसुरक्षित वातावरणात वाढवू नका.

'दृष्टिहीन मुलांच्या पालकांच्या बाबतीत जर्मनी आणि भारत या दोन्ही ठिकाणी मी प्रकर्षाने अनुभवलेली गोष्ट म्हणजे मुलांना अतिसुरक्षित वातावरणात ठेवणे. पालकांचे मुलांवर खूप प्रेम असते; पण पाल्यावर प्रेम करणे आणि त्याच्या जीवनाची सूत्रेच हातात घेणे, यातला फरक ते विसरतात. पाल्यावरचे प्रेम विश्वास दाखवण्यात परावर्तित झाले पाहिजे. जेणे करून ते मूल स्वत:साठी योग्य रस्ता स्वत: शोधेल,' असे मत तिबेटी भाषेसाठी ब्रेल लिपी विकसित करणाऱ्या सॅब्रिया टेनबर्कन हिने व्यक्त केले.

सॅब्रिया स्वत: दृष्टिहीन असून तिला २००५मध्ये शांततेसाठीच्या नोबेल पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते. तिने आपला डच जोडीदार पॉल क्रोनेनबर्ग याच्याबरोबर दृष्टिहीनांसाठी 'ब्रेल विदाऊट बॉर्डर्स' या संस्थेची स्थापना केली असून दृष्टिहीनांना आपली स्वप्ने पूर्ण करण्यास मदत करणारा 'कांथारी' हा प्रकल्पही त्यांनी केरळमध्ये

सुरू केला आहे. किशोर व वृंदा फडके यांच्यातर्फे सॅब्रिया आणि पॉल यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते.

सॅब्रिया म्हणाली, ''लहानपणी एका आनुवंशिक आजारामुळे मला अंधत्व आले. असे होणार याची कल्पना माझ्या पालकांना होती. पण त्यांनी त्या गोष्टीसाठी मला तयार केले. अंधत्व येण्यापूर्वी मला अधिकाधिक जग कसे पाहता येईल यासाठी त्यांनी प्रयत्न केले. दृष्टिहीन म्हणून वेगळे पाडले जाणे मी देखील सुरुवातीला अनुभवले. तुम्ही दृष्टिहीन असाल आणि तुमच्याकडे संवाद साधण्याची कला नसेल, तर तुम्ही इतरांसाठी अदृश्यच असल्यासारखे असता. त्यामुळे इतरांचे ऐकण्याची आणि आत्मविश्वासाने संवाद करण्याची कला मी प्रयत्नपूर्वक आत्मसात केली. **अंधत्व म्हणजे अंधार ही व्याख्या चुकीची आहे. विविध अवयवांनी मनुष्य जे अनुभव घेत असतो, त्यांची दृष्टिहीन नसलेल्यांपेक्षाही चांगली कल्पना दृष्टिहीन व्यक्ती करू शकतात.** त्यामुळेच ही मंडळी अधिक चांगली स्वप्ने बघू शकतात. भारतात खूप कमी दृष्टिहीन व्यक्ती चालताना पांढरी काठी वापरतात. बाहेर फिरताना अनेकांचे नातेवाईक त्यांना घेऊन जात असतात. हे चुकीचे आहे. पांढरी काठी दृष्टिहीनांचे इतरांवरील अवलंबित्व संपवते.''

विशिष्ट ध्येयाने एकत्रितपणे काम करताना आलेले अनुभव पॉलने सांगितले. तो म्हणाला, ''मी कधी सॅब्रियाकडे अंध म्हणू पाहिले नाही. अनेकदा तिला दिसत नाही हे मी चक्क विसरतो. दिसत नसलेल्यांनाही इतरांसारखेच वागवायला हवे. त्यांच्याशी बोलताना उगाच दयेचा सूर नको.''

### ✑ तन्वीर सन्मान

रूपवेध प्रतिष्ठानतर्फे 'दिव्य मराठी'चे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते ज्येष्ठ नाटककार गो. पु. देशपांडे यांना मरणोत्तर तन्वीर सन्मान आणि वामन पंडित यांना तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार प्रदान करण्यात आला. गो. पु. देशपांडे यांचे चिरंजीव सुधन्वा देशपांडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर, दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचा इंग्रजी अनुवाद करणाऱ्या माया पंडित, प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. श्रीराम लागू आणि दीपा श्रीराम या वेळी उपस्थित होत्या.

मराठी रंगभूमीला स्वत:चे मासिक नाही. वाङ्मयीन कार्य करणाऱ्या साहित्य संस्थांप्रमाणे रंगभूमीविषयक घडामोडींची माहिती देणारे मुखपत्र नाही. रंगकर्मी संपर्क माध्यमच हरवून बसतोय. हे माहीत असूनही आपण काहीच करत नाही. त्यामुळे मराठी रंगभूमीला मुखपत्र असणे गरजेचे आहे, असे मत कणकवली येथील पं. वसंतराव आचरेकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष वामन पंडित यांनी व्यक्त केले. रंगभूमीचे दस्तऐवजीकरण केले नाही, तर भावी पिढीच्या दृष्टीने आपण काहीच केले नाही असे होईल याकडे त्यांनी लक्ष वेधले.

कणकवलीच्या लोकांचा हा सन्मान असल्याचे सांगून पंडित म्हणाले, ''गोपुंची उशिराने ओळख झाली. तीन वर्षांपूर्वी ते कुटुंबियांसमवेत कणकवलीला आले होते. मात्र, त्या वेळी त्यांच्याशी सविस्तर गप्पा मारता आल्या नाहीत याची खंत वाटते. माझे काम संस्थात्मक पातळीवरचे आहे. वैयक्तिक काम करणाऱ्या युवा रंगकर्मींची जागा अडविली अशी अपराधीपणाची बोचही वाटते.''

सुधन्वा देशपांडे म्हणाले, ''गोपुंनी भाषेच्या राजकारणाकडे वेगळ्या दृष्टीने पाहिले. बोली भाषा आणि अभिजात भाषा यांतील द्वंद्वाचा त्यांनी गांभीर्याने विचार केला. अभिजातता लोकप्रिय केली पाहिजे अशीच त्यांची धारणा होती.'' केतकर म्हणाले, ''चीनच्या सांस्कृतिक इतिहासाबद्दल गोपु हे जीपीडी या नावाने लिहीत असत. त्यांच्याकडे विनोदबुद्धी आणि उपहासगर्भता विलक्षण होती. दिल्लीला वास्तव्य असूनही मराठी वैचारिक वादांची त्यांना माहिती असायची. 'उद्‌ध्वस्त धर्मशाळा' आणि 'अँटिगनी' या त्यांच्या नाटकांच्या पहिल्या वाचनाचा मी एक साक्षीदार आहे.'' आळेकर म्हणाले, ''पंडित हे पडद्यामागचे असे कलाकार आहेत की त्यांच्यावर कधी प्रकाशच पडत नाही, पण, त्यांच्याशिवाय प्रयोग होत नाही. दुसऱ्याच्या सृजनात आनंद मानण्यामध्येही धैर्य लागते. कणकवली हा सांस्कृतिक थांबा करण्याचे काम हे श्रीधरन यांनी कोकणात रेल्वे आणण्याइतकेच महत्त्वाचे आहे.''

माया पंडित म्हणाल्या, ''कुटुंबामध्ये चेपलेल्या बायकांचे गौरवीकरण ७० च्या दशकातील कथा-कादंबऱ्या आणि नाटकांतून दिसायचे. त्या तुलनेत गोपुंचा स्त्रियांविषयीचा दृष्टिकोन वेगळा होता.'' गौरी लागू यांनी सूत्रसंचालन केले.

### ➾ स्मार्टफोनचे 'शत्रू' — कॅमेरा आणि मायक्रोफोन!

स्मार्टफोनमधील कॅमेरा आणि मायक्रोफोनच्या मदतीने तुमच्या स्मार्टफोनचा 'सिक्रेट पिन नंबर' शोधणे सहजशक्य असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे. 'पिन स्किमर' या सॉफ्टवेअरचा उपयोग करून केंब्रिज विद्यापीठातील एका गटाने केवळ आकड्यांच्या मदतीने टाइप केलेला पिन नंबर उघड करण्यात यश मिळवले. 'गुगल नेक्सस एस' आणि 'गॅलेक्सी एस ३' या दोन स्मार्टफोनवर केलेल्या प्रयोगांमध्ये या चमूला पिन शोधण्यात मोठे यश मिळाले. ''मायक्रोफोन तुम्ही पिन टाइप करताना फोनवर केलेले स्पर्श शोधतो. युजर व्हर्च्युअल की पॅडवरील नंबर दाबताना होणारे आवाज हा मायक्रोफोन 'ऐकतो'. त्यानंतर कॅमेरा तुम्ही नंबर टाइप करताना तुमचा चेहरा कसा खाली-वर होतो हे टिपतो व त्यावरून कोणता क्रमांक डायल केला याचा शोध घेतो. युजर पिनचा वापर बँकेचे व्यवहार करण्यासाठी होत असल्याने अशा प्रकारे पिन शोधता येणे धोकादायक आहे,'' असे संशोधन गटातील प्रोफेसर रॉस अँडरसन व लॉरेन्ट सिमन यांनी म्हटले आहे. सध्या यावर पिन सतत

बदलणे किंवा खूप मोठा क्रमांक ठेवणे एवढे दोनच पर्याय असल्याचेही संशोधकांनी म्हटले आहे.

### ☞ शिवशाहिरांना जीवनगौरव पुरस्कार

आशय सांस्कृतिक आणि पु.ना. गाडगीळ अँड सन्स यांच्यातर्फे आयोजित 'पुलोत्सवा'मध्ये बाबासाहेब पुरंदरे यांना ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांच्या हस्ते पुलोत्सव जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यानंतर निवेदक सुधीर गाडगीळ यांनी त्यांची मुलाखत घेतली. संयोजक वीरेंद्र चित्राव, सतीश जकातदार, पु.ना.गाडगीळचे नंदू देवळे आदी उपस्थित होते.

बाबासाहेबांच्या मुलाखतीमध्ये सुरवातीपासूनच सुधीर गाडगीळ यांनी बाबासाहेबांचे निरनिराळे पैलू उलगडण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार बाबासाहेबांनीही अनेक जुन्या आठवणी जागवित मनमोकळे भाष्य केले. लहानपणी सावरकरांसमोर केलेली त्यांची नक्कल व त्यांची मिळालेली दाद, वडिलांचा विरोध असतानाही नाटकात पहिला व शेवटचाच केलेला अभिनय आदी किस्से त्यांनी भरभरून सांगितले. लावणी ते उखाणे आदी विषयही रंगविले व एक उखाणा घेऊन रसिकांना चकितही केले. त्याचबरोबरीने पुल व सुनीताबाई, बालगंधर्व, दीनानाथ मंगेशकर आदींच्या विविध आठवणीही त्यांनी जागविल्या.

पुलंविषयी बोलताना ते म्हणाले, 'भाई व सुनीताबाईंचा सहवास अविस्मरणीय होता. त्या प्रेमाची अनुभूती सांगता येणार नाही. त्यांच्या नावाने मिळालेला पुरस्कार स्वीकारताना आभाराला शब्दच नाहीत.'

पुणे - बंगळुरू रस्त्यालगत आंबेगाव येथे साकारण्यात येत असलेल्या शिवसृष्टीचा एक भाग पूर्ण झाला असून, अंतर्गत सजावटीनंतर हा भाग नागरिकांना पाहता येईल, असे बाबासाहेब पुरंदरे यांनी सांगितले. जुन्या वस्तूंची किंमत आपल्याला कळत नाही. शिवाजी महाराजांच्या काळातील आठ नाणी आज आहेत. शिवाजी महाराजांचे महत्त्व आपल्याला कळले नाही. शिवसृष्टीसाठी जितके मिळाले ते जुने साहित्य त्या ठिकाणी ठेवण्यात येईल असेही ते म्हणाले.

### ☞ दर्जेदार बालसाहित्य निर्मितीची जबाबदारी लेखकांनी घ्यावी

मुलांचा साहित्य वाचनाकडे कल नाही यामध्ये मुलांना दोष देता येणार नाही. मुलांना आकर्षित करणाऱ्या दर्जेदार बालसाहित्य निर्मितीची जबाबदारी लेखकांनी घ्यावी, अशी अपेक्षा प्रसिद्ध साहित्यिक आणि रौप्यमहोत्सवी बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राजीव तांबे यांनी व्यक्त केली. भविष्यामध्ये साहित्य निर्मितीबरोबरच विशेष मुलांसाठीदेखील काम करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था आणि संवाद पुणे आयोजित

बालकुमार साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाले. बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष डॉ. न. म. जोशी, मावळते संमेलनाध्यक्ष मदन हजेरी, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, स्वागताध्यक्ष दिलीप वारे, सुनील महाजन या वेळी व्यासपीठावर होते. अप्पा बळवंत चौकातील नूमवि प्रशाला ते बालगंधर्व रंगमंदिर या मार्गाने काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीमध्ये शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

तांबे म्हणाले, ‘‘ध्येय गाठताना वाटेमध्ये अडथळे हे येणारच. त्या अडथळ्यांचा विचार न करता ध्येयाकडेच लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. सकारात्मक विचारांनी मनाला ऊर्जा मिळते. पुस्तके वाचकांच्या मनावर खोलवर परिणाम करीत असतात. त्यामुळे बालवयातच मुलांवर वाचनाचे संस्कार होण्याची आवश्यकता आहे. बालसाहित्यामध्ये दृष्टिहीन, मूक-बधिर अशा विद्यार्थ्यांचा विचार केला जात नाही. या मुलांना डोळ्यासमोर ठेवून भविष्यात साहित्य निर्मिती करणार आहे. मुलांना आकर्षित करणारे साहित्य निर्माण करणे हेच लेखकांपुढचे आव्हान आहे.’’

२६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले अशोक कामठे यांचे पूर्वज येसबा कामठे यांची गोष्ट शिवशाहीर पुरंदरे यांनी सांगितली. बालकुमारांसह ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’ अशी ललकारी देत त्यांनी बाळगोपाळांचा आनंद द्विगुणित केला. माधवी वैद्य यांनी मुलांना मराठी भाषेची शपथ दिली.

सुनील महाजन यांनी प्रास्ताविक केले. अंजली महागावकर यांनी सूत्रसंचालन केले.

### ➩ संवादातून उजळली ‘प्रकाशवाट’...

समकालीन प्रकाशनतर्फे आयोजित प्रकाशन समारंभात डॉ. प्रकाश आमटे लिखित ‘रानमित्र’ या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. अवचट यांच्या हस्ते झाले; तर एम.टी. रामटेके या भामरागडमध्ये वाढलेल्या युवकाने लिहिलेल्या ‘आम्ही माडिया’ या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. आमटे यांच्या हस्ते झाले. त्यानंतर डॉ. अवचट यांनी डॉ. आमटे दांपत्याशी संवाद साधला.

दुर्गम भागातल्या माडियांची भाषा शिकून त्यांची केलेली सेवा-सुश्रुषा, तिथल्या वाघ, सिंह आणि अजगर अशा ‘रानमित्रां’शी केलेली दोस्ती... बाबांचा वारसा जपतच मंदाताईंच्या साथीने बाबांचा वारसा जपून अविरत कष्टांमधून निर्माण केलेली ‘प्रकाशवाट’... दरम्यान आलेल्या अडीअडचणी, मित्र, कार्यकर्त्यांच्या साथीने त्यावर केलेली मात... आणि हीच प्रकाशवाट प्रमाण मानून मुलांनीही सुरू ठेवलेले समाजकार्य...

मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. प्रकाश आमटे आणि मंदा आमटे यांचा हा अनोखा जीवनपट ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अनिल अवचट यांनी घेतलेल्या

मुलाखतीतून उलगडत गेला.

‘एकाच कॉलेजातून पदवी घेतल्यानंतर पदव्युत्तर शिक्षणात मात्र एकच शाखा असल्याने ओळख वाढली आणि मग लग्नाचा निर्णय झाला. इतर मुलांशी लग्न करून चारचौघांसारखा संसार करण्यापेक्षा वेगळे काहीतरी करायला मिळेल, या हेतूने प्रकाश यांच्याशी लग्नाचा निर्णय घेतला,’ असे मंदाताईंनी सांगताच एकच हशा पिकला. ‘बाबांच्या कार्याचा आदर्श लहानपणापासूनच समोर होता. माडिया लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी मी त्यांची भाषा शिकलो. माझ्यावर विश्वास ठेवून ते उपचारांसाठी येत, म्हणून अपुऱ्या वैद्यकीय साहित्यासह कंदिलाच्या प्रकाशात दिवसरात्र सेवा करून त्यांना केले,’ असे डॉ. प्रकाश यांनी सांगितले.

‘प्राण्यांना जितकी जाणीव आहे, तितकी माणसांना नाही,’ असे सांगून डॉ. प्रकाश यांनी आपल्या ‘रानमैत्री’ची कथा उलगडली, ‘माडिया लोक प्राणी मारून खात. प्राणी मारू नका, मी तुम्हाला अन्न देतो, असे म्हणत मी प्राण्यांना वाचवत असे. पुढे मग याच प्राण्यांना आईच्या मायेने वाढवले. पुढे त्यांनीही आम्हाला लळा लावला. रोज सकाळी कुत्रा, माकड, हरीण, अस्वल आमच्यासोबत फिरावयास येत. दत्ता बाळासराफ यांनी सूत्रसंचालन केले. आनंद अवधानी यांनी प्रास्ताविक केले.

### ‘पुष्पाचे प्राक्तन’चे प्रकाशन


‘इतर भाषांमधील शब्द स्वीकारताना त्याला वेगळी अर्थछटा दिली पाहिजे. प्रत्येक शब्द, भाषेसंदर्भात वेगळे प्रयोग व्हायला हवेत. त्यामुळे भाषेला सौंदर्य प्राप्त होते,’ असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी मिलिंद शिंत्रे लिखित ‘पुष्पाचे प्राक्तन’ या पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले. ज्येष्ठ नाटककार चं. प्र. देशपांडे, लेखक-दिग्दर्शक, श्रीरंग गोडबोले, मिलिंद शिंत्रे उपस्थित होते. मराठी भाषेच्या दृष्टिकोनातून सध्या फार काही चांगली स्थिती नाही. मराठी भाषेला जिवंत ठेवण्यासाठी सर्वांनीच पुढे येण्याची आवश्यकता आहे. मराठी भाषेच्या अनुप्रास अलंकाराला वाहिलेली पूर्ण कथा तयार होणे हा अनोखा प्रयोग असून, त्याचे स्वागत केले पाहिजे, असे देशपांडे यांनी सांगितले.

कुलकर्णी म्हणाले, ‘शिंत्रे यांनी शब्दक्रीडा करून भाषा जिवंत ठेवण्याचा आणि जागतिक पातळीवर पोहोचविण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला आहे. अनुप्रास अलंकारातील या कथेचा निश्चितपणे गांभीर्याने विचार केला पाहिजे.’

### डॉ. आनंद यादव - ७८

चार्म्स ग्रुपतर्फे ७८व्या वाढदिवसानिमित्त डॉ. आनंद यादव यांचा गौरव करण्यात आला. या वेळी निवेदक संजय पोमण यांनी त्यांची मुलाखत घेतली. या वेळी ग्रुपचे संस्थापक लक्ष्मीकांत पाचारणे, त्यांच्या पत्नी

...नामदेव पुढे झाले. त्यांनी सोपानाच्या पायांवर लोळण घेतली. सोपानानं डोळे उघडले. वाकून त्यानं नामदेवांना उठवलं. दुसऱ्या क्षणाला नामदेवांनी सोपानाला घट्ट मिठी मारली. इतकी घट्ट की, जणू ती कुणी सोडवणं शक्य नव्हतं. जणू ते सोपानाला जाऊच देणार नव्हते. एका मिठीला इतके अर्थ असू शकतात? काय नव्हतं त्या मिठीत? सोपानाला अडवण्याची जिद्द, तो समाधी घेणार म्हणून होणाऱ्या वियोगाचं दु:ख, आपण त्याला थांबवू शकत नाही म्हणून वाटणारी असाहाय्यता, त्याच्या वियोगाची वेदना, एवढ्या लहान वयातली त्याची स्थितप्रज्ञता बघून वाटणारं कौतुक, त्याचा निरागस चेहरा बघून पोटातून तुटून येणारी माया, त्याच्या अलौकिक बुद्धिसामर्थ्याला




*शब्द प्रभुत्वाची साक्ष असलेल्या*
*ज्ञानाच्या सोपानाची जीवनगाथा*

# ज्ञानसूर्याची सावली

**मंजुश्री गोखले**

**किंमत : २९०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

केलेलं वंदन, या पुण्यात्म्याचा सहवास आपल्याला लाभला म्हणून वाटलेली धन्यता, आपल्यापेक्षा वयानं कितीतरी लहान असलेल्या या पोराला समाधी घेताना बघण्याचं करंटेपण आणि या सर्वांवर कळस, म्हणजे मनात अतिपूज्य भावना असल्यामुळे ज्ञानोबा माउलीला आपण अशी घट्ट मिठी मारू शकलो नाही, म्हणून आता त्या ज्ञानसूर्याचीच सावली असलेल्या सोपानाला आपण घट्ट मिठी मारतो आहोत, याची सार्थकता. एका मिठीमध्ये एवढ्या भावभावना सामावलेल्या असतात, हे नामदेवांनाही उमजलं नसेल; पण नामदेवांनी सोपानाला कडकडून मारलेली मिठी भिजलेल्या डोळ्यांनी बघणाऱ्या जनाबाईंना मात्र हे सगळे-सगळे अर्थ समजले....

कमल पाचारणे आदी उपस्थित होते.

'शालेय जीवनात वहीच्या पहिल्या पानावर 'मेलो तरी मेलो, मरण न चुके, मन माझे भुके, ध्येयासाठी' हे वाक्य लिहिले होते. त्याच ध्येयाने आयुष्यात पुढे शिकलो. कुटुंबियांशी, व्यवस्थेशी आणि अगदी ग्रामीण साहित्यकारांशी संघर्ष केला. त्या संघर्षातूनच घडत गेलो. साहित्य अकादमीच्या पुरस्कारासही पात्र ठरलो. चांगले आयुष्य जगायला मिळाल्यामुळे आनंद आणि समाधान वाटते,' अशा शब्दांत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी त्यांच्या आयुष्यातील विविध पैलू उलगडले.

या वेळी अनेक आठवणींना उजाळा देत डॉ. आनंद यादव म्हणाले, ''पु. ल आणि सुनीता देशपांडे यांनी मुलाप्रमाणे वागविले. त्यांनीच कोल्हापुरात माझ्या शिक्षणाची सोय केली. माझ्यातील लेखकाला लेखनाची आकावाणीत श्रुतिका सादरीकरणाची संधी दिली. पुणे विद्यापीठात उच्च शिक्षण घेऊन नोकरी मिळविली. चांगल्या लोकांच्या सहवासामुळे कोणत्याही व्यसनाला बळी पडलो नाही. शाळेसाठी वडिलांचा मार खल्ला कोणालाही न सांगता एकदा घरच सोडले. फीसाठी प्राचार्यांकडे कवितांची वही देखील गहाण ठेवण्याची वेळ आली होती. ग्रामीण साहित्य चळवळीसाठी संघर्षही केला. यामुळे आयुष्याकडे मागे पाहताना खूप आनंद वाटतो.''

## ✑ मोबाईल फोन टाळणारे अधिक सुखी!

मोबाईल फोन सर्वाधिक वेळ वाजत असतो म्हणजे मला सर्वाधिक मित्र आणि म्हणूनच मी सर्वात आनंदी. हा अनेकांचा समज एका नव्या संशोधनाने खोटा ठरविला आहे. जे लोक मोबाईल फोनची वाजलेली रिंग किंवा मेसेज ॲलर्ट अगदी सहज टाळतात तेच अधिक आनंदी असतात, असा निष्कर्ष संशोधकांनी काढला आहे. अमेरिकेतील केंट विद्यापीठातील संशोधकांनी ५०० विद्यार्थ्यांच्या फोनच्या वापराचे निरीक्षण केले व त्यातून त्यांच्या आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामध्ये झालेला बदलांचा अभ्यास केला. मोबाईल फोन केवळ मित्र-मैत्रिणीशी संपर्कात राहण्याचे साधन न राहता त्यांच्यातील अस्वस्थता वाढविण्याचे प्रमुख कारण बनल्याचे या निरीक्षणातून समोर आले. संपर्क होऊ न शकल्यास त्यांच्यामधील अस्वस्थता आणखीच वाढल्याचे दिसून आले. त्यातील अनेकांना फेसबुकसारख्या सोशल मीडियापासून स्वत:ला दूर ठेवणे त्रासदायक ठरले. विशेष म्हणजे या आधीच्या संशोधनांमध्ये मोबाईल फोनमुळे सामाजिक जाणिवा वाढतात तसेच एकटेपणाची भावना कमी होते असे सिद्ध झाले होते. या गटातील संशोधक अँड्यू लिप यांच्या मते ''विद्यार्थ्यांच्या आयुष्यात स्वत:साठीचा वेळच शिल्लक नाही. चांगल्या मानसिक आरोग्यासाठी स्वत:ला वेळ देणे, मनात डोकावून पाहणे, आयुष्यात घडलेल्या घटनांचा मागोवा घेणे व त्यातून दैनंदिन तणावातून बाजूला होणे आवश्यक असते.''

### ➳ गुगलने 'रोबो' कंपनी विकत घेतली

'गुगल'ने जगातील सर्वाधिक वेगाने धावणारा 'चित्ता' हा रोबो विकसित करणारी इंजिनिअरिंग कंपनी 'बोस्टन डायनामिक्स' विकत घेतली आहे. ही कंपनी अमेरिकेच्या सैन्याला आवश्यक रोबो पुरवीत होती. 'ॲण्ड्रॉइड' ही ऑपरेटिंग सिस्टिम विकसित करणारे ॲण्डी रॉबिन हे या कंपनीचे प्रमुख असून, या व्यवहारात किती देवाण-घेवाण झाली, हे गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे. या व्यवहारातून इंटरनेट कंपन्या रोबोटिक्समध्ये अधिक रस घेत असल्याचे सिद्ध होते, असे जाणकारांनी म्हटले आहे. ''ॲण्डी रॉबिन यांच्या या प्रकल्पाबद्दल मला खूप उत्सुकता आहे. त्यांच्या 'ॲण्ड्रॉइड'मुळे करोडो लोकांच्या हातामध्ये 'सुपरकॉम्प्युटर' पोचला आहे. हा भावी प्रकल्प प्राथमिक अवस्थेत असला तरी त्याला खूप मोठे भविष्य आहे,'' असे 'गुगल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी लॅरी पेज यांनी म्हटले आहे.

'बोस्टन डायनॅमिक्स'ची स्थापना १९९२मध्ये झाली होती. तिने 'सोनी' या बड्या कंपनीला 'आयबो' नावाचा रोबो कुत्रा तयार करून दिला होता. मात्र, कंपनी मुख्यत: अमेरिकेच्या 'पेंटागॉन'च्या सल्ल्यानुसार मोबाईल फोनशी संबंधित तंत्रज्ञान व युद्धभूमीवर वापरता येतील असे रोबो विकसित करीत आहे. 'गुगल'ने आपण 'पेंटागॉन'ला सैन्याशी संबंधित तंत्रज्ञान भविष्यातही पुरवत राहू, असे स्पष्ट केले आहे. रोबो बनविणारी 'गुगल'ने विकत घेतलेली ही आठवी कंपनी आहे.

### ➳ भास्कराचार्यांचा विसर

बाराव्या शतकातील प्रख्यात गणिततज्ज्ञ भास्कराचार्य यांचे ९०० वे जयंती वर्ष २०१४ मध्ये सुरू होणार आहे. भास्करीय त्रिकोणमिती, पायथगोरसचा सिद्धांत, परीघ व्यासाचे सूत्र अनंत कल्पना आणि शून्य या संकल्पना मांडणाऱ्या आणि 'सिद्धांत शिरोमणी' सारखा महान ग्रंथ लिहिणाऱ्या भास्कराचार्यांचा राज्य सरकारला मात्र विसर पडला आहे. त्यांच्या जन्मगावी आणि राज्यातही त्यांच्या स्मृतीचे जतन व्हावे ही खगोल अभ्यासकांची अपेक्षा आहे. सरकारला विसर पडला असला तरी खगोल अभ्यासकांची मात्र भास्कराचार्यांच्या ९००व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या स्मृतीचे जतन करण्याचा निर्णय घेतला आहे.

### ➳ भाषा सल्लागार समिती

मोबाइल, कम्प्युटर, बँकिंग व्यवहारात मराठीचा वापर करावा, अशी आग्रही भूमिका राज्य सरकारने घ्यावी अशी शिफारस करण्याचे भाषा सल्लागार समितीने ठरवले.

मराठी भाषेच्या पुढील २५ वर्षांच्या धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उपसमितीची पुण्यात बैठक झाली. डॉ. सदानंद मोरे, निरंजन घाटे, प्रा. विश्वनाथ शिंदे, डॉ. पंडित विद्यासागर, लक्ष्मीकांत तांबोळी, प्रा. हरी नरके, लक्ष्मण गायकवाड आदी या बैठकीला उपस्थित होते. भाषेसंदर्भात कडवट नाही, तर आग्रही भूमिका राज्य सरकारने घेण्याची शिफारस करण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले.

सरकारने प्रकाशित केलेले ग्रंथ लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सरकारी बुक डेपो सुरू करावे. सध्या मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, आणि कोल्हापूर अशा पाच ठिकाणी हे ग्रंथ मिळण्याची सोय असून, प्रत्येक एसटी स्टँडवर सरकारी पुस्तकांची सोय करण्यात यावी, असा प्रस्तावही मांडण्यात आला.

भाषा संचालनालयाने आजवर तयार केलेले, मात्र उपलब्ध नसलेले विविध विषयांवरचे ४९ कोश अद्यावत करून करून ई-बुक स्वरूपात पुनर्प्रकाशित करण्याचे ठरवले.

## ☞ बालसाहित्याची समग्र ‘अक्षरयात्रा’ साहित्य महामंडळाचा वार्षिकांक

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या ‘अक्षरयात्रा’ या वार्षिक विशेषांकात यंदा साठोत्तरी बालसाहित्याचा समग्र पद्धतीने आढावा घेतानाच सध्याच्या काळातील बालसाहित्याच्या आवश्यकतेचाही विचार गांभार्याने केला जाणार आहे. फेब्रुवारीत छत्तीसगडमध्ये महामंडळाच्या वर्धापनदिनाच्या वेळी सुमारे १६० पानांचा हा अंक प्रकाशित होईल.

१९६० नंतरच्या बालकविता, कथा, कादंबरी, बालरंगभूमी, बालचित्रपट, ललित लेखन, अनुवादित बालसाहित्य, शैक्षणिक प्रयोग, वाचनसंस्कृती, वर्तमान लेखकांपुढील आव्हाने आदी विषयांवरील लेख, समीक्षेच्या स्वरूपात बालसाहित्यविषयक मजकूर देण्यात येणार आहे.

## ☞ कार्लसन – नवा जगज्जेता

विश्वविजेतेपदावर पाचवेळा मोहोर उमटवणाऱ्या भारताच्या विश्वनाथन आनंदचे बुद्धिबळातले जगज्जेतेपद कायम राखण्याचे स्वप्न नॉर्वेच्या २२ वर्षीय मॅग्नस कार्लसनने धुळीस मिळविले. आनंदाने परदेशात झालेल्या जगज्जेतेपदांच्या लढतीत आतापर्यंत विजय मिळविले होते आणि आता मायदेशातच त्याला हार मानावी लागली.

जगज्जेतेपदाच्या सिंहासनावर कार्लसन विराजमान झाला आहे. त्याला जवळपास १४ कोटी या एकूण बक्षिसाच्या रकमेपैकी ६० टक्के म्हणजे आठ कोटी रुपये

इनाम मिळाले. ३० नोव्हेंबरला वयाची २३ वर्षे पूर्ण करणाऱ्या कार्लसनला वाढदिवसाची ही अनोखी भेट मिळाली.

### ➩ 'व्हॉट्सअ‍ॅप' – भारतात तीन कोटींवर यूजर्स

मोबाइलवरून करण्यात येणाऱ्या मेसेजच्या देवाणघेवाणीचे स्वरूप पुरते पालटून टाकणाऱ्या व्हॉट्सअ‍ॅपची लोकप्रियता व उपयोग भारतातही प्रचंड वेगाने वाढत असून, या अ‍ॅपचा वापर करणाऱ्यांची संख्या तीन कोटींवर पोहोचली आहे.

इंटरनेट सुविधा असलेल्या फोनच्या, स्मार्ट फोनच्या वाढत्या वापरासोबत पारंपरिक एसएमएस सुविधेचा वापर झपाट्याने कमी होत चालला असून, त्याची जागा व्हॉट्सअ‍ॅप, लाइन, हाइक, चॅटऑन, ब्लॅकबेरी बीबीएम अशा भिडूंनी घेतली आहे. त्यातही व्हॉट्सअ‍ॅपने घेतलेली आघाडी मोठी आहे.

ऑगस्ट महिन्यात भारतात व्हॉट्सअ‍ॅप वापरणाऱ्यांची संख्या दोन कोटींच्या घरात होती. केवळ महिनाभराच्या काळात त्यात एक कोटींची भर पडून हा आकडा तीन कोटींवर पोहोचला आहे. व्हॉट्सअ‍ॅप वापरणाऱ्यांची जगभरातील एकूण संख्या सुमारे ३० कोटी आहे. याचाच अर्थ जगभरातील व्हॉट्सअ‍ॅप वापरणाऱ्यांपैकी १० टक्के लोक भारतात आहेत.

ही कमालीच्या वेगाने वाढत असलेली व्हॉट्सअ‍ॅपची लोकप्रियता लक्षात घेऊन विविध मोबाइल कंपन्यांनीही आपल्या ग्राहकांसाठी व्हॉट्सअ‍ॅपच्या जोडीने आकर्षक पॅकेज देण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. येत्या काळात विविध कंपन्यांत याबाबत मोठी स्पर्धा दिसेल, अशी चिन्हे आहेत.

### ➩ सॉफ्टवेअर पकडणार 'लेनकटिंग'

'एक्स्प्रेस वे' वर अपघातात सख्खा भाऊ गमविलेल्या तन्मय पेंडसे आणि त्याने स्थापलेल्या फुलोरा फाउंडेशनने लेनकटिंग पकडणारे सॉफ्टवेअर तयार केले आहे.

बेदरकारपणे वाहन चालविणे, वेगमर्यादेचे उल्लंघन करणे, लेन कटिंग करणे ही 'एक्स्प्रेस वे' वरील नित्याचीच बाब ठरत आहे. पायाभूत सुविधांच्या अभावाबरोबरच नियम धुडकावणाऱ्या अशा वाहनचालकांमुळे 'एक्स्प्रेस वे' मृत्यूचा सापळा ठरतो आहे. अभिनेते आनंद अभ्यंकर, अभय पेंडसे यांचा गेल्या वर्षी २३ डिसेंबरला 'एक्स्प्रेस वे' वरच अपघाती मृत्यू झाला. त्यानंतर खचून न जाता तन्मयने फुलोरा फाउंडेशनच्या माध्यमातून 'एक्स्प्रेस वे' सुरक्षित करण्याचा विडा उचलला. त्याच्या प्रयत्नांना यश येऊन 'नंबरप्लेट रेकग्निशन सॉफ्टवेअर' विकसित करण्यात आले. त्याची प्रत्यक्ष चाचणीही यशस्वी झाली.

या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून हातामधील मोबाइलमध्ये 'रिअल टाइम

डेटा' मिळू शकेल. संस्थेच्या 'रोडमार्शल' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत मळवली आणि बोरघाटात अलीकडेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याला जोडण्यात आलेल्या या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून लेन कटिंग करणाऱ्या वाहनांचे नंबर टिपून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून रस्त्यावर 'पाळत' ठेवून लेन कटिंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित वाहनाचा, त्याच्या नंबरप्लेटसह फोटो काढून जवळच्या टोलनाक्यावरील यंत्रणेला पाठवून देण्यात येतील. टोलनाक्यावरील यंत्रणेला त्या फोटोच्या प्रिंटवरून घटनास्थळ आणि वाहन क्रमांक मिळेल आणि महामार्ग पोलिसांना गाडी मालकाचे नाव शोधता येईल आणि ती गाडी टोलनाक्यावर आल्यावर दंड करता येईल. भारतामध्ये अजून कुठेही अशा प्रकारची सुविधा उपलब्ध झालेली नाही.

'या सॉफ्टवेअरच्या मदतीने वाहनचालकांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यासाठी महामार्ग पोलिसांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. रात्रीच्या वेळीही ही यंत्रणा कार्यान्वित राहावी यासाठी हाय रिझोल्युशन कॅमेरे बसविण्याचा प्रयत्न सुरू आहे,' असे तन्मयने सांगितले.

### ✑ 'व्हॉट वुई रिअली वान्ट'चे प्रकाशन

''आज तरुण पिढीकडे संयम नाही आणि तो आपल्यालाही नकोच आहे. आपल्याला खूप कमी वेळात मोठ्ठा पल्ला गाठायचा आहे; परंतु वेगात जाताना आपण योग्य दिशेने जातोय ना याचे भान राखले पाहिजे. एखाद्या गोष्टीचा ध्यास, नावीन्यपूर्णतेचा हव्यास हे तरुणाईकडे असणे आवश्यक आहे.'' असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले.

गणेश नटराजन आणि लावण्या जयराम लिखित 'व्हॉट वुई रिअली वाँट' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. माशेलकर यांच्या हस्ते करण्यात आले. 'वेब कॅपिटल' ॲडव्हर्टायजर्सचे व्यवस्थापकीय संचालक अमित चंद्रा, इंटेल कॉर्पोरेशनच्या दक्षिण आशियाच्या व्यवस्थापकीय संचालिका देवयानी घोष, केपीआयटी कमिन्सचे अध्यक्ष रवी पंडित हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

चंद्रा म्हणाले, आजची पिढी खूपच महत्त्वाकांक्षी आहे. तिने उपलब्ध सामग्रीचा योग्य वापर केला, तर भविष्यात आशेला खूपच जागा आहे. घोष म्हणाल्या, ही पिढी प्रश्न विचारण्याला घाबरत नाही. नवीन बदल करणे आणि स्वीकारणे याकडे या पिढीला अधिक कल आहे. मात्र त्यांनी प्रश्नांची उत्तरे शोधायला आणि शेवटच्या माणसापर्यंत सुखसोयी पोचवण्यासाठी तंत्रज्ञान वापरायला हवे. गणेश नटराजन यांनी सूत्रसंचालन केले. लावण्या जयराम यांनी पुस्तकामागील भूमिका विशद केली. मेनका प्रकाशनचे आनंद आगाशे यांनी प्रास्ताविक केले.

## ✑ हजारे, चौहान यांना चंद्रशेखरेंद्र सरस्वती पुरस्कार

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, तसेच मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना 'एमआयईएस' सर चंद्रशेखरेंद्र सरस्वती नॅशनल एमिनन्स पुरस्कार मुंबईत देण्यात आले.

भारतात वेदांचा अभ्यास करण्यासाठी आलेल्या करणाऱ्या ग्रीसच्या राजकन्या आयरीन यांनाही या वेळी विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.

रमण महर्षी आणि जगद्‌गुरु चंद्रशेखरेंद्र सरस्वती स्वामीगल यांचे शिष्यत्व पत्करलेल्या आयरीन यांनी भारतीय वेदांचा विशेष अभ्यास केला आहे. कांची येथील आंतरराष्ट्रीय वैदिक ग्रंथालयासाठी त्यांनी भरघोस मदत केली आहे.

कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य जयेंद्र सरस्वती यांच्या हस्ते हे पुरस्कार दिले गेले. अडीच लाख रुपये रोख, पाच फूट उंचीची समई, मानपत्र आणि शाल असे पुरस्काराचे स्वरूप आहे. अण्णांना समाजसेवेसाठी तर चौहान यांना राजकीय नेतृत्वासाठी हा पुरस्कार देण्यात आला. त्याचबरोबर शास्त्रज्ञ पल्ले रामाराव, तसेच संस्कृत पंडित प्रवचनकार नोचूर वेंकटरामन यांनाही पुरस्काराने गौरविले गेले.

## ✑ पुण्यातील भिडे वाडा राष्ट्रीय स्मारक व्हावा

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी भिडेवाड्यात देशातील पहिल्या मुलींची शाळा सुरू केली होती. सरकारने हा वाडा ताब्यात घेऊन या ठिकाणी राष्ट्रीय स्मारक करण्याची मागणी सम्यक साहित्य संमेलनात करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक समिती आणि पुणे विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्टडीज सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४थे सम्यक साहित्य संमेलन नुकतेच झाले. या संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात काही ठराव मंजूर करण्यात आले. संमेलनाध्यक्ष नीरज, संयोजक परशुराम वाडेकर, संमेलन कार्याध्यक्ष डॉ. विजय खरे आदी या वेळी उपस्थित होते.

भिडे वाड्यात राष्ट्रीय स्मारक करण्याबरोबरच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा. महात्मा फुले यांना मरणोत्तर भारतरत्न मिळावा, जातपंचायतीवर बंदी आणणारा फौजदारी कायदा तत्काळ करण्यात यावा, पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याची मागणीही करण्यात आली.

## ✑ फेसबुकचे 'डोनेट नाऊ'

जगभरातील १९ नामवंत एनजीओंना आर्थिक मदत करणे सोपे जावे म्हणून 'फेसबुक'ने एनजीओंच्या वेबपेजवर 'डोनेट नाऊ' हे बटण उपलब्ध करून दिले आहे. अर्थात यात फक्त चॅरिटीच नव्हे तर, फेसबुकला यातून क्रेडिट कार्ड नंबर

आणि बिलिंगसंदर्भात माहिती मिळवणे सोपे जाणार आहे. याचा फायदा फेसबुकला ई-कॉमर्स आणि गेमिंग बिझनेससाठी होणार आहे. या एनजीओंच्या फेसबुकपेजच्या टॉपला आणि न्यूज फिडच्या तळाशी हे बटण दिसणार आहे. वर्ल्डलाइफ फंड, युनिसेफ, रेडक्रॉस, कीवा, डोनर्स चॉईस अशा एनजीओंचा यारत समावेश आहे. काही दिवसांनंतर अन्य काही एनजीओंच्या पेजवर देखील हे बटण उपलब्ध होणार आहे. यूजर्स डोनेट करण्यासोबतच फेसबुकवरून या फेसबुक पेजवर डोनेशनसाठी अपील शेअर करू शकतात. यातून ज्या प्रकल्पांना गरज आहे, त्यांना मदत मिळू शकणार आहे.

डोनेशन प्रोसेस करण्यासाठी कसलीही फी फेसबुक घेणार नसून, उलट स्वत:च त्यासाठी खर्च करणार असल्याने १०० टक्के रक्कम संबंधित संस्थेला मिळणार आहे. अर्थात चॅरिटीमध्ये फेसबुक मागे आहे अशी स्थिती नाही. यापूर्वी फेसबुकने विकसनशील राष्ट्रांमध्ये इंटरनेट ॲक्सेसिबिलिटी वाढावी यासाठी प्रकल्प सुरू केला आहे. यातून फेसबुकला क्रेडिट कार्डची माहिती मिळणार आहे. ॲपल, गुगल आणि ॲमेझॉन विविध माध्यमांतून क्रेडिट कार्डची माहिती गोळा करत असतातच. निव्वळ क्रेडिट कार्डचा डेटा मिळवणे एवढाच उद्देश फेसबुकचा नाही. एनजीओना यूजर्स कनेक्ट झाले की जाहिरातदारांशी देखील यूजर्सची कनेक्टिव्हिटी वाढेल असा फेसबुकचा अंदाज आहे.

### हर्दवाणी यांच्याकडून 'साहित्य अकादमी सन्मान' परत

देशभरातील सर्व साहित्यिकांची सर्वोच्च संस्था मानल्या जाणाऱ्या साहित्य अकादमीमध्ये पुरस्कार देण्याविषयी भेदभाव केला जात असल्याचा आरोप करून सिंधी, हिंदी आणि मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. लक्ष्मण हर्दवाणी यांनी इरावती कर्वे यांच्या 'युगान्त' या कादंबरीच्या सिंधी अनुवादासाठी मिळालेला साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार परत केला आहे. केंद्र सरकारने अरबी आणि देवनागरी या दोन्ही लिपींना मान्यता देऊन दोन्ही लिपी समान असल्याचा निर्वाळा दिलेला आहे. मात्र, साहित्य अकादमी, बालभारती, पाठ्यपुस्तक मंडळ अशा सरकारी संस्थांमध्ये अरबी लिपीचा आग्रह धरणाऱ्यांची लॉबी प्रभावी आहे. साहित्य अकादमीमध्ये देवनागरी लिपीचे समर्थक आणि अरबी लिपीचे समर्थक असे दोन तट निर्माण झाले असून, अरबी लिपीत लिहिणाऱ्या लेखकांचाच पुरस्कारांसाठी विचार केला जात आहे. या संदर्भात साहित्य अकादमीशी पत्रव्यवहार करूनही योग्य ती उत्तरे देण्यात आली नाहीत. प्रा. हर्दवाणी म्हणाले, 'सिंधी लिपीची उत्पत्ती संस्कृत-प्राकृतपासूनच झाल्याचे पुरावे इतिहासामध्ये आहेत. सिंधी भाषेसाठी अकादमीचा पहिला पुरस्कार देवनागरी लिपीच्याच लेखकाला मिळाला होता. मात्र, त्यानंतर अरबी लिपीचा आग्रह धरणाऱ्या लोकांनी देवनागरी

लिपीच्या लेखकांना जाणीवपूर्वक मागे ठेवले आहे. त्याचा निषेध करण्यासाठी पुरस्कार परत केला आहे.'

### ➺ द्विभाषक राहतात विस्मृतीपासून दूर

दोन किंवा त्यापेक्षा अधिक भाषा बोलणाऱ्या व्यक्तींमध्ये विस्मृतीचे प्रमाण कमी असते, असा निष्कर्ष इंग्लंडमधील 'युनिव्हर्सिटी ऑफ एडिनबरा' आणि हैदराबादमधील निजाम इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सने केलेल्या संशोधनामध्ये समोर आला आहे. यासाठी विस्मृतीचा आजार असलेल्या ६०० जणांच्या चाचण्या घेण्यात आल्या.

एडिंबरा विद्यापीठातील टॉमस बाक आणि मेडिकल इन्स्टिटयूटच्या डॉक्टर सुवर्णा अल्लादी यांनी अभ्यासाअंती काढलेल्या निष्कर्षानुसार, दोन भाषांचे ज्ञान असणाऱ्या व्यक्ती तुलनेने उशिरा म्हणजे चार-पाच वर्षांनी विस्मृतीच्या व्याधीला बळी पडतात. एकच भाषा येणाऱ्या व्यक्तीमध्ये कमी वयातच ही लक्षणे दिसू लागतात. हा अभ्यास करताना सहभागींचे लिंग, निवास, देश, शिक्षण इत्यादी गोष्टींचा विचार केला गेला. ''यापूर्वी हे संशोधन कॅनडामध्ये केले गेले. तिथे अनेक द्विभाषिक राहत असल्याने मातृभाषेव्यतिरिक्त फ्रेंच, इंग्रजीदेखील भाषा बोलली जाते. दोन भाषांमध्ये बोलण्याने मेंदूचा चांगला व्यायाम होतो. यामुळे विस्मृतीची शक्यता कमी असते.

''एखाद्या कृत्रिम प्रयोगापेक्षा दोन भाषांमध्ये बोलण्याचा व्यायाम मेंदूला अधिक उपयुक्त ठरतो,'' असे अल्लादी यांनी सांगितले. या संदर्भातील संशोधन 'अमेरिकन ॲकॅडमी ऑफ न्यूरॉलॉजी'च्या पत्रिकेत प्रकाशित झाले आहे.

### ➺ 'पुणे तडका' तर्फे 'मराठी स्पंदन'

तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि इंग्रजी भाषेच्या प्रभावामुळे मागे पडत असलेल्या मराठी भाषेला वाचविण्यासाठी पुणे तडका या कृतीमंचातर्फे 'मराठी स्पंदन' ही चळवळ सुरू करण्यात आली. या उपक्रमातून मराठी भाषेचा प्रचार, प्रसार आणि ही भाषा समृद्ध करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यासाठी भाषातज्ज्ञ, साहित्यिक, लेखक, उद्योजक तसेच समाजाच्या विविध स्तरातील नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे. यात सहभागी होण्यास इच्छुक व्यक्तींनी ९३२५५४५६५७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन शाम पुणेकर यांनी केले आहे.

### ➺ शिक्षण व्यवस्थेची पुनर्रचना हवी

'आपल्याकडील शिक्षण व्यवस्थेची संपूर्ण पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी वर्गाच्या संकल्पनेत बदल घडवावा लागेल. विद्यार्थ्यांचे छोटे-मोठे

गट चर्चा करून सध्याचे प्रश्न आणि ज्ञान याची सांगड घालून समस्यांवर उत्तरे शोधू शकतील, अशा प्रकारची शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे,’ असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले यांनी महाराष्ट्र विद्यार्थी सहायक समितीच्या सायन्स शाखेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

इंटरनेटमुळे जागतिक दर्जाचे शिक्षण सर्वांना मोफत मिळू शकेल. परंतु, व्यक्तिगत सेवेसाठी पैसे द्यावे लागतील. अशा वेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवण्यापेक्षा त्यांना स्वत:हून शिकण्यासाठी मदत करणे आणि त्यांना समस्यांची उत्तरे शोधण्यास मदत करणे आवश्यक आहे, असे डॉ. ताकवले यांनी सांगितले. ज्ञान वरून खाली येण्यापेक्षा खालून वर जाईल, तेव्हाच एकविसाव्या शतकाला साजेसा समाज तयार होईल, असेही ते म्हणाले.

### ☞ मगरींचेही पक्ष्यांच्या शिकारीसाठी सापळे!

सरपटणाऱ्या प्राण्यांचा मेंदू फारसा विकसित नसल्याचे मानले जाते. शिकार करणे, खाद्य मिळविण्याच्या त्यांच्या पद्धती ठरलेल्या असतात; मात्र, टेनेसी विद्यापीठातील संशोधकांना प्रथमच काही मगरी आपले भक्ष्य पकडण्यासाठी सापळे रचतात व भक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी काही साधनांचा वापर करतात असे दिसून आले. हे संशोधन ‘इथॉलॉजी, इकॉलॉजी ॲण्ड इव्होल्यूशन’ या संशोधनपत्रिकेमध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. मानसशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक व्लादिमीर डिनेट हे मगरीच्या दोन प्रजातींच्या वर्तणुकीचा अभ्यास करत आहेत. त्यांना या प्रजाती घरट्यासाठी आवश्यक बाबींचा वापर पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी करीत असल्याचे दिसून आले. २००७ मध्ये मगरींची अशी वर्तणूक भारतात निरीक्षण करताना डिनेट यांच्या लक्षात आली. शेवाळलेल्या तळ्यामध्ये मगर आपल्या तोंडावर काटक्या ठेवून शेवाळलेल्या पाण्यात पूर्णपणे लपलेली होती. घरटे बनविण्याच्या हंगामामध्ये पक्षी काटक्यांच्या शोधात असतात. त्यामुळे या तरंगणाऱ्या काटक्यांकडे पक्षी आकर्षित होऊन जवळ आल्यानंतर त्या मगरीने त्यांचा फडशा पाडल्याचे दिसले. ही शिकारीची पद्धती मगरीमध्ये नावीन्यपूर्ण होती. त्यामुळे डिनेट व त्यांच्या सहकाऱ्यांनी ल्युझियानातील चार ठिकाणी मगरींच्या वर्तणुकीची निरीक्षणे घेतली. मार्च ते मे महिन्यात पक्ष्यांच्या अंडी घालण्याच्या आणि घरटी बनविण्याच्या हंगामात अमेरिकन मगरीही अशाच अवस्थेत दिसतात.

### ☞ महाबोधी मंदिराला दिले तीनशे किलो सोने

महाबोधी मंदिराचे बांधकाम पाचव्या-सहाव्या शतकातच झाल्याचे तज्ज्ञ सांगतात. जगभरच्या बौद्ध बांधवांसाठी हे श्रद्धास्थान मानले जाते. भगवान गौतमाला याच


## नवे कोरे

# सुखद वृद्धत्व

**डॉ. रत्नावली दातार**

**किंमत : १४०/-रु.**

**पोस्टेज :३०/-रु.**




सुखद मातृत्व', 'सुखद बालसंगोपन' या दोन पुस्तकांच्या यशानंतर याच मालिकेतले हे तिसरे पुस्तक 'सुखद वृद्धत्व'!

वृद्धत्वाला सगळ्यांनाच सामोरे जावे लागते आणि आयुष्याच्या या क्लिष्ट टप्प्यात बरेचदा अवहेलना, दुर्लक्ष किंवा एकाकीपण वाट्याला येऊन मनात भय किंवा निराशा घर करू लागते. मात्र या टप्प्याला यशस्वीपणे व सकारात्मक दृष्टीने सामोरे कसे जावे यासाठी सल्ले व छोट्या-छोट्या टिप्स या पुस्तकामध्ये दिल्या आहेत. विशेष म्हणजे ह्या टिप्स व सल्ले लेखिकेने आपल्याला आलेल्या अनुभवांतून अत्यंत मार्मिक व योग्य पद्धतीने मांडल्या आहेत. तसेच यात आवश्यक वैद्यकीय चाचण्या, एखादा आजार झाल्यावर घ्यायची काळजी यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टीही सांगितल्या आहेत. त्यामुळे हे पुस्तक केवळ वृद्धांसाठी नसून त्यांच्या घरातल्यांसाठीही आहे.

जागी साक्षात्कार होऊन 'बुद्ध'पण लाभल्याचे मानले जाते. १८० फूट उंचीचे हे मंदिर मधल्या काळात विस्मृतीत गेले होते. अलेक्झांडर कनिंगहॅम याने १९व्या शतकात ते शोधून काढले.

दीड हजार वर्षे प्राचीन असलेल्या बोधगयेतील प्रसिद्ध महाबोधी मंदिराच्या शिखराला सोन्याचे आवरण चढविण्यासाठी थायलंडने तीनशे किलो सोने पाठविले आहे. थायलंडमधून आलेले चोवीस कमांडो या सोन्याचे रक्षण करीत आहेत.

थायलंडमधील बौद्ध बांधवांनी दिलेले हे सोने विशेष विमानाने बँकॉकमधून बोधगयेत आणण्यात आले. कडेकोट बंदोबस्तात सोन्याचा पत्रा लावण्याचे काम सुरू झाले आहे.

या कामात थेट सोन्याचा वापर होत असल्याने या संपूर्ण कामाचे व्हिडिओ चित्रीकरण केले जात आहे.

थायलंडचे राजे भूमिबोल अतुल्य यांनी गेल्या वर्षीच हे काम करण्याचे ठरविले. पण भारतीय पुरातत्व विभागाकडून मंजुरी मिळण्यास वेळ लागला. त्यानंतर सोन्याचा पत्रा चढविण्यापूर्वी विशिष्ट रासायनिक प्रक्रिया करण्यात आली.

### ☞ कम्प्युटरची जागा घेणे टॅब्लेटला शक्य होईल का?

देशभरात स्मार्टफोन, टॅब्लेटच्या विक्रीत होणारी भलीमोठी प्रचंड पाहता पीसीच्या (डेस्कटॉप आणि लॅपटॉप) विक्रीत घट होण्याची अथवा बाजारातून त्यांचे अस्तित्व संपण्याची भीती वर्तविण्यात येत होती. मात्र, मार्केट रिसर्च कंपनी 'सायबरमीडिया'ने केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणावरून ही भीती अनाठायी ठरल्याचे दिसून आले आहे. स्मार्टफोन, टॅब्लेटची वाढती विक्री पीसीचे साम्राज्य खालसा करू शकणार नसल्याचे २० शहरांमधील ७८ टक्के यूजर्सनी म्हटले आहे.

'सायबरमीडिया'चा 'इंडियन टॅब्लेट्स कंझ्युमर यूसेज अॅन्ड अॅडॉप्शन ट्रेंड्स २०१३' हा अहवाल नुकताच प्रकाशित करण्यात आला. त्यात चारपैकी तीन यूजरनी मोबिलिटीसाठी अद्याप पीसीच सर्वोत्तम असल्याचे म्हटले आहे. टॅब्लेट, स्मार्टफोनच्या तुलनेत पीसीद्वारे इंटरनेटचा वापर करणे, सोशल नेटवर्किंगचा वापर करणे आणि मनोरंजनाचा लाभ घेणे अधिक सुखद करणारे आहे. 'इंटरनेटच्या वापरात पीसीची जागा कोणीही घेऊ शकणार नाही. कारण, टॅब्लेटद्वारे करण्यात येणारा इंटरनेटचा वापर प्राथमिक अवस्थेत आहे. या उपकरणाचा देशात फारसा प्रसार झालेला नाही. त्यामुळे कम्प्युटिंगसाठी अजूनही आम्ही पीसीलाच अधिक प्राधान्य देत आहोत,' असे यूजर्सनी म्हटले आहे.

### ☞ 'स्का' महादुर्बिणीद्वारे परग्रहावरील प्रगत जीवसृष्टीचा वेध घेणे शक्य!

'जगातील सर्वात मोठी 'स्क्वेअर किलोमीटर अॅरे' (स्का) ही दुर्बीण ५०

प्रकाशवर्षे अंतरामध्ये असलेल्या परग्रहावरील विमानांच्या रडार लहरी टिपू शकेल. तिथे कुठे प्रगत जीवसृष्टी असल्यास त्याचा वेध घेणे शक्य होईल,' अशी माहिती स्का महादुर्बीण प्रकल्पाचे संचालक डॉ. फिल डायमंड यांनी दिली.

'या महादुर्बिणीमध्ये पन्नास वर्षे काम करण्याची क्षमता आहे. तसेच सध्याच्या सर्वोत्तम असलेल्या न्यू मेक्सिको येथील इव्हीएलए दुर्बिणीपेक्षा ५० पट अधिक एकेएची क्षमता असेल. या महादुर्बिणीच्या माध्यमातून एक दशलक्ष स्क्वेअर किलोमीटर इतक्या क्षेत्रफळामधील गोष्टींचा अभ्यास करता येणार आहे. तिचा वेगही दशलक्ष पटीने अधिक असेल. तिची फ्रिक्वेन्सी ५० मेगा हर्ट्झ ते १० गिगा हर्ट्झ इतकी असेल. कृष्णविवर, आकाशगंगा, गुरुत्वाकर्षण, चुंबकीय लहरी आणि परग्रहावरील जीवसृष्टी यांच्याविषयी अधिक सखोल अभ्यास करण्यासाठी ही महादुर्बीण उपयोगी पडेल,' असे ते म्हणाले.

स्का महादुर्बीण उभी करण्याच्या प्रकल्पामध्ये भारतासह जगातील अकरा देशांचा समावेश आहे. यामध्ये 'दुर्बीण व्यवस्थापना'च्या रचनेचे काम पुण्यातील 'नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्स'च्या (एनसीआरए) नेतृत्वाखाली होणार आहे. दुर्बीण व्यवस्थापन या प्रकल्पाची मज्जासंस्था असेल, असे डायमंड यांनी सांगितले. एसकेए दोन टप्प्यांमध्ये ऑस्ट्रेलिया येथील मर्चिसन व दक्षिण आफ्रिका येथील कारू येथे उभारण्यात येणार आहे. त्यातील पहिला टप्पा सन २०२० मध्ये पूर्ण होईल. संपूर्ण महादुर्बीण पूर्ण होण्यास २०२४ साल उजाडेल. या प्रकल्पामध्ये दोन्ही ठिकाणी मिळून एकूण २५०० डिश व एक कोटी ॲन्टेना बसविण्यात येणार आहेत. भौतिकशास्त्राशिवाय या महादुर्बिणीचा उपयोग जीपीएस, दिशादर्शन, रडार खगोलशास्त्रज्ञ, वायफाय यांसारख्या क्षेत्रामधील संशोधनासाठी होऊ शकतो, असेही ते म्हणाले, हा प्रकल्प उभा करण्यासाठी आणि चालवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची गरज आहे. तसेच विविध देशांनी आर्थिक पाठबळ देण्यासाठी तयार असायला हवे, असे त्यांनी सांगितले.

### ➾ जपानी भाषा कार्यशाळेचे 'टिमवि'तर्फे आयोजन

जपानी भाषा सोप्या रीतीने कशी शिकवावी, जपानी भाषेतील पुढील संधी तसेच व्याकरणातील चुका टाळण्यासाठी काय प्रयत्न करावेत आणि हसत-खेळत जपानी भाषेचा अभ्यास कसा करावा या विषयी भारतीयांमध्ये माहिती प्रसारित करण्याच्या हेतूने टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे जपानी भाषा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जपान फौंडेशनचे सल्लागार यासुजीरो थाकेड, ओसादा कानाको आणि प्राध्यापक विनय साठे यांनी जपानी भाषेच्या बारकाव्यांची माहिती दिली. जपानी भाषेच्या माध्यमातून करिअर करण्यासाठी उपलब्ध होत चाललेल्या विविध संधींची या वेळी उपस्थितांना माहिती देण्यात आली. आयटीसारख्या क्षेत्रात जपानी भाषेचे

महत्त्व वाढत आहे. जपानी लोक अनोळखी व्यक्तीला देखील आपलासा करून घेतात. मोठमोठे उद्योग समूह जपानमध्ये प्रवेश करत आहेत. त्यामुळे भाषांतरकार, दुभाषक म्हणून मोठी संधी आहे.

### माकडांना आवडतोय टचस्क्रीन कॉम्प्युटर!

माकडांना टचस्क्रीन कॉम्प्युटरबरोबर टॅबलेटही आवडतोय असं एका नव्या संशोधनानुसार दिसून आलं. टचस्क्रीन कॉम्प्युटर माकडांना निवांत व्हायला मदत करतात, असं यातून उघड झालंय. यासाठी पोर्टसमाऊथ विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी हॅम्पशिअरमधील मारवेल वन्यजीव उद्यानातील ‘सुलवेसी क्रस्टेड मॅक्स’ जातीच्या माकडांच्या गटावर प्रयोग करून पाहिला, शास्त्रज्ञांनी या दुर्मिळ माकडांच्या आकलनशक्तीला आव्हान देणारा म्हणजे टचस्क्रीन कॉम्प्युटर वापरणे अशा गोष्टी शिकवल्या. यातून आकलनशक्तीबरोबरच त्यांच्यातील संवादही अभ्यासला. गटातील काही बलवान माकडे इतरांना बाजूला टाकून एकटेच टचस्क्रीन वापरत. अशावेळी अन्य माकडे मजा करत. या दरम्यान, त्यांच्या ओठांच्या हालचाली वाढलेल्या जाणवल्या. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी असलेला हा त्यांच्यातील मैत्रीपूर्ण संवाद असल्याचे निरीक्षण शास्त्रज्ञांनी नोंदवले आहे.

### ‘वन चाइल्ड पॉलिसी’ला चीनचा पूर्णविराम

जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चीनने आता ‘वन चाइल्ड पॉलिसी’ला (एक अपत्य धोरण) पूर्णविराम दिला आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकीत हा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आल्याची माहिती चीनच्या झिन्हुआ वृत्तसंस्थेने दिली. या निर्णयामुळे चीनमधील दांपत्यांना आता दुसऱ्या अपत्याला जन्म देता येणार आहे.

लोकसंख्यावाढीचा वेग लक्षात घेऊन चीनमध्ये ७०व्या दशकात एक अपत्य धोरण जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार ज्या पती-पत्नींपैकी दोघेजण त्यांच्या आई-वडिलांचे एकच अपत्य असेल तरच त्यांना एकापेक्षा जास्त मुलांना जन्म देण्याची अनुमती होती. अशी दांपत्ये वगळता इतर सर्व दांपत्यांना केवळ एकाच अपत्याला जन्म देता येत होता. दुर्गम भागातील काही आदिवासी जमातींना मात्र या नियमातून सूट देण्यात आली होती.

गेल्या काही वर्षांत चीनमधील लोकसंख्येचा समतोल विकास होत नसल्याचे स्पष्ट झाले. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण घटले होते, तसेच या धोरणामुळे चीनमधील तरुणांच्या संख्येत घट होऊन कामकरी तरुणांची कमतरता जाणवू लागली. त्यामुळे लोकसंख्येच्या दीर्घकालीन समतोल विकासाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर

ठेवून कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकीत 'वन चाइल्ड पॉलिसी'ला 'गुडबाय' करण्यात आला.

| **देश** | **लोकसंख्या (२०१२)** |
|---|---|
| चीन | १३४ कोटी |
| भारत | १२२ कोटी |
| अमेरिका | ३१ कोटी |
| इंडोनेशिया | २४ कोटी |
| ब्राझील | १९ कोटी |

### की बोर्डवरील उपयुक्त शॉर्टकट्स

कम्प्युटरवरील अनेक सोप्या बाबी चटकन हातावेगळ्या करतानाही माउस हाताळण्याचा कंटाळा येतो... अनेकदा मजकूर सिलेक्ट करण्यासाठी माउसचा वापर करावाच लागतो, असे काही नाही. मायक्रोसॉफ्ट विंडोज, वर्ड, पॉवरपॉइंट आणि एक्सेल यामध्ये वापरता येणारे अनेक शॉर्टकट की-बोर्डवर असतात. त्यामुळे कम्प्युटर वापरणे अधिक सोपे आणि वेगवान होते. अशा शॉट्र्कटचा वापर करण्यावर भर दिला पाहिजे. एखादा टॅब उघडणे आणि बंद करण्यासाठी माउस वापरण्याची गरज नाही. समजा एखादा ऑनलाइन व्हिडिओ पाहत असाल वा क्रोम, फायरफॉक्स या ब्राउजरमध्ये एखादा लेख वाचत असाल आणि तो बंद करायचा असल्यास काय कराल?

मायक्रोसॉफ्ट वर्डमध्ये प्रोजेक्ट तयार करीत असतात आणि फाँटचा आकार बदलायचा झाल्यास काय करावे, असा पडतो. प्रत्येकवेळा माउस वापरण्याऐवजी संबंधित मजकूर सिलेक्ट करून दाबावे. यामुळे मजकुराचा फॉन्ट वाढतो. मजकुराचा फाँट कमी करण्यासाठी मजकूर सिलेक्ट करून दाबावे. कम्प्युटर काम करताना विशेषत: नेट वापरताना अनेक विंडो उघडल्या जातात. प्रत्येक वेळी संबंधित विंडोला जाण्यासाठी माउसपर्यंत हात नेण्याचा कंटाळा येऊ शकतो. मात्र सगळ्या विंडो माउसचा वापर न करता पाहता येऊ शकतात आणि सिलेक्ट करता येऊ शकतात. यासाठीचा वापर करावा. कम्प्युटरवर विंडोज ७ वा ८ असल्यास विंडो की आणि टॅबचा वापर करून एका प्रोग्रॅमवरून दुसऱ्या प्रोग्रॅमवर जाता येते. या ठिकाणीचाही वापर करता येऊ शकतो.

विंडो की आणि टॅबचा वापर केल्यास स्क्रीनवर एकापाठोपाठ एक, अशा विविध प्रोग्रॅमच्या (एकाहून अधिक प्रोग्रॅम सुरू असल्यास) विंडो समोर येतात. कम्प्युटरवर काम करताना इंटरनेट आणि डॉक्युमेंट फाइलमध्ये स्वीचिंग होणेही किचकट वाटू शकते. त्यामुळे दोन्ही विंडो दोन बाजूला ठेवून काम करता येऊ

शकते. यासाठी वर्ड डॉक्युमेंट उघडावी विंडो की आणि लेफ्ट ॲरो दाबावा. यामुळे डिस्प्ले डावीकडे जातो. यानंतर ब्राउजर ओपन करून विंडो की क्लिक करावी आणि त्याबरोबर राइट ॲरो की दाबावे. यामुळे संबंधित विंडो उजव्या बाजूला अर्धी सरकते. हे शॉर्टकट छोटे असले आणि सुरुवातीला लक्षात ठेवण्यास काहीसा त्रास झाला, तरी कम्प्युटर वापरण्याचा अनुभव उंचावण्यासाठी हे शॉर्टकट महत्त्वाचे ठरू शकतात. त्यामुळे हे वापरून पाहण्यास काहीच हरकत नसावी.

### ‘इच्छा नसताना’ कादंबरीचे प्रकाशन

दिगंबर विष्णू जोशी लिखित ‘इच्छा नसताना’ कादंबरीचे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांच्या हस्ते झाले. ‘कादंबरीतील नायक बलात्कारपीडित स्त्रीशी लग्न करून नात्याचे पावित्र्य जपतो. त्यामुळे कादंबरी वाचून समाजाचा अशा घटनांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल,’ असे मत सारडा यांनी व्यक्त केले. या वेळी ‘दिगंबर विष्णू जोशी प्रतिष्ठान’चे उद्घाटनही यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. हेमंत देवस्थळी, विश्वास वसेकर उपस्थित होते.





| १ वर्षाची वर्गणी | तीन वर्षांची वर्गणी | पाच वर्षांची वर्गणी |
|---|---|---|
| १००/- | ३००/- | ४००/- |

‘ग्रंथजगत’ वाचा हवा तेव्हा आणि हवा तिथे
आणि सवलतीत पुस्तके मिळवा.

अधिक माहितीसाठी **www.mehtapublishinghouse.com** या संकेतस्थळाला भेट द्या.




# स्वातंत्र्यलढ्याचा मौल्यवान ठेवा दुर्मिळ

स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास सहज उपलब्ध व्हावा या हेतूने सन १९८५ मध्ये ‘इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेण्डन्स-व्हिज्युअल्स ॲन्ड डॉक्युमेन्टस’ हा मौल्यवान ग्रंथ प्रसिद्ध करण्यात आला होता, हे आज फार कमी लोकांना ठाऊक असेल.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला १०० वर्षे पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) तो प्रसिद्ध केला होता. मात्र त्यात काँग्रेसविषयी काही नसून केवळ स्वातंत्र्यलढ्याच्या सोनेरी इतिहासाचा समावेश करण्यात आला होता. १८५७चे स्वातंत्र्ययुद्ध, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना, त्यातील जहाल व मवाळगट, बंगालची फाळणी, पहिले महायुद्ध, महात्मा गांधीजींचा राजकीय चळवळीतला प्रवेश, जालियनवाला बाग हत्याकांड, खिलाफत आणि असहकार चळवळ, दांडीयात्रा, संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी, मिठाचा सत्याग्रह, गोलमेज परिषद, १९४२ची चलेजाव चळवळ, नाविकांचे बंड, कामगारांचे देशव्यापी आंदोलन, भारताची फाळणी, संस्थानिकांचे विलीनीकरण आदी महत्त्वाच्या घटनांची सचित्र माहिती या ग्रंथात अंतर्भूत आहे. भारताच्या प्रत्येक प्रांतात स्वातंत्र्यलढा लढला गेला. त्यामुळे या लढ्याची सविस्तर आणि सचित्र माहिती जमविणे हे सोपे काम नव्हते. प्रत्येक प्रांतातील जाणकार व इतिहास संशोधकांकडून ती अत्यंत मेहनतीने जमविली गेली. महाराष्ट्रातून ठाण्यातील डॉ. अरुण जोशी यांनी यासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्याकडील अनेक दस्तावेज व चित्रे ग्रंथासाठी मोलाची ठरली. देशभरातील प्रादेशिक भाषांमधील क्रांतिगीतांचे इंग्रजी अनुवाददेखील या ग्रंथात आहेत. कुसुमाग्रजांच्या ‘क्रांतीचा जयजयकार’ आणि कुंजविहारी यांच्या ‘तयाला तुरुंग भिववील किती?’ या दोन मराठी गीतांचा अनुवाद डॉ. जोशींनी इंग्रजीत केला व तो या ग्रंथात समाविष्ट आहे. म्हणूनच डॉ. जोशींचा गौरवपूर्ण

उल्लेख ग्रंथाच्या प्रस्तावनेत आहे.

मात्र, देशभरातून संकलित केलेल्या आणि अतिशय आकर्षकपणे मांडला गेलेला भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा हा सोनेरी इतिहास आज सहजपणे उपलब्ध नाही, हे दुर्दैव आहे. तीन दशकांपूर्वी या ग्रंथाच्या १० हजार प्रती छापण्यात आल्या होत्या. त्या हातोहात संपल्या. परंतु त्यानंतर या ग्रंथांच्या पुनर्मुद्रणाचा प्रयत्नच न झाल्याने आज त्याच्या मोजक्याच प्रती इथेतिथे पाहायला मिळतात, असा डॉ. जोशी यांचा विदारक अनुभव आहे.

■

## आगामी


# ट्रू ब्लू

मूळ लेखक

**डेबोरा एलिस**

अनुवाद

**श्यामला पेंडसे**




जेस आणि केसी ह्या दोघीही एका शिबिरात समुपदेशिकेचे काम करत असताना, छोटी स्टेफनी नाहीशी होते; ...तिच्या खुनासाठी केसीला अटक होते.

आपल्या या जिवलग मैत्रिणीला सोडविण्यासाठी जेस रोज रात्री दोन वाजता आपली सायकल घेऊन गावातील काळोख्या रस्त्यातून निर्हेतुकपणे भटकत राहते; पुढे काय करायचे, याचे बेत आखत राहते....




★ **कमलाबाई ओगले पुरस्कार**

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नऊ महिलांना 'मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशन' तर्फे कमलाबाई ओगले पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

दहा हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी कमलाबाई ओगले यांनी लिहिलेल्या रुचिरा भाग-१ या पाककलेच्या पुस्तकाची पन्नासावी तर रुचिरा भाग-२ या पुस्तकाची एकविसावी आवृत्ती प्रकाशित झाली.

माणदेशी महिला सहकारी बँकेच्या संस्थापक चेतना सिन्हा, प्रगती अभियान संस्थेतर्फे मजुरांच्या हक्काबाबत कार्य करणाऱ्या अश्विनी कुलकर्णी, वाया जाणाऱ्या अन्नाचा वापर शेतीला खत म्हणून करण्यासाठी 'अर्बन लीव्हज' या उपक्रमाद्वारे काम करणाऱ्या प्रीती पाटील, 'अप्लाईड एन्व्हायरनमेंटल रीसर्च फाऊंडेशन'च्या संचालक डॉ. अर्चना गोडबोले, पेडणेकरवाडी येथे भगीरथ संस्थेतर्फे पाणी व्यवस्थापनाचे कार्य करणाऱ्या गौरी खवणेकर, 'नर्मदा' या उपक्रमाच्या माध्यमातून मध्य प्रदेशातील वंचित मुलांसाठी काम करणाऱ्या भारती ठाकूर, गोबीचे वाळवंट पार करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला सुचेता कडेठाणकर, गुप्तहेर स्मिता गोडबोले, कमलाबाई यांच्या शिष्या आणि केटरींग व्यावसायिक छाया वैद्य हे पुरस्काराचे मानकरी ठरले. (त्यांचे परिचय पृष्ठ १०४ ते १०७ वर पाहा.)

★ **ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांना आशा भोसले पुरस्कार**

पिंपरी नाट्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा आशा भोसले पुरस्कार यंदा ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांना देण्यात आला.

एक लाख ११ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या कार्यक्रमाला पं. हृदयनाथ मंगेशकर, नाट्यपरिषदेचे कार्यवाह दीपक करंजीकर, आमदार लक्ष्मण जगताप, आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून २००२ पासून हा पुरस्कार दिला जातो.

शास्त्रीय संगीताची परंपरा असलेल्या वाडकर यांनी चित्रपट संगीतात मोठे योगदान दिले आहे. १९७६ पासून त्यांनी विविध भाषांमध्ये ५०० हून अधिक चित्रपटांत गाणी गायली आहेत.

### ★ झुबिन मेहता यांना 'यशवंतराव चव्हाण' पुरस्कार

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा 'यशवंतराव चव्हाण' राष्ट्रीय पुरस्कार जागतिक दर्जाचे संगीतकार झुबिन मेहता यांना जाहीर करण्यात आला. यशवंतराव चव्हाण यांच्या २९ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात केंद्रीय कृषिमंत्री आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत या पुरस्काराविषयी घोषणा करण्यात आली.

### ★ सतीश काळसेकर यांना साहित्य अकादमी पुरस्कार

''पुस्तकं असतात सच्च्या मित्रांसारखी, पुस्तकं असतात सच्च्या मित्रांसारखी, पुस्तकं असतात फुलपाखरांसारखी'' अशा भावना अभिव्यक्त करणारे ज्येष्ठ साहित्यिक सतीश काळसेकर यांना अखिल भारतीय साहित्य अकादमीचा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे.


यंदाच्या मानकऱ्यांमध्ये ज्येष्ठ गीतकार खासदार जावेद अख्तर (उर्दू) व तुकाराम रामा शेठ (कोकणी) यांचाही समावेश आहे. ११ मार्चला दिल्लीत या पुरस्काराचे वितरण होईल, असे साहित्य अकादमीचे मुख्य सचिव के. श्रीनिवास राव यांनी सांगितले.

**अन्य विजेते** (कंसात भाषा) **:** सुबोध सरकार (बंगाली), अनिल बारो (बोडो), सीताराम सपोलिया (डोंगरी), तेम्सुला आओ (इंग्रजी), मृदुला गर्ग (हिंदी), सी. एन. रामचंद्रन (कन्नड), मोईनुद्दिन रेशी (काश्मिरी), सुरेश्वर झा (मैथिली), एम. एन. पल्लोर (मल्याळम), मखोनमणी मोंग्साबा (मणिपुरी), मानबहादूर प्रधान (नेपाळी), विजय मिश्रा (ओडिया), मनमोहन (पंजाबी), अंबिका दत्त (राजस्थानी), राधाकांत ठाकूर (संस्कृत), अर्जुनचरण हेंबराम (संथाली), आर. एन. जो डिक्रुझ (तमीळ), कात्यायनी विद्‌महे (तेलगू).

### ★ समीक्षात्मक सदरलेखनाला पुरस्कार

''साहित्य अकादमी''च्या पुरस्कारासाठी माझ्या कवितासंग्रहाची दखल घेतली

नवे कोरे




# हुकूमशाहीच्या सावलीत

मूळ लेखिका
**वेंडेल स्टीव्हन्सन**

अनुवाद
**अशोक पाथरकर**

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

जुलमी हुकूमशहापासून तुम्हाला स्वत:चे रक्षण करता येत नसेल, तर तुम्ही तुमच्या कुटुंबाचे रक्षण कसे कराल?...

जनरल कमेल सचेत हे दीर्घकाळ चाललेल्या इराण-इराक युद्धातील सन्मानित 'हिरो' आणि सद्दाम हुसेनच्या आवडत्या लोकांपैकी एक होते. ते एक निष्ठावान कौटुंबिक व्यक्तीसुद्धा होते; त्यांच्याविषयी त्यांच्या मुलांना आणि मुलींना प्रचंड आदर होता, ते कुटुंबाचा आधारही होते. आणि त्यांनी कुटुंबासाठी अनेक क्लेशही सहन केले होते.

पण शेवटी ज्या दहशतवादी सत्तेने त्यांच्या देशाचा आणि लोकांचा गळा दाबला, त्यात आपलासुद्धा किती मोठा सहभाग आहे, हे जेव्हा सचेतच्या लक्षात आले, तेव्हा फार उशीर झाला होता...

नाही म्हणून मी नाराज नाही किंवा मला हा अपमानही वाटत नाही. याउलट कोणत्याही साहित्यप्रकारात न मोडणाऱ्या माझ्या एका वेगळ्याच प्रकारच्या पुस्तकाची या पुरस्कारासाठी निवड झाली म्हणून माझ्या मनात आनंद अन् आश्चर्य आहे,'' अशी भावना ज्येष्ठ कवी सतीश काळसेकर यांनी व्यक्त केली.

'वाचणाऱ्याची रोजनिशी' या काळसेकर यांच्या लेखसंग्रहाला 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार जाहीर झाला. त्यानंतर 'काळसेकर हे कवी म्हणून प्रसिद्ध असल्याने त्यांच्या कवितासंग्रहालाच हा पुरस्कार मिळायला हवा होता; यापूर्वी कवी ग्रेस यांच्याबाबतीतही असेच झाले होते,' अशी खंत साहित्यक्षेत्रातून व्यक्त झाली. काही लेखकांनी उघडपणे आपल्या 'फेसबुक'वरही ती व्यक्त केली. काळसेकर म्हणाले, ''मी लिहिलेल्या कविता त्यांना ताकदीच्या वाटल्या नसाव्यात; पण या पुरस्कारासाठी साचेबंद साहित्यप्रकारात न मोडणाऱ्या पुस्तकाची निवड करणे, हेही एक अकादमीच्या निवड समितीच्या शहाणपणाचेच लक्षण होय. यानिमित्ताने 'वाचणाऱ्याची रोजनिशी'चा साहित्यात समावेश झाला, असे वाटते. चित्रपट, नाटक, संगीत, दिवाळी अंक, भूगोल, इतिहास, मराठी भाषेसह अन्य जागतिक भाषा अशा नानाविध विषयांतून मी घेतलेला आनंद पुस्तकरूपाने वाचकांसमोर आणला. यातील विषय प्रचंड गुंतागुंतीचा आहे. वाचकांचे कलेवरील प्रेम वाढावे, या दृष्टिकोनातून तो मी लिहिला. त्यासाठी वेगळा 'फॉर्म्युला' वापरला.''

''वाचनसंस्कृती लोप पावतेय, अशी खंत अनेक जण व्यक्त करतात; पण मला निराशेपेक्षा आशेचा सूर महत्त्वाचा वाटतो. समाजात वाचनाची भूक वाढत आहे. त्यामुळेच लिहिणारा वर्गही वाढत चालला आहे. महानगरे सोडली तर इतर भागात, खेडेगावात वाचनाची गोडी वाढत आहे. म्हणून साहित्य संमेलनासारख्या सोहळ्याला प्रचंड गर्दी होताना दिसत आहे,'' असे काळसेकर यांनी सांगितले.

राज्याच्या मराठी भाषा सल्लागार समितीवर ते सदस्य म्हणून कार्यरत आहेत. समितीच्या भाषा धोरणाबद्दल ते म्हणाले, ''कोणत्याही धोरणाची अमंलबजावणी करणारा, निर्णय घेणारा घटक किती जबाबदारीने त्याकडे पाहतो, यावर त्या धोरणाचे भवितव्य अवलंबून असते.''

### ★ 'सी. व्ही. रमण पुरस्कार'

'रीसर्चस ॲन्ड नॅचरली क्लेव्हर ह्युमन ऑर्गनायझेशन'तर्फे (रँचो) देण्यात येणारा 'सर सी. व्ही. रमण पुरस्कार' गरवारे महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. करुणा परदेशी आणि विज्ञान पत्रकार मयुरेश प्रभुणे यांना १० डिसेंबर रोजी सिम्बायोसिस विश्वभवन येथे ज्येष्ठ संशोधक डॉ. दिनेश अमळनेरकर यांच्या हस्ते देण्यात आला.

## ★ 'त्रिसुपर्ण', 'वडाची साल पिंपळाला' प्रकाशनाच्या वाटेवर

'चिमणराव-गुंड्याभाऊ' या लोकप्रिय व्यक्तिरेखांचे जनक चिंतामण विनायक ऊर्फ चिं. वि. जोशी यांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशनाच्या मार्गावर असून, 'त्रिसुपर्ण', 'वडाची साल पिंपळाला' ही दोन पुस्तके वाचकांपुढे येतील.

हलक्याफुलक्या विनोदामुळे साहित्यप्रेमींच्या मनात चिं. वि जोशी यांचे स्वतंत्र स्थान आहे. विनोदातून मार्मिक भाष्य करण्याची त्यांची विशेष हातोटी होती.

यंदा 'चिं. विं'चे पन्नासावे स्मृती वर्ष आहे.

'चिं. विं.'च्या नात अलका जोशी-मांडके यांनी याविषयी माहिती दिली. या दोन पुस्तकांव्यतिरिक्त चिं. वि. जोशी यांचे वडील विनायक रामचंद्र जोशी यांची अपूर्ण राहिलेली 'प्रवरा' ही कादंबरी चिं. विं. नी पूर्ण केली होती. तसेच चिं. विं. च्या अपूर्ण राहिलेल्या 'बालयोगी' कादंबरीचे लेखन म. वि. जोशी यांनी पूर्ण केले होते. सुमारे ५०-६० वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या या दोन्ही कादंबऱ्या सध्या बाजारपेठेत उपलब्ध नाहीत.

## ★ जीवनाच्या अनुभूतीतूनच अभिव्यक्ती

'मनात सल असेल, तरच अस्सल साहित्य निर्मिती करता येते. सद्भावना असलेले लेखन वाचकांच्या हृदयाला भिडत असल्याने जीवनाची अनुभूती असल्याशिवाय अभिव्यक्ती होत नाही,' असे मत प्रा. फ. मुं. शिंदे यांनी व्यक्त केले.

अमेय प्रकाशनतर्फे उर्मिला विश्वनाथ कराड यांच्या 'अनुभूती,' 'माझी माय दुधावरची साय', 'अरे संसार संसार' या तीन काव्यसंग्रहाचे प्रकाशन शिंदे यांच्या हस्ते झाले. एमआयटीचे संस्थापक विश्वनाथ कराड, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, कवी इंद्रजित भालेराव, अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य आदी या वेळी उपस्थित होते.

आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात मराठी मरणार असल्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर वैद्य म्हणाल्या, ''गावाकडे मराठी बोलली जाते, तोपर्यंत मराठी भाषेला मरण नाही. बालसाहित्याच्या माध्यमातून लहान मुलांवर मराठीचे संस्कार घराघरांतून झाले पाहिजेत.''

कविता करणे सोपे नाही. कवितेमध्ये मोठी ताकद आहे. 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' या कवितेने महाराष्ट्रातील तरुण प्रेरित झाला होता. साहित्य, संगीतातून मिळणारा आनंद अलौकिक असल्याने जगातून काव्य, संगीत वजा केल्यास जगणे रूक्ष होऊन जाईल. आनंद देणे हीच उत्तम साहित्याची कसोटी असते,' असे मत भावे यांनी मांडले.

जगण्यातील अनुभूतीची उदाहरणे देऊन शिंदे यांनी रचना प्राचीन का अर्वाचीन यापेक्षा ती खरी का खोटी हे जास्त महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

## ★ ब्रिटनमध्ये कापडी बांधणीच्या पुस्तकांचा नवा ट्रेंड

ब्रिटिश साहित्यातील गाजलेली इंग्रजी पुस्तके, कादंबऱ्या, कथासंग्रह, अद्भुतरम्य कथा, गोष्टींची पुस्तके यांना कापडी बांधणीचा साज देऊन ती वाचकांसमोर आणण्याचा नवीन ट्रेंड सध्या लंडनमध्ये आला असून, कापडी बांधणीमुळे आकर्षक दिसणाऱ्या या पुस्तकांना वाचकांचाही चांगला प्रतिसाद लाभतो आहे. 'पेंग्विन बुक्स' या ब्रिटिश कंपनीने आपल्या ३१ गाजलेल्या पुस्तकांची मालिका 'क्लॉथबाउंड क्लासिक्स' नावाने बाजारात आणली असून, भारतीय चलनानुसार या पुस्तकांच्या संचाची किंमत सुमारे पस्तीस हजार रुपये आहे.

'पेंग्विन बुक्स'ने ए ख्रिसमस ॲन्ड अदर ख्रिसमस रायटिंग', 'द टेल ऑफ टू सिटीज', 'ॲलिस ॲडव्हेंचर्स इन वंडरलँड ॲन्ड थ्रू द लूकिंग ग्लास', 'ब्लिक हाउस', 'क्रॅनफोर्ड', 'ड्रॅक्युला', 'इमा', 'फार फ्रॉम दि मॅडिंग क्राउड', 'ग्रेट एक्सपेक्टेशन्स', 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स', 'हार्ड टाइम्स', 'द डिवाइन कॉमेडी', 'जेन आय', 'लेडी चॅटर्लीक् लव्हर', 'लिटिल वुमन', 'मॅनफिल्ड्स पर्क', 'मिडल मार्च', 'नॉर्थ अँगर ॲबे', 'ऑलिव्हर ट्विस्ट', 'परक्युशन', 'प्राइड ॲन्ड प्रिज्युडाइस', 'सेन्स ॲन्ड सेन्सिबिलिटी', 'दि ओडिसी', 'दि वुमन इन व्हाइट' इत्यादी गाजलेली पुस्तके खास कापडी बांधणीच्या स्वरूपात आणली असून, 'जुनं ते सोनं' असे म्हणत येथील वाचकांनीही ही कल्पना उचलून धरली आहे. कापडी बांधणीमुळे या पुस्तकांना 'क्लासिक' लूक तर येतो; त्याचबरोबर पुस्तकांच्या कपाटाचे सौंदर्यही वाढते, असे संस्थेने म्हटले आहे.

## ★ बॅडमिंटन विजेतेपद पी. व्ही. सिंधू

विजेतेपद आणि सातत्यपूर्ण कामगिरीमुळे अव्वल खेळाडूंना टक्कर देण्याचा आत्मविश्वास मिळाला, असे युवा बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने सांगितले. २०१३ मध्ये सिंधूने मलेशिया स्पर्धेचे जेतेपद पटकावले. त्यानंतर जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदकाची कमाई केली आणि काही दिवसांपूर्वी झालेल्या मकाऊ स्पर्धेच्या जेतेपदावर तिने कब्जा केला.

''आंतरराष्ट्रीय स्पर्धा अतिशय तीव्र स्वरूपाची आहे. अनेक चांगले खेळाडू आहेत. चीन किंवा मलेशियाच्या खेळाडूंविरुद्ध खेळणे माझ्यासाठी मानसिकदृष्ट्या अडथळ्याचे नाही. जशी खेळायची संधी मिळते, तसा आत्मविश्वास वाढत जातो,'' असे सिंधूने सांगितले.

ती पुढे म्हणाली, ''यंदाचे वर्ष माझ्यासाठी चांगले गेले आहे. विजेतेपद आणि अव्वल खेळाडूविरुद्ध विजयांनी आत्मविश्वास वाढला आहे. सध्याचा चांगला फॉर्म कायम राखण्याची इच्छा आहे.''

जागतिक अजिंक्यपद आणि आयबीएल (इंडियन बॅडमिंटन लीग) स्पर्धेनंतर कामगिरीच्या घसरणीबाबत विचारले असता सिंधू म्हणाली, ''त्या कालखंडात मी काही सामने गमावले. मला वाईट वाटले होते. पण हा खेळाचा भाग आहे. मात्र चांगले खेळण्याचा निर्धार मी कायम ठेवला.''

ती पुढे म्हणाली, ''सध्या माझे वेळापत्रक व्यस्त आहे. या महिन्यात वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा आहे. आणखीही काही महत्त्वाच्या स्पर्धा आहेत. पी. गोपीचंद यांचे मला सातत्याने मार्गदर्शन सुरू आहे. मला या स्पर्धांसाठी तंदुरुस्त राहायचे आहे आणि सरावावर लक्ष केंद्रित करायचे आहेत.''

## ★ विज्ञानात चमकणाऱ्यांनी संशोधनात रस घ्यावा

पुण्यामध्ये आंतरराष्ट्रीय ज्युनिअर सायन्स ऑलिम्पियाडचे आयोजन करण्यात आले होते. भारतामध्ये यापूर्वी वरिष्ठ गटासाठी १९९६ मधील मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड, २००१ मधील केमिस्ट्री ऑलिम्पियाड, २००६ मधील ॲस्ट्रोनॉमी ऑलिम्पियाड, २००८ मधील बायोलॉजी ऑलिम्पियाड आणि अगदी अलिकडे यंदाच झालेले अर्थसायन्स ऑलिम्पियाड आयोजित करण्यात आले होते. मात्र, ज्युनिअर ऑलिम्पियाड आयोजित करण्याची संधी भारताकडे पहिल्यांदाच चालून आली आहे.

पुण्यात आणि भारतामध्ये पहिल्यांदाच आयोजित आंतरराष्ट्रीय ज्युनिअर सायन्स ऑलिम्पियाड भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या वैज्ञानिक ज्ञानाचे दर्शन घडविणारी ठरली. हा उपक्रम म्हणजे आपल्याकडील हुशार विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या स्पर्धात्मक वातावरणातून स्वत:ला जागतिक पातळीवर सिद्ध करण्याची संधीही असल्याचे सांगून डॉ. माशेलकर म्हणाले, ''विज्ञान हेच भारताचे भवितव्य आहे. त्यातूनच बलशाली भारताची उभारणी होणार आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे का वळावे आणि विज्ञानाच्या क्षेत्रात पाऊल ठेवल्यानंतर आपल्यासमोर नेमके काय उद्दिष्ट ठेवावे. हे स्पष्ट करून विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकृष्ट करण्याचे कामही या माध्यमातून होणार आहे.''

ऑलिम्पियाडनंतर या विद्यार्थ्यांची विज्ञानातील रुची टिकवून ठेवण्यासाठी काय करता येईल?

विज्ञानाची वाट निवडणाऱ्या विद्यार्थ्यांनी याच क्षेत्रामध्ये थांबणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ऑलिम्पियाडसारख्या स्पर्धांतून चमकलेले अनेक विद्यार्थी पुढे विज्ञानाच्या मूलभूत संशोधनापासून दूर जातात, हे आपले दुर्दैव आहे. अशा विद्यार्थ्यांनी डॉ. सी. एन. रावांसारख्या वयाच्या ८० व्या वर्षीही विज्ञानामध्येच रमणाऱ्या ज्येष्ठश्रेष्ठ वैज्ञानिकांकडून प्रेरणा घ्यायला हवी. पालकांनीही आपल्या मुलांच्या करिअरचा विचार करताना केवळ पैसा कमविण्यासाठी म्हणून विज्ञानाकडे




१५ वी आवृत्ती

# माणदेशी माणसं

**व्यंकटेश माडगूळकर**

**किंमत : १२५/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यात जे अक्षर-ग्रंथ निर्माण झाले
त्यात 'माणदेशी माणसं'चा समावेश होतो,
या व्यक्तिचित्रांत जुन्या कथेतील गोष्ट तर आहेच
पण जीवनाच्या अस्सल गाभ्यालाच स्पर्श करणारी
नवलकथेची किमयादेखील आहे.
अंधारातून पहाट व्हावी, कळीचे फूल व्हावे
इतक्या सहजतेने रेखाटलेली ही चित्रे अस्सल मराठी आहेत.
दरिद्री माणदेशातील, सामान्य जीवनातील न संपणारं दुःख
निरागसपणे व्यंकटेश माडगूळकर सांगतात.
हे दुःख पाहिलं की मन भांबावतं.
माणसं सुखासाठी धडपडतात, पण त्यासाठी
ती जन्माला आलेली नसतात असा उदार विचार मनात येतो.
जीवनातील हे कारुण्य माडगूळकरांनी कलावंताच्या अलिप्ततेने टिपले आहे
त्यामुळं त्यांची ही माणसं आपल्याला विसरता येत नाहीत.
त्यांची आठवण झाली की ती मनाला अस्वस्थ करून टाकतात...

वळण्यास सांगणे चुकीचे वाटते. विज्ञानाच्या मूलभूत संशोधनातून मिळणारा 'सायकिक इन्कम' आणि त्यातून मिळणारा आनंद खूप वेगळ्या उंचीवर नेणारा असतो. पालकांनी आपल्या पाल्यांना योग्य वयातच या बाबींचे भान द्यायला हवे.

### ★ डॉ. गंगवाल यांना 'चिन्मय चिकित्सा रत्न' पुरस्कार

अखिल भारतीय जैन डॉक्टर्स परिषदमध्ये पुण्याचे डॉ. कल्याण गंगवाल यांना 'चिन्मय चिकित्सा रत्न' पुरस्कार औरंगाबाद येथे राष्ट्रसंत चिन्मय सागर महाराज यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी शास्त्रज्ञ राजकमल जैन, श्वेतांबर स्थानकवासी समाजाचे अध्यक्ष अविनाश चोरडिया, सुधीर जैन, डी. ए. पाटील आदी उपस्थित होते. गंगवाल हे निष्णात फिजिशियन असून शाकाहार-सदाचार व्यसनमुक्ती आंदोलनाचे कार्यकर्ते आहेत.

### ★ सिंधुताईंना 'राजर्षी शाहू पुरस्कार'

शिरोळ तालुका सांस्कृतिक संघातर्फे १ डिसेंबर रोजी या वर्षीचा 'राजर्षी शाहू गौरव पुरस्कार' ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांना देण्यात आला.

उद्योजक राजेंद्र मालू यांच्या 'रिनग्रीन एनर्जी'च्या प्रायोजकत्वाखाली हा महोत्सव 'लेक वाचवा' अभियानास समर्पित आहे.

नवोदित कलाकारांना देण्यात येणारा 'राजर्षी शाहू प्रेरणा पुरस्कार' शशांक केतकर व तेजश्री प्रधान यांना देण्यात आला. विनोदी अभिनयाचा पुरस्कार आशीष पवार व भूषण कडू यांना, तर गायनाचा पुरस्कार कार्तिकी गायकवाड यांना देण्यात आला.

### ★ डॉ. विजय भटकर यांना 'चतुरंग जीवन गौरव' पुरस्कार

'चतुरंग प्रतिष्ठान जीवनगौरव' पुरस्कार यंदा संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांना डोंबिवलीत २२ डिसेंबर २०१३ रोजी रंगसंमेलनात एअर चीफ मार्शल अनिल टिपणीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

रंगसंमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक, संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले यांच्या हस्ते झाले. रंगसंमेलनाचे स्वागताध्यक्ष डोंबिवलीतील उद्योजक मधुकरराव चक्रदेव होते. बालरोगतज्ज्ञ उल्हास कोल्हटकर यांनी स्मरणिकेचे प्रकाशन केले.

डॉ. विजय भटकर यांच्या जीवनगौरव सोहळ्यात क्रिकेटपटू अजित वाडेकर, बापू नाडकर्णी, चंदू बोर्डे, प्रवीण आम्रे या क्रिकेटपटूंशी संवाद साधला. 'कालचे क्रिकेट-आजचे किक्रेट' यावर द्वारकानाथ संझगिरी जुने निवडक व्हिडिओ दाखवले.

### ★ 'गिनेस बुक' मध्ये भुजबळ यांची नोंद

वाकडच्या ४२ वर्षीय महादेव भुजबळ यांनी नुकताच तळहातावर टेनिसचे २३ चेंडू २३ सेकंदापर्यंत तोलण्याचा विक्रम केला. या विक्रमाची नोंद गिनेस बक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली होता. यापूर्वीचा विक्रम इटलीच्या सिल्वी साब्बाच्या नावावर होता. त्याने २२ चेंडू तळहातावर तोलण्याचा विक्रम केला होता. या विक्रमाबद्दल सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते महादेव भुजबळ यांचा सत्कार केला.

### ★ डॉ. मधुसूदन घाणेकर यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

एकपात्री कलावंत डॉ. मधुसूदन घाणेकर यांना 'इंटरनॅशनल ह्यूमन रिसर्च जस्टिस फेडरेशन'च्या वतीने 'सोशल ॲन्ड कल्चरल ॲवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले. भूतान येथील फुएंटीशोल्डींग या शहरात 'सबकुछ मधुसूदन' या एकपात्री कार्यक्रमाचा प्रयोग सादर केला. फेडरेशनचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. विठ्ठल मदने यांनी शाल, श्रीफल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

### ★ डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांना अखिल भारतीय हिंदी सेवा पुरस्कार

महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी तर्फे दिला जाणारा २०१३चा राष्ट्रीय पातळीवरील अखिल भारतीय हिंदी सेवा पुरस्कार लातूरचे डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांना जाहीर झाला आहे. रुपये १,००,०००/-, शाल व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांना यापूर्वी भारत सरकारच्या हिंदी निदेशालयाचा उत्तर प्रदेश हिंदी संस्थांचा सौहार्द रुपये एक लाखचा पुरस्कार, हैद्राबादचा आनंदऋषी पुरस्कार, साहित्य अकादमी, नवी दिल्लीचा अनुवाद पुरस्कार व सोलापूरचा सुशील पुरस्कार मिळालेला आहे.

डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांची आजपर्यंत एकूण ६२ पुस्तके दिल्ली, जयपूर, गाजीयाबाद, कानपूर येथून प्रकाशित झालेली आहेत. यात ४९ हिंदी व १३ मराठी आहेत. समीक्षा, अनुवाद, ललित, वैचारिक व संपादन असे या लेखनाचे स्वरूप आहे. कराची पाकिस्तान व भारतातील सर्व विद्यापीठांत त्यांनी व्याख्याने दिलेली आहेत.

### ★ फ. मुं. शिंदे यांना पुरस्कार

लोकशाहीर आण्णा भाऊ साठे समता परिषदतर्फे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फ. मु. शिंदे यांना आद्यक्रांतिकारक लहूजी वस्ताद साळवे गुरुवर्य पुरस्कार २२ डिसेंबर रोजी बालगंधर्व रंगमंदिर येथे रिपब्लिकन नेते

रामदास आठवले यांच्या हस्ते देण्यात आला. २५ हजार रुपये रोख, मानपत्र, सन्मान चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**★ राजन खान, कडू, सैल यांना 'दमाणी पुरस्कार'**

मराठी साहित्यविश्वातील मानाचा समजला जाणारा सोलापुरातील 'भैरूरतन दमाणी साहित्य पुरस्कार' गेल्या २५ वर्षापासून दिला जातो. यंदा ल. म. कडू यांच्या 'खारीचा वाटा' (राजहंस प्रकाशन पुणे), राजन खान यांच्या 'जमीन' (मैत्रेय प्रकाशन, मुंबई), महाबळेश्वर सैल यांच्या 'तांडव' (राजहंस प्रकाशन, पुणे) या साहित्यकृतींची निवड झाली. २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्काराचे यंदाचे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने वाचनसंस्कृती वाढविण्यात मोलाची कामगिरी बजविणाऱ्या सोलापुरातील 'हिराचंद नेमचंद वाचनालयाला ११ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष फ. मुं. शिंदे होते.

'खारीचा वाटा' या साहित्यकृतीत कोकणातील निसर्गरम्य संस्कृतीबरोबरच एका संवेदनशील मुलाची खारीबरोबर असलेली मैत्री अत्यंत लयबद्ध व प्रादेशिक शब्दांची पेरणी करीत रोचक केली आहे. तर १६व्या शतकात गोव्यात सुरू झालेले धर्मांतराचे, धर्ममंडळाचे हुंकार 'तांडव' या साहित्यकृतीत शब्दबद्ध करण्यात आले असून याला ऐतिहासिक संदर्भांची जोड देण्यात आली आहे.

'जमीन' ही निसर्गाने माणसाला दिलेली देणगी आहे; परंतु वाटणीचा शाप या जमिनीला लागला आणि तिच्या भोगवाटा तयार झाल्या.

जमिनीचे रूपांतर संपत्तीत झाले की, संघर्षाला सुरुवात होते. आई, वडील, भाऊ, बहीण, यांच्यातील नातेसंबंध जमिनीच्या वाटणीवरून ठिसूळ होतात. जमीन विकत घेणारे दलाल, अधिकाऱ्यांचे गैरवर्तन व जगण्याचा अर्थ संपत्तीशी लावणाऱ्या लोकांचे चित्रण 'जमीन' कादंबरीतून होते.

**★ युनोचा मानवी हक्क पुरस्कार**

तालिबानच्या जीवघेण्या हल्ल्यातून बचावलेली व मुलींच्या शिक्षणासाठी लढणारी पाकिस्तानी युवती मलाला युसूफझाई हिला २०१३ चा संयुक्त राष्ट्र संघटनेचा मानवाधिकार पुरस्कार जाहीर झाला आहे. दर पाच वर्षांनी हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार दिवंगत नेल्सन मंडेला यासारख्या व्यक्तींना देण्यात आला आहे.

## ★ डॉ. प्र. ल. गावडे यांना 'जीवनगौरव पुरस्कार'

शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र.ल. गावडे यांचा महाराष्ट्र एत्युकेशन सोसायटीतर्फे नुकताच 'शिक्षण जीवनगौरव' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

संस्थेच्या १५३ व्या वर्धापनदिन समारंभात निवृत्त एअरमार्शल भूषण गोखले व जम्मू-काश्मीरमधील हिंदू एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख अवतार कृष्ण रैना यांच्या हस्ते डॉ. गावडे यांना हा पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या कारकिर्दीचा सन्मान करण्यासाठी मुलींच्या भावे स्कूलमधील नवीन सभागृहाचे 'डॉ. प्र.ल.गावडे सभागृह' असे नामकरण करण्यात आले.

डॉ. गावडे म्हणाले, ''शिक्षक आणि शिक्षणसंस्था विद्यार्थी घडविण्याचे काम करतात. हेच विद्यार्थी पुढे त्या शिक्षकाची आणि संस्थेची ओळख ठरतात. त्यामुळे विद्यार्थी आणि त्यातून चांगला माणूस घडविण्याचे काम मला करता आले याची धन्यता वाटते.'' वाघमारे, रवींद्र वंजारवाडकर, संजय इनामदार, राजीव सहस्त्रबुद्धे उपस्थित होते.

## ★ महाराष्ट्र फाउंडेशनचे पुरस्कार

महाराष्ट्र फाउंडेशन आणि साधना ट्रस्ट यांच्यातर्फे दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार यंदा रयत शिक्षण संस्थेला देण्यात येणार आहे.

या वर्षीपासून समाजहितार्थ एखाद्या कार्याला वाहून घेणाऱ्या व्यक्तीला 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार' देण्यात येणार आहे. त्याप्रमाणे पहिला स्मृती पुरस्कार एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांना दिला जाईल अशी माहिती ज्येष्ठ समीक्षक आणि ट्रस्टचे विश्वस्त प्रा. रा. ग. जाधव यांनी दिली.

यंदा साहित्यातील 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांना दिला जाणार आहे. दोन लाख रुपये असे 'जीवनगौरव पुरस्कारा'चे स्वरूप आहे. 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कारा'चे स्वरूप एक लाख रुपये आहे.

संध्या नरे-पवार यांच्या 'डाकीण' पुस्तकाला वैचारिक ग्रंथ पुरस्कार, अमिता नायडू यांच्या 'प्लॅटफार्म नंबर झीरो' पुस्तकाला अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार, तर अशोक पवार यांच्या 'पडझड' कादंबरीला ललित ग्रंथ पुरस्कार देण्यात येईल.

सामाजिक प्रबोधनासाठी गजानन खातू, सामाजिक कामासाठी डॉ. अशोक बेलखोडे आणि असंघटित कष्टकरी विभागासाठी धनाजी गुरव यांना पुरस्कार देण्यात येईल.

नाट्य विभागात रा. शं. दातार यांच्या स्मृतीनिमित्त दोन पुरस्कार दिले जातात. त्यात राजकुमार तांगडे यांना 'शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला' नाटकासाठी,

तर मकरंद साठे यांना 'मराठी रंगभूमीच्या तीस रात्री' त्रिखंडात्मक ग्रंथासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे.

### ★ पुरंदरे, वाडकर यांना पुरस्कार

साहित्यिक कलावंत प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या साहित्य कलागौरव पुरस्कारासाठी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे व गायक सुरेश वाडकर यांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येकी अकरा हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### ★ विलास खोले यांना मंचरकर पुरस्कार

डॉ. र. बा. मंचरकर स्मृती प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'प्रा. डॉ. र. बा. मंचरकर स्मृती जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ समीक्षक-संशोधक डॉ. विलास खोले यांना जाहीर झाला आहे. येत्या १६ फेब्रुवारीला नगर येथे हा पुरस्कार देण्यात येईल, अशी माहिती अध्यक्ष डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी दिली. अकरा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### ★ कपिल देव यांना सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कार

भारताला प्रथमच विश्वचषक जिंकून देणारे संघनायक कपिल देव यांना २०१३ या वर्षाकरिता कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) वार्षिक पुरस्कार वितरण समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

''कपिल देव निखंज यांना कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि २५ लाख रुपयांचा धनादेश असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

भारतीय क्रिकेटला कपिल देव यांनी दिलेले सर्वोच्च योगदान म्हणजे १९८३चा विश्वचषक. एक कर्णधार म्हणून फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही बाजू सांभाळत आघाडीवरून लढण्यात त्यांचा हातखंडा होता.

२००७ मध्ये बीसीसीआयशी बंडखोरी करणाऱ्या काही मंडळींनी इंडियन क्रिकेट लीग (आयसीएल) सुरू केली होती. कपिल यांनी त्याला आपला पाठिंबा दिला होता. त्यामुळे बीसीसीआयने त्यांच्यावर बंदी घातली होती. गेल्या वर्षी कपिल यांनी आयसीएलचा राजीनामा दिल्यानंतर बीसीसीआयशी त्यांचे संबंध सुधारले होते. कपिल यांच्या भूमिकेचे स्वागत करून निवृत्त क्रिकेटपटूंना देण्यात येणारा एकरकमी गौरवनिधी दीड कोटी रुपये त्यांना देण्यात आला होता.

कपिल देव यांची कारकीर्द :

* भारतीय क्रिकेटला कपिल देव यांनी दिलेले सर्वोच्च योगदान म्हणजे १९८३चा विश्वचषक.
* क्रिकेटविश्वातील एक सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू म्हणून ख्याती असलेल्या कपिल देव यांनी १३१ कसोटी सामन्यांत ४३४ बळी मिळवत एके काळी सर्वाधिक बळीचा विश्वविक्रम आपल्या नावे केला होता. याशिवाय ५२४८ धावाही त्यांच्या नावे जमा आहेत.
* कसोटी क्रिकेटमध्ये पाच हजार धावा आणि चारशे बळी मिळविणारे ते पहिले क्रिकेटपटू ठरले होते.
* एक दिवसीय क्रिकेटमधील २२५ सामन्यांत ३७८३ धावा आणि २५३ बळी त्यांच्या खात्यावर जमा आहेत.

## ★ हिंदी साहित्य अकादमीचा बिनीवाले यांना पुरस्कार

ज्येष्ठ लेखक अविनाश बिनीवाले यांच्या 'जय कैलाश' या हिंदीतील कादंबरीला हिंदी साहित्य अकादमीचा जैनेंद्रकुमार पुरस्कार जाहीर झाला आहे. भारत-तिबेट सीमेवरच्या परिस्थितीची ही कादंबरी मराठीतही 'कैलास मानस' या नावाने नुकतीच प्रकाशित झाली आहे. याच कादंबरीचा हिंदीतून आसामी भाषेतही अनुवाद होत आहे. ११ फेब्रुवारीला बिनीवाले यांना हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केला जाणार आहे.

■


"एखादं स्वप्न पाहणं, ते फुलवणं आणि ते सत्यात उतरावं म्हणून धडपडणं, त्या धडपडीतला आनंद लुटणं, आणि दुर्दैवाने ते स्वप्न भंग पावलं, तरी त्याच्या तुकड्यावरून रक्ताळलेल्या पायाने दुसऱ्या स्वप्नामागे धावणं, हा मानवी जीवनाचा धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो यामुळेच!"

**– वि. स. खांडेकर**




# गेटिंग थिंग्ज डन

तणावरहित कार्यशैलीसाठी मेंदूमधली अव्यवस्थित अडगळ वरचेवर दूर करीत राहायला हवे. म्हणजेच समोर आपलेल्या असंख्य गोष्टींची शिस्तबद्ध सूत्रबद्ध मांडणी करून कुठलीही गोष्ट किंवा कृती काळजीपूर्वक केली पाहिजे.




मूळ लेखक : **डेव्हिड ॲलन**

अनुवाद : **प्रशांत तळणीकर**

पृष्ठे २६८। किंमत २८० रु. । पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

लहानमोठी कामे तर प्रत्येक माणसाला करावी लागतात. आपल्यावर सोपवलेले काम कमीत कमी श्रमात कसे करावे, तणावमुक्त कसे राहावे आणि अधिक ऊर्जा कशी मिळवावी या दृष्टीने 'गेटिंग थिंग्ज डन' या पुस्तकात बहुमोल मार्गदर्शन करण्यात आले आहे.

व्यवस्थापनविषयक सल्लागार, उत्पादकता या विषयावरचे प्रभावी विचारवंत म्हणून डेव्हिड ॲलन यांची जगभर ख्याती आहे. ओरॅकल, एलएलबीन, वर्ल्ड बँक यासारख्या कंपन्यांमध्ये निरीक्षक मार्गदर्शक म्हणून त्यांनी काम केले आहे. फॉर्च्युन, फास्ट कंपनी वगैरे नियतकालिकांमध्ये त्यांचे लेख प्रसिद्ध होत असतात.

हे पुस्तक म्हणजे कार्यतत्परतेची गुरुकिल्ली आहे. महाविद्यालयात शिकवल्या न जाणाऱ्या, स्वत:लाही सहजी न सुचणाऱ्या अशा अनेक गोष्टी डेव्हिड ॲलन स्पष्ट करतात, त्या गोष्टींच्या आधारे आपण आपल्या सार्वजनिक आणि स्वयंसेवी कार्याला गतिमान करू शकतो. आपली उत्पादकता वाढवू शकतो. आपल्या कार्यपद्धतीच्या वेगाला खीळ घालणाऱ्या अनावश्यक अशा अडसरांना रोखू शकतो.

डेव्हिड ॲलन यांनी हे पुस्तक लिहिण्यामागचे उद्दिष्ट सुरुवातीलाच स्पष्ट केले आहे.

**''गरज वा इच्छा असेल तेव्हा शक्य तितके अधिक कार्यक्षम आणि तणावमुक्त कसे राहावे हे तुम्हाला शिकवणे हे माझे मुख्य उद्दिष्ट आहे.''**

हे सूत्र त्यांच्या एकूण भूमिकेच्या केंद्रस्थानी आहे. काय करावे, करायचे ते केव्हा करावे आणि कसे करावे या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वैयक्तिक आणि संस्थात्मक उत्पादकतेच्या संदर्भात नवनवीन पद्धती विकसित करून, त्या प्रत्यक्षात राबवून, त्या तावून सुलाखून घेण्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील बरीच वर्षे खर्ची घातली. त्यावरून त्यांच्या लक्षात आले की कार्यक्षम आणि तणावमुक्त कसे राहावे या प्रश्नाचे एकच एक उत्तर संभवत नाही. संदर्भ बदलला, एक प्रश्न सुटला की दुसरा प्रश्न सोडविण्यासाठी कुठलीही सोपी सूत्रे वा तिळा तिळा दार उघड सारखी मंत्रावली उपलब्ध नसते. तरीही व्यक्तिगत सुसंघटितपणा आणि उत्पादकता साध्य करण्यासाठी आपल्या क्षमता वाढवणाऱ्या छोट्या छोट्या प्रक्रिया आत्मसात करता येतात आणि कमी गुंतवणुकीत अपेक्षित परिणाम साधता येतो.

वीस वर्षांच्या दीर्घ प्रशिक्षण-प्रात्यक्षिकांतून सुचलेल्या या मार्गदर्शक सूत्रांचा अवलंब करून घर, शाळा, व्यवसाय-उद्योग, संस्था प्रत्येक पातळीवर, वेगवेगळ्या कार्यसंस्कृतीमध्ये आपण आपल्याला अपेक्षित परिणाम साधू शकतो. अशा गोष्टी शाळांमध्ये शिकवल्या जात नाहीत.

या पुस्तकात आपण एक खेळ खेळतो आहोत अशी लेखकाची भावना आहे.

पहिल्या भागात या खेळाची संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. कुठलीही गोष्ट तणावरहित आणि कार्यक्षम रीतीने पार पाडण्याची क्षमता विकसित करण्यासाठी

आपण हा खेळ खेळणार आहोत. त्यासाठी एका मूलभूत कार्यपद्धतीचा अवलंब आपण करायचा आहे. आपल्या स्वत:च्या आयुष्यावर ताबा मिळवणे आणि प्रकल्प सर्जनशील रीतीने मार्गी लावणे हे आपले साध्य.

दुसऱ्या भागात या कार्यपद्धतीची प्रभावी अंमलबजावणी कशी करावी याचे विवेचन केले आहे. ताणरहित उत्पादकतेचा अभ्यास करण्यासाठी तयार होणे, संकलन प्रक्रिया, संघटन, आढावा, कृती आणि प्रकल्पावर नियंत्रण मिळवणे या गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते.

तिसऱ्या भागात दिलेल्या कार्यपद्धतीचा आणि साचांचा अंगीकार केल्यानंतर आपल्या होणाऱ्या परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. संकलनाच्या सवयीचे सामर्थ्य, पुढच्या कृतीबद्दल निर्णय घेण्याचे सामर्थ्य आणि परिणामावर लक्ष केंद्रित करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी आले म्हणजे क्रिया, उत्पादन साधनांचे वाटप, संपर्क, धोरणे आणि कार्यपद्धती यांचे नियोजन करणे शक्य होते आणि अपेक्षित यशाचा मार्ग सुकर ठरतो. जागतिकीकरण, स्पर्धा, तंत्रज्ञान, बदलत्या बाजारपेठा, नव्या संधी आणि उत्पादनांच्या दर्जाबाबतचे नवे मानदंड ही नवी आव्हाने आहेत. या आव्हानांना तोंड देणे- आपल्या अंगवळणी पडणे आवश्यक आहे. **नकारात्मकता आणि निष्क्रिय विरोध यांच्या ऐवजी अपेक्षित फलप्राप्ती हे आपले लक्ष्य ठरते. समस्या आणि संघर्ष यांना विजिगीषु वृत्तीने हाताळणे शक्य होते.**

स्टीव्हन स्नायडर यांचे एक निरीक्षण डेव्हिड ॲलन यांनी उद्‌धृत केले आहे. ‘‘जीवनात फक्त दोनच समस्या असतात. (१) तुम्हाला काय हवे हे तुम्हाला माहीत असते, पण ते कसे मिळवावे हे तुम्हाला माहीत नसते. आणि/किंवा (२) तुम्हाला काय हवे आहे हे तुम्हाला माहीतच नसते.

या दोन समस्यांवर दोनच उपाय आहेत. (१) निर्माण करा. (२) घडवून आणा.

डेव्हिड ॲलन यांनी मार्शल आर्टमधील पाण्यासारखे मन ही कल्पना आरंभीच मांडली आहे. सरोवरामध्ये दगड टाकला तर त्या दगडाचे वस्तुमान आणि बल यांच्याशी सुसंगत प्रतिक्रिया मिळते; आणि पाणी परत पूर्वस्थितीत जाते.

आपले मन आणि मेंदू कुठलीही नवी गोष्ट स्वीकारण्यास मोकळे, रिकामे हवे. नव्या गोष्टीसाठी त्यात जागाच नसते. त्यामुळे आपण नव्या गोष्टीला स्वीकारण्यास तयार नसतो. साहजिकच त्या गोष्टींबाबत काही कृती करण्याएवढी, ती गोष्ट समजावून घेण्यातच आपण कमी पडतो.

मनात आणि डोक्यात साठलेल्या अनेक अनावश्यक गोष्टींची अडगळ प्रथम दूर करा, मगच नव्या गोष्टीसाठी जागा रिकामी होईल. नवी गोष्ट, नवी समस्या, नवा

प्रकल्प तातडीने हाताळता येईल. केरी ग्लीसनने याबाबत दिलेला इशारा लक्षात घेण्यासारखा आहे. **''आपल्याला करायच्या असलेल्या सगळ्या गोष्टींनी आपले मन अनुत्पादक पद्धतीने सतत गुंतवून ठेवणे हा वेळ आणि ऊर्जा यांचा सर्वांत मोठा उपव्यय आहे.''**

आपल्या मेंदूतला अल्पकालीन स्मृतीचा भाग- हा अर्धवट, अनिर्णित अव्यवस्थित गोष्टी - साठवून ठेवतो. संगणकाच्या रॅमप्रमाणे काम करतो. अशा गोष्टी साठवून ठेवण्याची त्याची क्षमता सीमित असते. ती वारंवार मोकळी करावी लागते. ती मेंदूतून बाहेर काढून नोंदवही वा अन्य ठिकाणी ठेवली तर मेंदूतील ती जागा मोकळी होते आणि नव्या गोष्टीसाठी मेंदूत जागा होते. तसे न केल्यास मेंदूची नवीन तपशील स्वीकारण्याची आणि साठवण्याची क्षमताच थांबते.

नव्या कल्पनांसाठी मेंदूमध्ये जागा करीत राहिले पाहिजे. मन म्हणजे वस्तू गोळा करण्याचा डबा वा गोदाम नव्हे. जे काही अपुरे काम असेल ते मनात साठवून न ठेवता मनाबाहेर काढून विश्वसनीय व्यवस्थेमध्ये ठेवायला हवे. आपल्याला जी गोष्टी साध्य करायची आहे. तिच्यासाठी उपयुक्त तपशील सोडून इतर तपशील हा बाहेर काढत राहायला हवे.

**कृती करण्यासाठी फारशी शक्ती लागत नाही. पण काय करायचे हे ठरवण्यासाठी प्रचंड शक्ती लागते** हे एल्बर्ट हबार्डचे निरीक्षण लक्षात ठेवा.

एखादी कृती (काम) करण्यासारखे आहे की नाही हे प्रथम ठरवा.

करण्यासारखे नसेल तर त्याल केराची टोपली दाखवा. नंतर करण्यासारखे असेल तर बाजूला ठेवा. संदर्भासाठी योग्य ठिकाणी ठेवा.

कृती करण्यासारखे असेल ते दोन मिनिटांपेक्षा कमी वेळात होणारे असेल तर करून टाका. अधिक वेळ लागणार असेल तर नियोजन करा. कुणावर तरी सोपवा, पुढे ढकला, पुढची कृती काय ते ठरवताना विशिष्ट कालमर्यादा आणि क्रम ठरवा. (कॅलेंडर).

आपणा सर्वांत उत्पादक स्थिती सकारात्मक, ताणमुक्त, सृजनशील अभिव्यक्ती व्हावी अशी डेव्हिड ॲलन यांची या पुस्तकातील प्रतिपादनाची मांडणी आहे.


– शंकर सारडा
ई - १० पाटील रिजन्सी
१५ एरंडवणे, पुणे – ४
मो. ९८२३२६१०२३

■




# ज्ञानसूर्याची सावली

सोपानदेवांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि 'सोपानदेवी'चे वेगळेपण उठावदारपणे रंगविणारी कादंबरी




**मंजुश्री गोखले**

पृष्ठे ३२०। किंमत २९० रु. । पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

# लेखिकेचे मनोगत

संत श्री सोपानदेव, ज्ञानेश्वर माउलींचे धाकटे बंधू. ज्ञानेश्वर माउलींइतकेच प्रतिभाशाली, बुद्धिमान, मृदू स्वभावाचे. निवृत्तीनाथांसारखा गुरू आणि ज्ञानेश्वर माउलींसारखा मोठा भाऊ, अशा दोघांचे मार्गदर्शन सार्थकी लावणारा एक अलौकिक संत, पण ज्ञानेश्वर माउलींच्या अलौकिक बुद्धिमत्तेमुळे, अपूर्व प्रतिमेमुळे आणि हटयोगावरच्या अफाट प्रभुत्वामुळे माउली लोकांच्या गळ्यातला ताईत बनले; आजही आहेत. पण या अफाट, अलौकिक कार्यकर्तृत्वापुढे सोपाननाथांचं कार्य, त्यांची प्रतिमा, त्यांचं अलौकिकत्व तसं थोडसं झाकोळलं गेलं, हे मान्य केलंच पाहिजे.

सोपानदेवांच्या जीवनावर कादंबरी लिहिताना त्यांचं अलक्षित असणं हा एक विचार मनात होताच, पण त्याचबरोबर साहित्य-विश्वाचा धांडोळा घेतला असता, ज्ञानेश्वर माउलींच्या जीवनावर, त्यांच्या कार्यावर लाख अक्षरं लिहिली गेली; आजही लिहिली जात आहेत. पण सोपाननाथांवर अगदी स्फुट स्वरूपात लिखाण झालेलं आहे, असं दिसून आलं. डॉ. अशोक कामत सरांजवळ हा विषय काढला असता त्यांनी सांगलीच्या कोटणीस महाराजांचं नावं सुचवलं. त्यांना भेटायला सांगलीला गेले तेव्हा श्री. कोटणीस महाराजांनी आपण संपादित केलेलं 'कैवल्य गीता' हे पुस्तक दिलं. त्यात श्रीमद्‍भगवद्‍गीता, 'सोपानदेवी' वाचल्यावर सोपाननाथांच्या अलौलिक बुद्धिमत्तेची, असामान्य प्रतिभेची आणि शब्दांवर असलेल्या अफाट प्रभुत्वाची साक्ष पटली.

गीतेच्या ७०० श्लोकांचं अगदी कट-टू-कट, शब्दश: भाषांतर म्हणजे 'सोपानदेवी' आहे. हे बघितलं आणि अक्षरश: थक्क झाले. संत ज्ञानेश्वरांचे धाकटे बंधू, त्यांचे समकालीन असूनही सोपानदेवीची भाषा ही अत्यंत सोपी, सुलभ, नागर मराठी, अगदी कुणालाही समजणारी अशी आहे. हे पाहिलं आणि त्याही काळात इतक्या सोप्या मराठीत भगवद्‍गीतेचं भाषांतर लिहून सोपान देवांनी किती मोठं कार्य केलंय, हे लक्षांत आलं.

ज्ञानदेवांची भाषा प्राकृत मराठी. संस्कृतजवळची. अगदी अमृताशी पैजा जिंकणारी आणि अमृताइतकीच दुर्लभ, अगम्य, पण सोपानदेवीची मराठी कुठल्याही मराठी लिहता-वाचता-बोलता येणाऱ्या माणसालाही सहज समजेल अशी.

हे सगळं पाहिलं आणि कुठेतरी मनात वाटून गेलं की, माउलीसारख्या वटवृक्षाच्या छायेत हे चंदनाचं रोपटं अलक्षित राहिलं. मग मात्र मनात ठरवलं की, सोपानदेवांच्यावर कादंबरी लिहायची. हे पक्कं ठरवून डॉ. अशोक कामत सरांना भेटायला गेले. त्यांनी त्यांच्या एका विद्यार्थ्याने, सुभाष रेणुसे यांनी सोपानदेवांवर केलेल्या एम.फिलच्या प्रोजेक्टची झेरॉक्स प्रत मला दिली.

या सर्वांचा मला उपयोग झाला.

श्री. साखरे महाराज काही वर्षांपूर्वी 'स्वस्तिश्री' मासिक काढत असत. त्यांनी १९८२ सालचा दीपावलीचा अंक हा श्री. सोपानदेव विशेषांक काढला होता. देहू येथून त्या अंकाची झेरॉक्सही मला प्राप्त झाली आणि या सर्वांतून सोपानदेवांच्या सर्व रचना मिळाल्या. त्यात देवाशी उद्‌गार, हरिपाठाचे अभंग, नमन-स्तोत्र, उपदेश आणि सोपानदेवी असे वाङ्मय मिळाले. या रचनांचा अभ्यास केला असता सोपानदेवांचे व्यक्तिमत्त्व मनात आकारू लागले आणि त्याचबरोबर कादंबरीची रूपरेखाही. कादंबरी लिहायला सुरुवात करण्यापूर्वी एक लक्षात आलं की, ज्ञानदेवांपासून सोपानदेवांना वेगळं काढणं अतिशय अवघड आहे; कठीण आहे. कारण तो साक्षात ज्ञानसूर्य होता, तर सोपानदेव त्याची सावली म्हणून कादंबरीचं नावही 'ज्ञानसूर्याची सावली'!

ज्ञानदेवांच्या अलौलिकतेचं गारूड मनावर होतंच. त्यातच प्रभातचा 'संत ज्ञानेश्वर' चित्रपट काय किंवा त्यांच्यावरचा इतर कुठलाही चित्रपट काय; त्यात "होय ना रे दादा?" इति सोपानदेव किंवा "असं काय रे सोपानदादा" इति मुक्ता याशिवाय सोपानदेवांना काही स्वतंत्र अस्तित्वच नव्हतं. संत साहित्याच्या अभ्यासातसुद्धा सगळीकडे ज्ञानेश्वरादि भावंडं पैठणला शुद्धिपत्र मागायला गेली, असाच उल्लेख आहे. सा सगळ्या पार्श्वभूमीवर सोपानदेवांच्यावर कादंबरी लिहून पूर्ण केली. प्रत्येक वेळी, प्रत्येक क्षणी ज्ञानदेवांचं अलौकिक कर्तृत्व सोपानदेवांच्या जीवनाशी निगडितच राहिलं. म्हणूनच त्या ज्ञानसूर्याची सावली असणारे सोपानदेव या कादंबरीतून वाचकांपर्यंत पोचवणं थोडसं कठीण गेलं. सूर्य दाखवता येतो, पण किरणांचं अस्तित्व दाखवताना अंधारातला कवडसाच त्याची ओळख सांगतो. अर्थात तो कवडसाही तेजस्वी असतो. कारण तोही तेजाचंच रूप असतो, पण म्हणून तो कवडसा सूर्यापासून वेगळा असतो थोडाच? तो त्या सूर्याचंच रूप असतो. म्हणूनच सोपानदेवांना केंद्रस्थानी ठेवून कादंबरी लिहायची, असं कितीही ठरवलं तरी ज्ञानदेवांचं तेजस्वी अस्तित्व अवघ्या कादंबरीवर विखरून राहिलं. म्हणूनच सोपानदेवांचं अस्तित्व त्या ज्ञानसूर्याच्या सावलीसारखं झालं.

या कादंबरीमध्ये दोन गोष्टी विशेषत्वाने मी विस्तृतपणे मांडल्या.

एक म्हणजे दशक्रिया विधी. सर्वसामान्य माणसाला या विधीबद्दल उत्सुकता तर असते, पण माहिती नसते आणि या विधीला उपस्थित राहण्याची वेळ अशी असते की, त्या वेळी काही माहिती करून घेणं अवघडं झालेलं असतं. म्हणून दशक्रिया विधीची माहिती या कादंबरीत मी घातली.

दुसरी गोष्ट म्हणजे संजीवन समाधी. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात या संजीवन समाधीबद्दल विस्तृत माहिती असली, तरी अभ्यासकांव्यतिरिक्त इतर भक्ताचं

ज्ञानेश्वरी वाचताना यातल्या अन्वयार्थाकडे लक्ष जातंच असं नाही. आणि संजीवन समाधी म्हणजे नक्की काय हे अभ्यासकांव्यतिरिक्त इतरांना माहीत असतंच असं नाही. संजीवन समाधी घेणं म्हणजे नक्की काय, हे या कादंबरीत मी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात ती भाषा सगळी हटयोगाची असल्यामुळे तीच भाषा, तेच शब्द, तीच नावं लिहावी लागली. तरीही तो भाग वाचकांना समजावा असा लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

संत चरित्र, संत आणि त्यांचं जीवन यांबद्दल अभ्यासकांत अनंत मतभेद आहेत. अगदी संत ज्ञानेश्वर एक की दोन इथंपासून ते संत महाराजांपर्यंत. तद्वतच ही भगवद्गीतेची समश्लोकी टीका सोपानदेवी हो सोपानदेवांनीच लिहिली आहे की नाही, याबद्दलही मतभेद आहेत. पण सोपानदेवीच्या नवव्या अध्यायात –

ऐंसें गुह्य जाण । अर्जुना प्रति सांगे श्रीकृष्ण ।
सोपान म्हणे श्रोतिया लागून । सादरे श्रवण करावे ।। अ.९ ।।

दहाव्या अध्यायात –
सोपान म्हणे ऐका तुम्ही । अर्जुनाप्रति योगीयाचा स्वामी ।
विश्वरूप दाखवलें ते मी । श्रवणा निवेदन करीन ।। अ. १० ।।

पंधराव्या अध्यायात –
ह्या संताचिया वचना । आनंद जाला सोपाना ।
पुढे ऐका सादर श्रवणा । तुम्ही संत सोवरे श्रद्धाळू ।। अ. १५ ।।

असा स्पष्ट उल्लेख आहे. अर्थात तरीही हा सोपान कुणी वेगळा असावा असे ही मतभेद आहेतच. काहीही असो. पण संत चरित्र लिहीत असताना, विशेषत: ललित स्वरूपात लिहीत असताना, संशोधकांची, शोधकाची आणि समीक्षकाची भूमिका बाजूला ठेवून मनात विभूती भान ठेवूनच ते लिहावं असं माझं नेहमीच मत आहे. ही कादंबरी लिहिताना मीही त्याच विभूतिभावनेने लिहिली आहे. फक्त किंचित दुर्लक्षिले गेलेले सोपानदेव सर्वार्थाने सर्वांनाच समजवावे, म्हणून केलेला हा छोटासा प्रयत्न आहे. तो नीट जमला आहे की नाही, हे वाचकांनी ठरवायचं आहे. वाचकांचं प्रेम आणि पाठबळ मला नेहमीच लाभलं आहे. अगदी 'आवली'पासूनच माझं वाचकांशी नातं जोडलं गेलंय; शेकडो पत्रं आणि फोन यांतून अधिकाधिक दृढ होत गेलंय. माझ्या याही प्रयत्नाला वाचक दाद देतील आणि ज्ञानसूर्याची सावली त्यांना आनंद देईल असा विश्वास आहे.

**– मंजुश्री गोखले**

## डॉ. अशोक कामत यांची प्रस्तावना

ज्ञानदेवादी भावंडांची ज्ञात जीवनकथा अद्‌भुतरम्य आहे. तसेच त्यांच्या नावावरील काव्यरचनाही विलक्षण वाटावी अशीच आहे. या भावंडांचा काळ तेराव्या शतकाच्या अखेरच्या जेमतेम तीन दशकांचा असल्यामुळे त्या काळातील अस्सल दस्तऐवज आज उपलब्ध नाहीत. परंतु त्यांच्यासंबंधी समकालीन संत नामदेवादी सत्पुरुष आणि सत्त्वसंपन्न व्यक्तींनी लिहिलेले काव्यसाहित्य आहे. आठ शतकांची सलग आणि समर्थ परंपरा असलेल्या वारकरी सांप्रदायिकांच्या मनी जतन झालेल्या कथा-कहाण्या आणि त्याहून मोठ्या श्रद्धाभावना आहेत.

या सर्वच संतांची समाधिस्थाने निश्चित आहेत. ती आजच्या काळातही नांदती राहिलेली आहेत. त्यांना कधी राजाश्रय नव्हता. आजही लोकाश्रयाच्या बळावरच त्यांचे अस्तित्व आढळते आणि तिथे गेल्यानंतर प्रज्ञा-प्रतिभावंतांना इतिहासाच्या पाऊलखुणा पाहता येतात; ललित लेखकांना त्या अनुभवता येतात; वाचकांच्या प्रत्ययाला आणून देता येतात. या कांदबरीचे वाचन केल्यावर याची सत्यता पटू शकेल.

‘ज्ञानसूर्याची सावली’ अशा अर्थपूर्ण शीर्षकाची ही कादंबरी लिहिणाऱ्या सौ. मंजुश्री गोखले या उच्चविद्याविभूषित अशा मराठीच्या अभ्यासक आहे. त्यांनी इतर अभ्यासकांबरोबर उपासकांशीही एक जिव्हाळ्याचे नाते निर्माण केलेले आहे. संतविषयक लेखन-संशोधन करण्यासाठी हे अत्यंत आवश्यक असते. संतसाहित्याची आजच्या कालमानपरिस्थितीत अडकलेल्या आणि निर्ढावलेल्या मंडळींनी आपल्याला वाटतील त्या निकषावर चिकित्सा करणे योग्य नाही. प्रत्येक संताचा ऐतिहासिक काळ, तत्कालीन धार्मिक-सामाजिक चौकटीच्या सीमा-मर्यादा या पुरेशा गांभीर्याने आणि प्रामाणिकपणाने समजून घेतल्याशिवाय त्याच्याविषयी काही म्हणणेही उचित ठरत नाही. सौ. गोखले यांना याचे पुरेसे भान आहे, असे त्यांच्या आजवरच्या लेखनावरून म्हणता येते.

अलीकडे काही नामवंत लेखकांनी संतविषयक ललित लेखन करण्याचा प्रयत्न केला. तो फारसा यशस्वी ठरला नाही. त्याच संतांविषयी सौ. मंजुश्री गोखले यांनी केलेले ललित लेखन, त्या फारशा नामांकित नसतानाही, वाचकांना भावले. समीक्षकांनी त्यांना किती दाद दिली ठाऊक नाही, पण निदानपक्षी टीकाटिप्पणी केली नाही. असे का झाले? याचा सर्व संबंधितांनी विचार करण्यासारखा आहे.

सौ. मंजुश्री गोखले यांनी आपली ‘तुकयाची आवली’ ही पहिली संतविषयक कादंबरी वारकरी संतश्रेष्ठ तुकारामांच्या पत्नीविषयी लिहिली. ती केवळ तुकाराममहाराजांची सावली नव्हती, ती अर्धांगिनी तर होतीच, पण तिचे असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वही होते.

दुसरी कादंबरी ‘ओंकाराची रेख’ ही संत नामदेवांची दासी मानली गेलेल्या संत

जनाबाईंविषयी लिहिली. इथेही जनाबाईंचं स्वत:चं एक तेजोमय व्यक्तित्व त्यांनी सुस्पष्ट केलेलं आहे.

तिसरी कादंबरी 'जोहार मायबाप जोहार' ही संत चोखामेळा या संत नामदेवांच्या प्रभावळीतील संतासंबंधीची आहे. इथेही चोखा हा सर्वांना 'जोहार मायबाप' म्हणणारा विनम्र वृत्तीचा वारकरी म्हणून नव्हे, तर प्रतिष्ठितांकडून आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव असणारा आणि प्रसंगी त्यांना खडेबोल सुनावणारा 'महात्मा' म्हणून रंगविला आहे.

सौ. मंजुश्री गोखले यांचं हे सारं लेखन वाचकांना का आवडलं?

चमत्कार-कथांतून जी प्रतिमा जनमानसात आहे ती पुसून टाकीत काहीतरी नवाच शोध लावणारं म्हणून? सरसकटपणे आजचे निकष लावीत जुन्या काळातील मंडळींना दोष लावीत, काही नवेच समाजचिंतन केले आहे, म्हणून?... सौ. गोखले ह्या अभ्यासक आहेत, पण त्या-त्या काळाचे भान ठेवून आणि एकूणच समाजाच्या तत्कालीन मर्यादा ध्यानी घेऊन संतुलित विचार करणाऱ्या आहेत. **आपापला जीवनसंघर्ष झेलत राहून ज्यांनी काळावर मात केली, अशा महामानवांचे माणूसपण आणि त्यांनी मिळविलेले देवसान्निध्य त्या आधी पाहतात आणि त्यांना ते जसे होते, तसे वास्तव रूपात आपल्या समोर ठेवतात. त्यांचा काळही सजीव करतात.**

त्यावर त्यांनी केलेली मातही कशी, किती आणि कोणत्या सात्त्विक मार्गाने केली ते भेदक, पण सुलभ पद्धतीने सांगतात.

सौ. मंजुश्री गोखले या संत सोपाननाथविषयक कादंबरीच्या लेखनाकडे का वळल्या? त्यांचा भगवद्‌गीतेचा चांगला अभ्यास. गीता-टीका म्हणून त्यांनी श्रीज्ञानेश्वरीचेही चांगले अध्ययन केलेले. योगिराज ज्ञानदेवांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वामुळे आणि विशेषत: अपूर्व लेखनकर्तृत्वामुळे त्यांची प्रतिमा जनलोकांत विशेष मान्यता पावली. सौ. गोखल्यांच्या शब्दात सांगायचे तर 'ज्ञानेश्वर माउलींच्या अलौकिक बुद्धिमत्तेमुळे, अपूर्व प्रतिभेमुळे आणि हठयोगावरच्या अफाट प्रभुत्वामुळे माउली लोकांच्या गळ्यातला ताईत बनले; आजही आहे. या अफाट, अलौकिक कार्यकर्तृत्वापुढे सोपाननाथांचे कार्य, त्यांची प्रतिभा, त्यांचे अलौकिकत्व तसे थोडेसे झाकोळले गेले.'

सौ. गोखल्यांनी सोपाननाथांची समश्लोकी गीता 'सोपानदेवी' जेव्हा वाचली, तेव्हा त्यांना जाणवले... सोपाननाथांपाशीही अलौकिक बुद्धिमत्ता आहे. त्यांची मराठी भाषा अत्यंत सोपी, सुलभ, नागर मराठीला जवळची आणि कुणालाही सहज समजावी अशी आहे. मग सौ. गोखल्यांच्या मनाने घेतले... 'माउलींसारख्या वटवृक्षाच्या छायेत सोपाननाथांचं चंदनाचं रोपटं असूनही ते जे अलक्षित राहिलं, आपण त्यांचे ते व्यक्तिमत्त्व कादंबरीतून उभे करावे.'

संत नामदेव अध्यासनात माझे विद्यार्थी सुभाष रेणुसे यांच्याकडून एक संशोधनपर

प्रबंधिका – सोपाननाथ आणि सासवड परिसरातील प्राचीन खाणाखुणांसंबंधीची शोध-पुस्तिका तयार करून घेतली होती. त्यातून आपल्या ललित प्रतिभेने सौ. गोखले यांनी बरीच सामग्री जुळविली आणि प्रस्तुत कादंबरी त्यांनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने चांगल्या रितीने साकार केली. श्रीज्ञानेश्वर या ज्ञानसूर्यापासून सोपाननाथांना विलग करून पाहताच येत नाही. या ज्ञानसूर्याची ती साक्षात छायाच आहे. म्हणून 'ज्ञानसूर्याची सावली' हे शीर्षक अन्वर्थक ठरते.

ज्ञानदेवांना सोडून इतर भावंडांचं वेगळं अस्तित्वच दाखविता येत नाही. सर्व भावंडं अखेरच्या क्षणापर्यंत सतत एकत्र राहिली. आळंदीतील निर्वासित स्थितीत गावाबाहेरच्या राहुटीत एकत्र राहिली. शुद्धिपत्रासाठी पैठणला गेली. एकत्रितपणे तिथून परतताना नेवाशात एकत्र राहिली. ज्ञानदेवांच्या गीता-टीकेच्या श्रवणासाठीही एके ठायी होती. पुढे आळंदीला एकत्रच परतली. तीर्थयात्रेलाही सारे एकमेकांबरोबर होते. पहिली संजीवन समाधी ज्ञानदेवांची. मग पाठोपाठ सोपाननाथांची. नंतर मुक्ताबाई. अखेर निवृत्तीनाथ... हेही सारे एका वर्षभरातच. जीवनातील प्रत्येक क्षणी सोपाननाथ ज्ञानदेवांची सावलीच राहिले. त्यामुळे ही कादंबरी जरी सोपाननाथांवर असली, तरी ती भावंडांचीही आहे. मनोगतात लेखिकेने कबूल केले आहे... **'ज्ञानसूर्याची सावली असणारे सोपानदेव या कादंबरीतून वाचकांपर्यंत पोहोचविणं थोडसं कठीण गेलं. सूर्य दाखविता येतो, पण किरणांचं अस्तित्व दाखविताना अंधारातला कवडसाच त्याची ओळख सांगतो. तो कवडसाही तेजस्वी असतो. कारण तोही तेजाचं रूपच असतो. म्हणून तो कवडसा सूर्यापासून वेगळा असतो थोडाच? तो त्या सूर्याचंच रूप असतो. म्हणूनच सोपानदेवांना केंद्रस्थानी ठेवून कादंबरी लिहायची, असं कितीही ठरवलं तरी ज्ञानदेवांचं तेजस्वी अस्तित्व अवघ्या कादंबरीवर विखरून राहिलं. म्हणूनच सोपानदेवांचं अस्तित्व त्या ज्ञानसूर्याच्या सावलीसारखं झालं.**

या कादंबरीची सुरुवात श्रीज्ञानदेवांच्या संजीवन समाधीच्या गंभीर प्रसंगाने होते... ज्ञानेश्वर हा मोठा भाऊ तर होताच, पण सोपाननाथांची ती आई होती. वडीलही. सखा. गुरू. परमेश्वर... सर्व काही. तेच दिसेनासे झाले म्हटल्यावर सोपाननाथ त्या चैतन्याच्या अस्तित्वाच्या खाणाखुणा आठवत... त्यावर अश्रूंचा अभिषेक करीत इंद्रायणीकाठी कितीतरी काळ बसून राहिले.

दुसरं प्रकरण भावंडांच्या आईवडिलांवर आळंदीच्या धर्मठ कर्मठ मंडळींनी कसा जीवघेणा प्रसंग आणला, विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाईंनी तो संघर्ष कसा निमूटपणाने स्वीकारला, मुलांची विशेषत: निवृत्ती-ज्ञानदेवांच्या मनाची तयारी व्हावी म्हणून काय केले, हे सांगणारे आहे. हे सारे वाचताना अश्रू अनावर होतात.

तिसऱ्या प्रकरणात तर आईबापांच्या मनाची झालेली घालमेल सांगून शेवटी

म्हटले आहे... 'आईवडिलांनी केलेल्या आत्मसमर्पणाच्या वावटळीनं त्या चौघांचीही आयुष्यं पालापाचोळ्यासारखी भिरभिरत जावीत, असा डाव कदाचित नियतीनंच आखला असावा. पण तिला कुठे माहीत होतं की, चौघांच्यातली एकी, एकमेकांबद्दलचे अपार प्रेम आणि बुद्धिमानतेचे तेजस्वी वलय यांच्या साहाय्यानं ही चौघं भावंडं नियतीवर मात करणार होती, त्या अग्नीच्या तेजस्वी ज्वाळांनी त्या अंधारावर मात केली तशी!' (पृ.५४)

ही भावंडे कण्या खाऊन कशीबशी जगत होती. आईच्या आठवणींनी मुक्ता-सोपान विव्हळत होतेच. निवृत्ती-ज्ञानदेव कसेतरी धीर देत. सगळ्यांनाच लहानपणी मोठं व्हावं लागलं होतं. विनायकबुवा भटजींसारखे सुजन ब्राह्मणही त्यांना भेटले आहेत. (पृ. ६१) धर्ममार्तंडांचा धूर्तपणा, कावेबाज वृत्तीही त्यांना जाणवते आहे, पण त्यांनी हे सारे भयानक दैन्याचे बापुडवाणे दिवस झेलले. स्वाध्याय सोडला नाही. धैर्यही आणि स्वप्न पाहायला सुरुवात केली... 'निवृत्तीला दिसत होते की, गहिनीनाथांचा हात धरून तो अवघ्या त्रिखंडात संचार करतो आहे आणि सोपान आपण काहीतरी छान लिहिलंय आणि निवृत्ती-ज्ञानेश्वर आपली पाठ थोपटताहेत, असं बघत होता.' (पृ. ७६) असा सगळा त्या भावंडांचा लोकविलक्षण 'संसार' लेखिकेने अतिशय हृद्य रितीने काही प्रकरणांतून सजीव केलेला आहे.

आठवे प्रकरण आईवडिलांच्या दशक्रिया विधीविषयी आहे. इथे भावंडांचा विलक्षण समजूतदारपणा आणि सोपानदेवांची बुद्धिमत्ता लेखिकेने चांगल्या प्रकारे स्पष्ट केली आहे. 'संस्कृत आणि संस्कृती शिकविणाऱ्या विठ्ठलपतांनी निवृत्ति-ज्ञानेशाला शास्त्रोक्त संस्कार आणि अशास्त्रोक्त संस्कारांचीही ओळख करून दिली होती. म्हणूनच ही भावंडं आईवडिलांना अन्नोदक द्यायला सिद्ध झाली होती.' (पृ.९१) हे सांगून लेखिकेने एकूण दशक्रिया, काकस्पर्श इत्यादींविषयीचे फार चांगले निवेदन केले आहे. इथे सोपानाचे भावंडांशी झालेले संवाद लक्षणीय आहेत. त्यातून जो त्यांचा व्यासंग दिसतो, तो स्पृहणीय आहे.

भावंडांना आपुलकीचा ओलावा देणारे द्वारकामाई हे एक पात्र लेखिकेने चांगले उभे केले आहे. पुढे एरव्ही अबोल वाटणाऱ्या सोपानाची ज्ञानधारणा किती पक्की होती, याचे काही मार्मिक प्रसंग आलेले आहेत. सोपानदेव हे साक्षात ब्रह्मदेवाचे अवतार होते, ही वारकरी श्रद्धा लेखिकेने फार चांगल्या पद्धतीने स्पष्ट केली आहे. (पृ. १२५-१३०) पुढे भावंडांबरोबर भोजलिंगकाकांची आपलीही भेट घडते. त्यातच सोपानाच्या काही काळ दिसेनासे होण्याचा आणि गहिनी-निवृत्तीचा खराखुरा शिष्य होण्याचा प्रसंग येतो आणि कादंबरी सोपाननाथांचे वेगळेपण वाचकांच्या मनावर ठसवीत वेगाने पुढे जात राहते. सोपाननाथांनी सद्‌गुरू निवृत्तीनाथांच्या मार्गदर्शनाने वेदादि ग्रंथ आणि शास्त्रग्रंथांचे कसे सखोल अध्ययन केले त्याचे

तपशील येतात. (पृ. १४५-५१)

एका प्रकरणात मौंजीबंधनाची आवश्यकता आहे किंवा नाही, यावर भावंडांची चर्चा झाल्याचे दाखविले आहे. 'भक्तीचं अधिष्ठान मानून अज्ञानाचे उद्‌बोधन करावं आणि ते करण्यासाठी समाजस्वीकृती जरुरीची असेल तर तीही घ्यावी.' इथेच त्यांच्या कवित्व शक्तीची चुणूकही दाखविलेली आहे. (पृ. १५६) वेदाध्ययनातील वेगळेपणाही विशद केलेला आहे.

पैठणला धर्मसभेपुढे जाण्यासाठी झालेल्या भावंडांच्या प्रवासातील संवादातही सोपाननाथांचे बुद्धिसामर्थ्य प्रभावीपणे प्रकट झाले आहे. (पृ. १८१-८६) ज्ञानदेवांनी रेड्यामुखी वेद वदविले, पैठणच्या पंडितांनी भावंडांचे तेज पाहिले. त्यांनी शुद्धिपत्र दिले, सारे संतमंडळ आनंदून गेले, हे सारे सौ. गोखले यांनी फार छान शब्दांत वर्णिले आहे. आपण वाचताना तो काळच अनुभवतो आहोत, असे वाटल्याशिवाय राहत नाही.

श्रीज्ञानदेवांची कीर्ती पंढरीच्या अवघ्या पंचक्रोशीत पसरली आणि त्यांना पाहायला भक्तभाविकांची जत्रा लोटली. त्यानंतर पंढरपुरातील एक घटना लेखिकेने वर्णिली आहे. त्यातच सोपाननाथांच्या अनेक अभंगांचा सुरेख वापर करीत, त्यांची ओवी-अभंगांवरील पकड स्पष्ट केली आहे. तीर्थयात्रेच्या समाप्तीनंतर सोपाननाथ आत्मअध्ययनात रमले. त्यांनी एकटाक हरिपाठाचे अभंग पूर्ण केले. 'आपला धाकटा भाऊ त्याच्या निष्पाप, मनासारखीच स्वच्छ, निर्मळ रचना करतो आहे, हे भावंडांच्या ध्यानात आले.' (पृ. २११) पुढे लेखिकेने सोपाननाथांची जवळजवळ सगळीच रचना निवेदनात घेऊन ती अधिक सुस्पष्ट केली आहे. (प्रकरण १८-२१) निवृत्तीनाथांच्या तोंडी लेखिकेने घातलेली काही वाक्ये अत्यंत अर्थपूर्ण आहेत. ''ज्ञानेशा! तुझी ज्ञानदेवी आणि या सोपानाची सोपानदेवी! माझ्या दोन शिष्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा हा साक्षात्कार आहे. माझ्या दोन्ही धाकट्या भावांच्या अभिजात प्रतिभेचा हा आविष्कार आहे. मी धन्य आहे. कृतार्थ आहे... निवृत्तीदादाला किती बोलू आणि किती नको असे होऊन गेले.'' (पृ. २५८)

कादंबरीच्या अखेरच्या तीन प्रकरणांत पुन्हा एकदा श्रीज्ञानदेवांच्या संजीवन समाधीमुळे विचार-चिंतनात हरविलेले सोपाननाथ आपल्याला भेटतात. इथे नामदेव-सोपाननाथांचं संभाषण आपल्या डोळ्यांत पाणी आणतं. ''तरीही त्यानंतर दोघांच्या चेहऱ्यांवर हसू काही उमटलं नाही. सोपान आधीच काहीसा अबोल, शांत, संयमी. आता तर तो आणखीच अबोल झाला.'' आणि मग लेखिका संजीवन समाधीविषयीचं संतचिंतन आपल्या पुढे ठेवते. त्यातून संजीवन समाधीचं शास्त्रच आपल्याला समजतं. सोपानकाकांच्या रूपाने संतमंडळींसमोर 'हस्तेपरहस्ते, मुखेपरमुखे' हे शब्द येतात... 'नाथपंथातील हठयोगातल्या संजीवन समाधीचं शास्त्र आणि रहस्य उलगडून सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. ज्ञानेश्वरमाउलीनं

संजीवन समाधी घेतली. तत्पूर्वी ज्ञानदेवीच्या सहाव्या अध्यायात ही माहिती विस्तारानं आली आहे. तीच मी तुम्हाला समजावून सांगतो.' पुढे संजीवन समाधी ग्रहणासाठी स्थान कसे शुद्ध-पावन आणि देवा-संतांच्या वसतीचे असावे, शिवालय हवे, समाधीसाठी वज्रासनाची कशी जागा सिद्ध करावी, विविध बंध कसे निर्माण करावेत, हे सगळं तपशीलवार सांगत राहिले. तेव्हा जनाबाईने सहज एक अभंग म्हटला, 'सोपानदेव धरिता ध्याने । पुन्हा नाही जन्मा येणे । दासी जनी तल्लीन झाली । सोपानचरणी विनटली ।।'... मग संत चोखोबांनी आपल्याला विवेचन कळल्याची पावती दिली. निवृत्तीनाथ-मुक्ताईनंही दुजोरा दिला. काही दिवस सारे संतमंडळ संजीवन-समाधिचिंतनात मग्न होते, सोपाननाथही. आणि एके दिवशी सासवडच्या दिशेने सगळेच निघाले.

अखेरचे प्रकरण अर्थातच सोपाननाथांच्या संजीवन समाधिग्रहणाचे आहे. इथे नामदेवगाथेचा अत्यंत समर्थपणाने संदर्भ देऊन सारा इतिहास जिवंत करीत शेवटी लेखिकेने म्हटले आहे... 'एका बाजूनं नामदेव आणि दुसऱ्या बाजूनं मुक्ता निवृत्तीदादांच्या कुशीत शिरली. दादा त्यांना थोपटत राहिला. थोपटता थोपटता आपल्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू पुसायचं भान त्याला राहिलं नाही. असह्य होऊन त्याने आकाशाकडे नजर टाकली. इतका वेळ निरभ्र आकाशात तळपणाऱ्या सूर्यासमोर एक चुकार काळा ढग आला होता. त्याने सूर्याला झाकोळून टाकलं होतं. अंधारून आल्यासारखं झालं होतं. आता सूर्यही नव्हता. त्यामुळे कुणाचीच सावली नव्हती. अगदी तसं! ज्ञानसूर्यही नव्हता आणि त्याची सावलीही... ज्ञानसूर्याची सावली, ज्ञानसूर्यात विलीन झाली होती... एक गोष्ट मात्र निश्चित होती. ती त्या सूर्याइतकीच सत्य होती. या जगाच्या अंतापर्यंत तो ज्ञानसूर्यही आपल्या तेजाने तळपणार होता आणि त्याचबरोबर त्या ज्ञानसूर्याची सावलीसुद्धा!'

हे शब्दसामर्थ्य आपल्या मनात अगदी कादंबरीच्या आरंभापासून रुंजी घालत राहतात. आपण कादंबरी एकहाती वाचून संपवितो आणि पुन:पुन्हा तो ज्ञानसूर्य आणि त्याची सावलीही मनातल्या मनात अनुभवत राहतो.


सौ. मंजुश्री गोखले यांची ही संत-कादंबरी सोपाननाथांच्या सासवडात होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाच्या आधीच प्रकाशित होत आहे, हा एक चांगला योग आहे. या निमित्ताने सर्वच मराठीप्रेमी वाचकांना सोपाननाथांची आगळीवेगळी ओळख घडू शकेल आणि संतविषयक कादंबरी लेखनाचेही सामर्थ्य अनेकांना ध्यानी घेता येईल.

**– अशोक कामत**

गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे

■

५ वी आवृत्ती




**या पुस्तकावर आधारित मराठी चित्रपट पितृऋण प्रदर्शित**

# पितृऋण

मूळ लेखिका

**सुधा मूर्ती**


अनुवाद

**मंदाकिनी कट्टी**

**किंमत : ८०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

माणसाचं आयुष्य ही एक अजब गुंतागुंत!
नात्यांची, भावनांची अर्तक्य घटनांची!
काही नाती कोणतेही भावबंध निर्माण न करणारी,
तर काही नकळत नात्यांचे बंध उरात जपणारी!
काळाचा दीर्घ पडदा सरून गेल्यानंतरही
एका अनोख्या नात्याची ओळख होते.
मग...
नियतीचा बळी ठरलेल्या पित्याची जबाबदारी
स्वत:चं अर्घ्य देऊन पूर्ण करणाऱ्या कर्तव्यशील पुत्राचं अस्वस्थपण...
आणि त्या पूर्ततेसाठी खंबीर उभी राहिलेली कन्या,
यांचं अतूट नातं जपणारी 'पितृऋण'!
सुधा मूर्ती यांच्या वैचारिक, भावनाप्रधान लेखणीचा नवा अविष्कार!

## नाही स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स
## मराठीत प्रथमच, खरीखुरी E-Books





### मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ३०.
फोन: +91-20-24476924, 24460313 एक्स्टेन्शन क्र. 221, 245, 250 मो. 94220 46575
e-mail: sales@mehtapublishinghouse.com
Follow us on : http://www.facebook.com/mehta.publishinghouse




# सुखद वृद्धत्व

माणसाला दीर्घायुष्य तर मिळालेय, पण ते शापित ठरू नये, सुखद आरामदायी ठरावे म्हणून काही पथ्ये पाळायलाच हवीत




**डॉ. रत्नावली दातार**

पृष्ठे १४०। किंमत १४० रु. । पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

# लेखिकेचे प्रास्ताविक

या साऱ्या चराचर सृष्टीचा निर्माता 'तो' परमेश्‍वर आहे, असे आपण सारेच मानतो. यात एकपेशीय अमिबापासून सर्वश्रेष्ठ, बुद्धिमान मानवाची निर्मिती झाली. देवाने खूश होऊन सर्वांत जास्त आयुष्य माणसाला बहाल केले व त्याच बरोबर त्याला बुद्धी व मनही दिले. मात्र मानव सर्वश्रेष्ठ ठरूनही असंतुष्ट राहू लागला. तो परत देवाकडे गेला व त्याने 'मला आणखीन आयुष्य दे' अशी गळ घातली तेव्हा देवाने त्याला इतर प्राण्यांकडून उसने आयुष्य (वय) मागून घे असा सल्ला दिला. तो सल्ला शिरसावंद्य मानून मानव प्रथम बैलाकडे गेला व त्याने बैलाकडे काही वर्षे मागितली. 'बैल'च(!) तो, त्याने लगेच स्वत:मधील २० वर्षे मानवाला देऊन टाकली. आता मानवाकडे त्याची स्वत:ची ४० वर्षे + बैलाची २० वर्षे असे एकूण ६० वर्षे आयुष्य झाले. त्यातली पहिली ०-४० वर्षे माणूस स्वत:ची म्हणून जगतो नंतर ४०-६० वर्षे बैलासारखा, राबराब राबत काम करीत जगतो. परंतु एवढ्यानेही त्याचे समाधान होईना म्हणून तो घुबडाकडे गेला. त्यानेही माणसाला २० वर्षे उसनी दिली. त्यामुळे माणूस ६० ते ८० वयापर्यंत घुबडासारखी मरणाची वाट बघत (दिवाभीतासारखा) जगायला लागला. पण माणसाची हाव एवढ्यानेही मिटेना. तो शेवटी शास्त्रज्ञाकडे गेला व अजून २० वर्षांची मागणी माणसाने शास्त्रज्ञाकडे नोंदविली. शास्त्रज्ञांना कोणीतरी 'गिनीपिग' हवाच होता. त्यांनी जिवाचे रान करून, निरनिराळे शोध लावून मानवाला अजून २० वर्षे वाढवून दिली व आता माणूस ८० ते १०० वर्षे जगला तर 'गिनीपिग'सारखा स्वत:वर निरनिराळे प्रयोग करून घेत, हॉस्पिटल/आय.सी.यू.मध्ये पडून मरण जगत राहतो!

शतायुषी होण्याचे भाग्य (?) फार थोड्यांना लाभते, असे आपण म्हणतो, पण हे लांबलेले आयुष्य खरेच असते का सुखद? त्या शतायुषींना आपण म्हणायचे का भाग्यवान?

**एक लक्षात घ्या, वार्धक्य एकदम टपकत नाही. हळूहळूच येतं. पूर्वी म्हातारपण हे निराशाजनक होतं. पण आपण ते निराशाजनक विचार काढून टाकायचे आहेत. माझे हे उरलेले दिवस मी 'बोनस' समजून मुक्तपणे, मस्त व मस्तीत जगणार आहे, असं म्हटलं पाहिजे.**

८० वर्षे जर आयुर्मर्यादा धरली तर निवृत्तीनंतर २० वर्षे मिळतात. त्यातील १० वर्षे आपण धडधाकट असतो. त्याच काळात हिंडून फिरून घेऊ या. कविवर्य मंगेश पाडगांवकर म्हणतात तसे, 'सांगा कसं जगायचं? कण्हत कण्हत की गाणं म्हणत?' म्हणूनच मन प्रसन्न ठेवायला शिका की 'तन' आपोआप प्रसन्न, तरुण राहील व पुढचा रस्ता सुसह्य होईल. या 'बोनसचा' विनियोग स्वार्थ-परमार्थ साधून करा.

## पुस्तकाविषयी

'सुखद वृद्धत्व' या दोन शब्दांत केवढा विरोधाभास दडलाय, नाही? माझ्या इतकं तुम्हालाही ते जाणवत असणार. अन् खरंय ते! वृद्धत्व कोणालाही न आवडणारं, नकोसं असणारंच असतं! त्यात त्याला मी सुखद म्हणतेय? अशक्य!! पण आज हेच अशक्य 'शक्य' करून दाखवायची वेळ आपल्यावर येऊन ठेपलीये किंवा आपणच ती आपल्यावर ओढवून घेतलीये म्हणा ना. जसं 'आ बैल मुझे मार!' प्रथम आपण आपले जननप्रमाण (Birthrate) वाढवलं, मग त्याच्यासाठी लागणारे 'रोटी-कपडा-मकान' कमी पडू लागले म्हणून राब-राबून जास्तीत जास्त पैसा कमवायला लागतो. जागतिकीकरणामुळे आपली आयुष्येही लांबू लागली. त्यातच उत्तम जीवनमान व सुदृढ आरोग्य लाभले. मग हाच जादा पैसा आपण त्या वाढलेल्या, लांबलेल्या आयुष्यासाठी खर्चू लागलो. पण त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले व ते प्रश्न सोडविणे ही आज काळाची एक गरजच बनून गेलीये.

वार्धक्य म्हणजे वाढलेलं वय! आपल्या भारताची लोकसंख्या सतत वाढत असते. पण आज लोकसंख्या वाढीतील हाही एक पैलू – वार्धक्य, आपण दुर्लक्षित करून चालणार नाही. उताराला लागलेली कोणतीही वस्तू वेगाने घरंगळत जाते, पण दीर्घायुषी वृद्ध मात्र येणारा दिवसच नाही तर येणारा तासही मोजत असतो. त्यांचा वेग कमी होतो व नवीन जीवनशैलीत ते अडथळा बनतात.

जागतिक आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे की, शहर विकास आराखड्यात वृद्ध, अपंग यांच्या समस्यांचा विचार व्हायला हवा. पण तसे कुठेच दिसत नाही. परदेशात त्यांना सरकारी पेन्शन, इतर सोयी-सुविधा, वृद्धाश्रम वगैरे गोष्टी मिळत असल्या तरी आपल्याकडे एकत्र कुटुंबव्यवस्था किंवा गावरहाटीसारख्या जमेच्या बाजूही आहेत; पण आपण मात्र पाश्चात्त्यांचं अनुकरण (अर्थात आपल्याला सोयीचं असेल तेच व तेव्हा) करण्यात धन्यता मानतो. त्यामुळे वृद्धांकडे दुर्लक्ष केलं जातं. पण या लांबलेल्या वार्धक्याच्या कारणमीमांसेत हल्ली एक नवाच मुद्दा पुढे येत आहे. तो म्हणजे, 'बेबी बूमर्स'चा मुद्दा!

१९४६ ते ६४ या काळात जन्मलेल्या मुलांना 'बेबी बूमर्स' म्हणतात. आज ही पिढी निवृत्तीचा टप्पा ओलांडत आहे. नेहमीप्रमाणे अमेरिकेत बहुचर्चित असलेला हा मुद्दा आता भारतात रुजू लागला आहे. (आपण नेहमीच पाश्चात्त्यांचं अनुकरण करतो!) ही पिढी उच्च आर्थिक स्तर, त्यामुळे समृद्धीत वाढलेली व म्हणून एकदम तंदुरुस्त (fit!) ! तरुण वाटणं, दिसणं ही यांची जीवनशैली, त्यामुळे स्वत:ला ते ज्येष्ठांच्या यादीत घालत नाहीत. ही मंडळी ययातीच्या पठडीतली! वैद्यकीय शास्त्रानेही त्यांना मदतच केली आहे. उच्च सांपत्तिक व बौद्धिक स्तरातील बेबी बूमर्सची भारतीय फळी अमेरिकनांच्या पावलावर पाऊल टाकत चालते आहे.

म्हणूनच हल्ली डायट, जिम, मसाज सेंटर्स, पार्लर्स इत्यादींचं पेव फुटलंय. आपल्याकडे हार्मोन्स घेण्याचं प्रमाण वाढलेलं नाही, ते बरं आहे. कारण त्याचा वाईट परिणामही होतोच, हे भारतीयांना लवकर कळले!

चांगलं, तरुण दिसणं याला कोणाचाच विरोध नाही. पण त्यासाठी काहीतरी सीमारेषा हवी ना? वय वाढेल तसे केस पांढरे होणं, कमी दिसणं, ऐकू कमी येणं, दात पडणं, सुरकुत्या येणं, संधिवात, मधुमेह इ. आजार होणं, हे अपरिहार्य मानून ते स्वीकारले पाहिजेत. त्यावर वैद्यकीय उपचार करायला हवेतच. जसं कलप लावणं, मोतीबिंदूचं ऑपरेशन, ऐकू येण्यासाठी कानाचं मशीन लावणं, कवळी वापरणं, सांधा बदल ऑपरेशन करणं इत्यादी! पण त्यासाठी कोणत्याही थराला जाऊ नये. कुठे थांबायचं हे आपणच ठरवायला नको का?

हे लांबलेलं आयुष्य जर आपल्याला सुखद, आरामदायी, मनपसंत, आरोग्यवर्धक करायचं असेल तर आपल्याला काही पथ्यं पाळावी लागतील. अर्थात त्यासाठी अनेक पर्यायही उपलब्ध आहेत. नवीन विचार, नवीन शोध लागतच असतात. कारण 'गरज ही शोधाची जननी' मानली जाते.

यंदाच्या जनगणनेनुसार आपली लोकसंख्या वाढ, जरी काही अंशी कमी झाली असली तरी भारतात ज्येष्ठांची संख्या खूप वाढते आहे. एक काळ असा होता की, स्वीडनचा जननदर/प्रमाण शून्यावर येऊन ठेपला होता. त्यावेळेस स्विडीश सरकारने जनन टक्केवारी वाढवायचा आदेश स्विडीश जनतेला दिला होता. त्याच काळात युरोप-अमेरिकेत ज्येष्ठांची मांदियाळी होऊन दोन्ही खंड 'वृद्ध' झाले होते. तेव्हा भारत मात्र 'तरुण' होता. पण आता भारतही म्हातारा होऊ लागला आहे व म्हणूनच ज्येष्ठांचे प्रश्न प्रकर्षाने जाणवू लागले आहेत.

आपल्याला ज्येष्ठांच्या प्रश्नांचा विचार करताना दोन निरनिराळ्या भागांचा विचार करायला हवा. कारण भारत हा मुख्यत्वे ग्रामीण व शहरी असा दोन भागांत विभागला गेला आहे. दोन्ही भागातील वृद्धांचे प्रश्न वेगवेगळे असणार आहेत. आपण येथे फक्त शहरवासीयांचे प्रश्न बघणार आहोत. यातसुद्धा अनेक प्रकारचे गट पाडले जातात. मुख्य फरक उच्च सांपत्तिक स्थिती, मध्यम व कनिष्ठ वर्ग यांत असतो. तसेच एकत्र व विभक्त कुटुंबांमध्ये राहणारे ज्येष्ठ, एकेकटे ज्येष्ठ व वेगवेगळे राहणारे वृद्ध, भारतात राहणारे, परदेशात राहणारे, मुले परदेशात किंवा लांबच्या गावांना (पण भारतातच) राहणारी व वृद्ध एकटे राहणारे – असे अनेकविध गट निर्माण झाले आहेत. या प्रत्येकांचे प्रश्न सोडविणे तर शक्य होणार नाही. म्हणूनच शहरी, पांढरपेशा बुद्धिजीवी (White Coller Men) मग तो गरीब-श्रीमंत कसाही असो, अशांचा विचार करून त्यांच्या जीवनशैलीला अनुसरून त्यांचं घर, आहार, विहार, छंद, त्यांच्या आवडी-निवडी, प्रवास, त्यांची आजारपण व त्यांवरील

उपाय, त्यांना लागणारे मदतीचे हात इत्यादींचा आपण विचार करणार आहोत व त्यांचं उर्वरित आयुष्य कसं सुखदायी होईल ते बघणार आहोत.

भा.रा. तांब्यांची एक कविता शाळेत शिकलेली आठवतीय –

*'मधु मागसी माझ्या सख्या परी*
*मधुघटची रिकामे पडती घरी'*

एका वृद्ध जोडप्याचं हे मनोगत! यातली स्त्री विरक्त असून जोडीदाराला म्हणतेय, आता या आयुष्याच्या उतरंडीला माझ्याकडून कसल्या प्रेमाची, शृंगाराची अपेक्षा करतोस? माझं मन रिक्त झाले आहे. त्या कवितेतलंच शेवटचं कडवं असंही आहे की,

'ढळला रे ढळला दिन सखया, संध्याछाया भिवविती हृदया
आता मधुचे नाव कासया, लागले नेत्र हे, पैलतीरी'

म्हणजेच आपलं आयुष्य आता मावळतीला लागलं आहे. अंधार दाटत चाललाय, आपलं वार्धक्य समीप येतंय, तुला कळत कसं नाही! मरणाच्या, वार्धक्याच्या सावल्या भेडसावत आहेत. डोळे पैलतीर शोधताहेत. अन् तू माझ्याकडून कसली अपेक्षा करतोस? त्या मधुघटाचं नावच नको काढूस. मला ओढ आहे, ती फक्त त्या अनंताची!

शाळा सुटल्यानंतर कॉलेजी फुलपाखरी जीवनातून गृहस्थाश्रमी झालो. घर-संसार, मुलंबाळं, पै-पाहुणा यांना सांभाळून करिअर करत इथवर आलो व आता हळूहळू ज्येष्ठ नागरिकांच्या पंक्तीत जाऊन बसलो. आज या सायंकट्ट्यावर मला 'ती' कविता परत परत आठवतेय. पण तिचा वेगळाच अर्थ माझ्या मनाला ध्वनित होतोय! पूर्वीच्या स्त्रीचे विरक्तिपर उद्गार "आता मधुचे नाव कासया" ऐवजी मला तर वेगळंच काही जाणवतंय. माझं मन म्हणतंय, "आत्ताच खरेतर मधुचे नाव घ्यायला हवे!" आजवरच्या कष्टाचं चीज आपल्या हातात आज पडतंय. आपण वार्धक्याची भीती सोडून देऊ. आज आमच्या दोघांमध्ये जे काही माधुर्य, प्रेम, जिव्हाळा उरलेला आहे, ते म्हणजे, एक गाभुळलेलं, परिपक्व, प्रौढत्व आहे व आपण दोघे पैलतीरावर बसून त्याचा मनसोक्त आस्वाद घेणार आहोत. आता त्या मधुघटाला दूर न सारता, त्या प्रेमाला दूर न लोटता उलट त्याच प्रेमाला आपण साद घालू या!

क्रिकेटमध्ये 'सेकंड इनिंग' जास्त चुरशीची, महत्त्वाची ठरते. तशीच आपण पण आपली सेकंड इनिंग अशीच चुरशीची, सुंदर व सुखद करू या.

**– डॉ. रत्नावली गणेश दातार**
७६७/६ पोंगल, भांडारकर रोड,
डेक्कन जिमखाना, पुणे ०४.
फोन नं. : २५६७५४०७

■


८ वी आवृत्ती

शिवचरित्रातील सर्वांत रोमांचक घटनेची म्हणजेच अफजल वधाची स्फूर्तिदायक कहाणी

# लक्ष्यवेध

**रणजित देसाई**

**किंमत : ११०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**




शिवचरित्रातील प्रत्येक प्रसंग म्हणजे स्वतंत्र कादंबरीचा विषय. या चरित्राइतके सर्वांगसुंदर चरित्र आजवर इतिहासाने पाहिलेले नाही. असा या चरित्राचा लौकिक.
बारा मावळांत स्वराज्याचे रोपटे रुजते, न रुजते, तोच अफझलखानाचे संकट अवतरले.
वाईपासून प्रतापगडापर्यंतच्या हिरव्यागर्द रानावर राजकारणाचा पट मांडला गेला.
चढे घोड्यानिशी राजांना पकडून नेण्याची अफझलखानाची गर्वोक्ती होती आणि खानास मारल्याविना राज्य साधणार नाही, हे राजे पुरे जाणून होते.
या दोन राजकारण-धुरंधरांनी खेळलेला डाव म्हणजेच लक्ष्यवेध.

## मेहता पब्लिशिंग हाऊस

# २०१३ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

### कादंबरी

| | | |
|---|---|---|
| तडा : एस.एल. भैरप्पा | अनु. उमा कुलकर्णी | २८० |
| एक अनादि अनंत प्रेमकहाणी : ऑड्रे निफन्नेजर | अनु. रेश्मा कुलकर्णी | ४९० |
| आकाश बदलताना : झोई जेनी | अनु. उज्ज्वला गोखले | १६० |
| विश्वसत्ता : टॉम मार्टिन | अनु. उदय भिडे | ३८० |
| पवित्रम् | स्वाती चांदोरकर | २०० |
| केन अॅण्ड एबल : जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी | ६०० |
| लॉस्ट होरायझन : जेम्स हिल्टॉन | अनु. स्नेहल जोशी | १८० |
| मृत्युंजय | शिवाजी सावंत | ३७५ |
| द डार्कर साइड : कोडी मॅकफॅदियेन | अनु. प्रकाश जोशी | ५०० |
| द फेस ऑफ डेथ : कोडी मॅकफॅदियेन | अनु. अमोल कपोले | ५०० |
| उगवतीच्या दिशेला : ज्युलिया ग्रेगसन | अनु. श्यामल कुलकर्णी | ५५० |
| डाय फॉर मी : करेन रोझ | अनु. पी.डी. देशमुख | ५०० |
| छावा | शिवाजी सावंत | ४८० |
| युगंधर | शिवाजी सावंत | ४८० |
| ओल्ड सिटी हॉल : रॉबर्ट रोटेनबर्ग | अनु. अनिल काळे | ४०० |
| माझी ललाटरेषा : नफिसा हाजी | अनु. शीला कारखानीस | ३०० |
| स्टिल लाईफ : जॉय फिल्डिंग | अनु. माधव कर्वे | ४०० |
| पायरेट लॅटिट्यूडस : मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३०० |
| अॅना आणि सयामचा राजा : मार्गारेट लॅन्डन | अनु. माणिक फाटक | ३८० |
| छावणी : धीरेन मेहता | अनु. अंजनी नरवणे | २०० |
| द सिम्पल ट्रुथ : डेव्हिड बल्डासी | अनु. सुधाकर लवाटे | ५४० |
| पाथ्स् ऑफ ग्लोरी : जेफ्री आर्चर | अनु. सुभाष जोशी | ४०० |
| परीघ : सुधा मूर्ती | अनु. उमा कुलकर्णी | २०० |

## कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| भुताचा जन्म | द.मा. मिरासदार | १३० |
| आयुष्याचे धडे गिरवताना : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १५० |
| आजीच्या पोतडीतल्या गोष्टी : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १४० |
| एक दिवा विझताना | रत्नाकर मतकरी | १३० |
| ॲण्ड देअरबाय हँग्ज अ टेल : जेफ्री आर्चर | अनु. डॉ. देवदत्त केतकर | २०० |
| हुबेहूब | द.मा. मिरासदार | १२० |
| टू कट अ लाँग स्टोरी शॉर्ट : जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी | २५० |
| आणि विक्रमादित्य हरला | स्वाती चांदोरकर | १६० |

## व्यक्तिचित्रण

| | | |
|---|---|---|
| माणसं – अशीही | महादेव मोरे | २५० |

## सत्यकथा

| | | |
|---|---|---|
| डोंगरी ते दुबई : एस. हुसेन झैदी | अनु. अशोक पाध्ये | ३५० |
| सेक्रेड लिफ : डेबोरा एलिस | अनु. मेघना ढोके | १४० |
| प्रेमाची परिभाषा : अँड्रो लिंकलेटर | अनु. मेघना जोशी | ३०० |
| सेंड देम टू हेल : सेबॅस्टियन विल्यम्स | अनु. अभिजीत पेंढारकर | ३०० |
| व्याधिमुक्त : गीता आनंद | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ३९० |

## अनुवादित अनुभवकथन

| | | |
|---|---|---|
| मुक्त विहंग : चीनच्या तीन कन्या : युंग चँग | अनु. विजया बापट | ६०० |
| पॉपी : ग्रेगॉर सेमन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३५० |
| जीव जिथे गुंतलेला : अतुल गवांदे | अनु. नीला चांदोरकर | ३०० |
| तिबेटच्या वाटेवर : सॅब्रिए टेनबर्केन | अनु. वन्दना अत्रे | २४० |
| मृत्यूशी शर्यत : बॉ रिफेनबर्ग | अनु. प्रसाददत्त गाडगीळ | २४० |

## अनुवादित आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| नोमॅड : आयान हिरसी अली | अनु. प्राजक्ता चित्रे | २८० |
| बियॉन्ड अग्ली : कॉन्स्टन्स ब्रिस्को | अनु. उल्का राऊत | २५० |
| आठवणींचे मोती : व्हेरा गिसिंग | अनु. डॉ. विनया धारवाडकर | २४० |

## आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| हाच माझा मार्ग | सचिन पिळगांवकर<br>शब्दांकन:अभिजीत पेंढारकर | ४५० |

## ललित

| | | |
|---|---|---|
| तजेलदार कॅनव्हास | ज्ञानदा नाईक | १६० |

## चरित्रे / व्यक्तिचरित्रे

| | | |
|---|---|---|
| रिचर्ड फाईनमन : एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व | सुधा रिसबुड | १४० |
| नोबेल ललना - भाग २ | मीरा सिरसमकर | १०० |
| सोनिया गांधी : एक अनन्यसाधारण जीवनप्रवास : राणी सिंग | अनु. लीना सोहोनी | ३५० |
| मोहनदास : राजमोहन गांधी | अनु. मुक्ता देशपांडे | ९०० |
| स्वप्नांचे इंद्रधनू : रश्मी बन्सल | अनु. सुनीति काणे | २५० |

## 'चिकन सूप' मालिका

| | | |
|---|---|---|
| चिकन सूप फॉर द सोल - इंडियन विमेन : जॅक कॅनफिल्ड/ मार्क व्हिक्टर हॅन्सन/रीमा मोडगीळ | अनु. विनिता जोगळेकर | २९० |
| चिकन सूप फॉर द सोल - इंडियन मदर्स : जॅक कॅनफिल्ड/ मार्क व्हिक्टर हॅन्सन/रक्षा भारदिया | अनु. वृषाली पटवर्धन | २७० |

## संकीर्ण

| | | |
|---|---|---|
| जेआरडी टाटा यांची पत्रे : संपादन : अरविंद माम्ब्रो | अनु. सुप्रिया वकील | ४५० |

## आरोग्यपर

| | | |
|---|---|---|
| ची रनिंग : डॅनी/कॅथरीन ड्रेयर | अनु. मीना शेटे संभू | ३२० |

## वैचारिक

| | | |
|---|---|---|
| परमेश्वर एक सांकेतिक नाव : मणी भौमिक | अनु. अशोक पाध्ये | २५० |
| मागील पानावरून...मागेच!: अरुण शौरी | अनु. अशोक पाध्ये | ४५० |

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| मजेत जगा आणि आनंदाने काम करा : डेल कार्नेगी | अनु. ॲड. शुभदा विद्वांस | २०० |
| गेटिंग थिंग्ज डन : डेव्हिड ॲलन | अनु. प्रशांत तळणीकर | २८० |
| एक सांगू? : मंजिरी गोखले जोशी | अनु. सुप्रिया वकील | २५० |
| यशप्राप्तीचा जाहीरनामा : अतुल गवांदे | अनु. सुनिती काणे | २०० |

## राजकीय

| | | |
|---|---|---|
| हे सर्व आपल्याला कोठे नेणार? : अरुण शौरी अनु. | अशोक पाथरकर | ६०० |

## काव्यसंग्रह

| | | |
|---|---|---|
| कविता दोघांची | शुभदा सुरेश नाईक/ सुरेश वसंत नाईक | ९० |

## विज्ञानविषयक लेख

| | | |
|---|---|---|
| शब्दवेध | प्रा. डॉ. चंद्रकांत सहस्रबुद्धे | १०० |

## शेतकी / बागकाम

| | | |
|---|---|---|
| छंद बागेचा | सुनीती देशमुख | २०० |

## English Fiction

| | | |
|---|---|---|
| Mr Two-Bomb | William Coles | 350 |
| The Woman Before Me | Ruth Dugdall | 350 |
| The Sky is Changing | Zoe Jenny | 200 |
| True Blue | Deborah Ellis | 300 |

## Self Help


| | | |
|---|---|---|
| The Art of Ageing | John Lane | 145 |

## Health & Diet

| | | |
|---|---|---|
| Healthy Habits for a Fit Family | J.Ron Eaker, MD | 300 |

## Memoir

| | | |
|---|---|---|
| Indian.English. | Jillian Haslam | 240 |




८ वी आवृत्ती

# इल्लम

**शंकर पाटील**

**किंमत : ९०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

संपतरावांच्या डोक्यात एकच गोष्ट गच्च बसली अगदी सिमेंट काँक्रीट!
संपतराव रोज आपलंच डोकं खात बसला. पंधरा लाख देऊनही नाव होत नाही म्हणजे काय? काहीतरी इल्लम सापडलं पाहिजे... असं काय करावं? काय काढावं? काहीतरी चकित करणारं सापडलं पाहिजे... सगळ्या पेपरात बातमी आली पाहिजे. सगळ्यांच्या तोंडी आपलाच विषय निघाला पाहिजे. नावाचा डंका गाजला पाहिजे! नाव गाजत नाही मग एवढा पैसा मिळवून तरी काय फायदा?
एवढे नोकरचाकर, गडीमाणसे राबतात. एकाला दोन बंगले, गडगंज इस्टेट, सोन्याचांदीची भांडी, दागदागिने, काश्मिरी कारपेट्स साऱ्या जगातून आणलेल्या शोभेच्या सुंदर सुंदर वस्तू...
कोणत्या गोष्टीची ददात आहे? एवढं ऐश्वर्य पायाशी लोळणं घेतंय, पण त्याचा उपयोग काय? नाव नाही... एका रात्रीत नाव व्हावं, पेपरात सगळीकडे छापून यावं असं काहीतरी इल्लम काढले पाहिजे.
आणि एक दिवस संपतरावांनी इल्लम काढलं!

# खट्याळ खलाशी

## आणि गडबड गोष्टी

**निर्मला मोने**

**किंमत : ३०/-रु.**




घड्याळातून कोकिळा कशी आली पळून
आक्रोडाच्या होड्यांतून ठेंगू गेले निघून
बाहुली पडली आणि उशीतच लपली
हत्तीची चांगली खोडच मोडली
खेळण्यातील खेळणी खुदखुद हसतात
गडबड गोष्टी मग मजा मजा सांगतात

**२ री आवृत्ती**



# प्रख्यात कायदेपंडित फली नरिमन यांच्या भेटीचा अविस्मरणीय योग

अन्य भाषेतील साहित्याचे मराठीत भाषांतर करणे या 'उद्योगा'चे काही खास फायदे आहेत. प्रसूतीच्या वेदना सहन न करता पुत्रसुख मिळते, स्वतंत्र प्रतिभा, सर्जनशीलता यांसारखे 'विरळा' गुण नसतानाही भाषेशी जवळीक करता येते, मातृभाषेतील साहित्यात मोलाची भर घालण्याचे श्रेय मिळते, परभाषा न जाणणाऱ्या अथवा त्यांच्याशी जवळीक नसणाऱ्या वाचकांची सेवा करता येते, निरनिराळ्या भाषांतील मौलिक साहित्य वाचायला, अभ्यासायला मिळते, त्यातील संदर्भांचा शोध घेताना ज्ञानात भर घालता येते आणि विशेष म्हणजे मूळ पुस्तकाच्या लेखकाची भेट घेण्याची सुवर्णसंधी मिळते, त्याच्याशी संवाद साधण्याच्या अलौकिक आनंदाचा प्रत्यय घेता येतो.

मी या लेखकभेटीच्या आनंदाची चव दोनदा घेतली आणि आता ते सुख मिळविण्याची मला चटक लागली आहे. मी त्यासाठी उत्सुक असतो आणि त्यासाठीचे आवश्यक ते सर्व प्रयत्नही हिरीरीने करतो. स्टीफन हॉकिंग यांची प्रथम पत्नी जेन हॉकिंग यांची केंब्रिज येथे आणि महान कवी, गीतकार गुलजार यांची त्यांच्या 'बोस्कियाना' या निवासस्थानी घेतलेली भेट हे माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग ठरले आहेत. तसाच आनंद सोमवार, १८ नोव्हेंबरला दिल्लीत पद्मविभूषण फली नरिमन आणि त्यांच्या पत्नी बाप्सी यांना भेटून मिळाला.

मेहता पब्लिशिंग हाऊसने आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वकील आणि कायदातज्ज्ञ फली नरिमन यांच्या 'बिफोर मेमरी फेड्स' या आत्मचरित्राच्या अनुवादाचे काम मला दिले. वकीलाचे आत्मवृत्त म्हटल्यावर त्यात फक्त राज्यघटना, कायदा, त्यांनी स्वत: जिंकलेले आणि कदाचित काही हारलेलेही आणि देशा विदेशात गाजलेले इतरांचे




काही अवघड, किचकट, लक्षणीय खटले (फली नरिमन म्हटल्यावर कोणालाही लगेच आठवणारा कुप्रसिद्ध भोपाळ वायुगळतीचा कार्बाइड इंडिया आणि भारत सरकार यांच्यातील प्रदीर्घ आणि संवेदनशील खटला), त्यातील अत्यंत प्रभावीपणे बाजु मांडणारी कसबी वकीलांची परिणामकारक भाषणे, त्यांचे अभूतपूर्व आणि ऐतिहासिक ठरलेले निकाल हेच सगळे त्यात असणार ही माझी समजूत. पण या आत्मचरित्राने ती खोटी ठरवली. रंगूनच्या शाळेत शिळेवर गाणे वाचवणारा लहानगा विद्यार्थी ते राष्ट्रपतींबरोबर ऊठबस करणारा, आंतरराष्ट्रीय सभा परिषदा गाजविणारा आदरणीय कायदेतज्ज्ञ आणि आपल्या विषयातील गहन ग्रंथ, पुस्तके, लेख, अहवाल याबरोबरच देश विदेशातील विद्वान, तत्त्वज्ञ, लेखक, कवी, नाटककार याच्या साहित्याचेही चौफेर वाचन असणारा अभ्यासू आणि रसिक - अशी फली नरिमन यांची अनेकविध रूपे पाहून मी थक्क झालो.

‘विसरतं म्हणून नाही, विसरावं लागतं म्हणूनच आपण विसरतो!!’

‘स्मृतीच्या खोल गर्तेत तळाशी पडून राहिलेल्या भूतकाळाला वर काढण्याचा, त्याला परत बोलावण्याचा निर्धोक, पण जरासा अनौपचारिक, गोष्टीवेल्हाळ मार्ग म्हणजे आपल्या टेबलाचं, सामानानं खच्चून भरल्याने घट्ट बसलेलं ड्रॉवर ओढून ओढून उघडून काढणं! तुम्ही नेमकं काहीतरी शोधत असाल तर ते कदाचित सापडणार नाही, पण ड्रॉवरच्या मागे पडलेलं, दडलेलं - इतर बरंच काही सापडेल, आणि तेच बऱ्याच वेळा मनाला जास्त आकर्षित करणारं, त्याला वेढून टाकणारं, तळातून ढवळून टाकणारं असेल!’

माझ्या गृहिताचा निरास पुस्तकाच्या प्रारंभीच्या या दोन - अनुक्रमे मॅथ्यू अरनॉल्ड आणि नाटककार जेम्स बॅरी यांच्या उद्धरणांपासूनच सुरू झाला. वकीलाचे आत्मचरित्र भाषांतर करायचे म्हणून मी पहिल्या प्रथम 'लॉ डिक्शनरी' पैदा केली. पण मला त्यात विल्यम हॅन्ले याची जगप्रसिद्ध 'इन्व्हिक्टस' ही कविता, उमर खय्याम याच्या रुबाया आणि रवीन्द्रनाथ टागोर यांचे गीतांजलीतील काव्य भाषांतर करण्याची सुवर्णसंधी प्राप्त होणार आहे, शेक्सपीयर, इमर्सन, चेस्टरसन, इतकेच काय सर आर्थर कानन डायल या लेखक, नाटककारांची आणि बायबल, शहानामा, इसापनीती यांसारख्या ग्रंथातील अत्यंत चपखल अशी वचने, ख्यातनाम वकील, खंदे न्यायाधीश, सरन्यायाधीश यांच्या बरोबरच दलाई लामा आणि मदर तेरेसा यांच्या प्रत्यक्ष भेटीची अप्रतिम वर्णनेही वाचायला मिळणार आहेत, भावरहीत, गंभीर चेहऱ्याने न्यायालयात युक्तिवाद करणाऱ्या वकीलाच्या लेखनात बहारीच्या, नर्म प्रकृतीच्या विनोदांचीही पखरण असणार आहे याची मला कल्पना नव्हती.

या माझ्या आनंदाश्चर्यात भर टाकली ती त्यांच्या अफाट स्मरणशक्तीच्या प्रत्ययाने. वाचलेले, अभ्यासलेले लक्षात राहणे हे समजू शकते, परंतु ज्येष्ठ वकील, न्यायाधीश, सर जमशेटजी कांगा यांसारखे पितृतुल्य मार्गदर्शक यांनी केवळ कथन केलेले, सभा, संमेलने, भेटीगाठी, चर्चा, गप्पा यात ऐकलेले अनेक प्रसंग, सत्यकथा, हितोपदेश हेही तपशीलवार, त्यांच्या संदर्भासह स्मरणात राहणे आणि त्यांचा योग्य ठिकाणी योग्य असा वापर करणे यातील त्यांचे कसब मात्र खरोखरच विरळा. त्याचे दर्शन खूप भावले, मनाला भिडले.

अन्यायकारक आणीबाणी जाहीर झाल्याचे वृत्त कळताच आपल्या ॲडिशनल सॉलिसिटर ऑफ इंडिया या मानाच्या सरकारी पदाचा तत्काळ राजीनामा देणारा हा न्यायप्रिय, सडेतोड वकील हा एक मृदु, ऋजू वृत्तीचा, पत्नीला प्रेम आणि मान देणारा, तिचे ऋण मान्य करणारा कुटुंबवत्सल, मायाळू, प्रेमळ पारशी आहे ही गोष्टही अपवादात्मक आणि म्हणूनच विशेषत्वाने जाणवले.

पुस्तकाने जो आनंद दिला होता, काही जगप्रसिद्ध कवितांचे मराठी काव्यात भाषांतर करण्याची सुवर्णसंधी दिली होती आणि फली नरिमन यांच्याविषयी जो आत्यंतिक आदर मनात निर्माण झाला होता तो त्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्यापाशी व्यक्त करावा, त्यांना धन्यवाद द्यावेत ही इच्छा साहजिकच मनात घर करून राहिली होती आणि मी त्यांच्या भेटीची संधी शोधतच होतो. दिल्लीला जाणे काही सहजी घडणारे नाही. पण कर्मधर्मसंयोगाने आमची आग्रा, दिल्ली आणि अमृतसर अशा सहलीची योजना ठरली आणि माझ्या मनाने उचल खाल्ली ती दिल्लीतील अल्पशा मुक्कामात फली नरिमन यांना भेटण्याची. अशी सुसंधी मी नक्कीच दवडणार नव्हतो.

पद्मविभूषण हा मान मिळालेल्या वलयांकित व्यक्तीची भेट मिळेल की नाही याचीच शंका होती. जवळ महिनाभर प्रयत्न करावे लागले. अखेर मूळ इंग्रजी

पुस्तकाच्या ‘हे हाऊस’ या प्रकाशनगृहाच्या मदतीने सहलीला निघण्याच्या काहीच दिवस आधी ती मिळाली.

दिल्लीतील रस्त्यावरून वाहने धावतात कमी, खोळंबून उभीच जास्त वेळ राहतात. अशा बेभरवशाच्या रहदारीतूनही भेटीची वेळ चुकू नये म्हणून भरपूर आधी निघूनही ठरलेल्या दुपारी चारच्या वेळेच्या तीनच मिनिटे आम्ही - मी आणि माझी पत्नी सरिता - त्यांच्या हौज खास या भागातील बंगल्यासमोर पोचलो. बंगल्याचे प्रवेशद्वार अर्धवट उघडे. पस्तीस वर्षे वास्तव्य असलेल्या त्या बंगल्यात पूर्ण शांतता नांदत होती. निर्मनुष्य व्हरांडा. डाव्या बाजुने वर जाणारा जिना. आजुबाजुला चिटपाखरू नाही की कुठून काही चाहुल नाही. धाडस करून व्हरांड्यातील दारावरील घंटा वाजवली त्यावेळी बरोबर चार वाजले होते. दार उघडणाऱ्या सेवकाने काही ओळख न मागताच आत घेतले आणि बसायला सांगितले. आम्ही बसतच होतो, खोलीच्या दुसऱ्या बाजूचे दार उघडून दुसऱ्या एका सेवकाने पाण्याचे ग्लास आणून ठेवले. लांब पण अरुंद खोलीच्या सजावटीत आधुनिकतेचा अभाव आणि जुन्या पुराण्या गोष्टींचा प्रभाव दिसत होता. त्यात लहानमोठ्या फोटोंची संख्या लक्षणीय होती.

काही क्षणातच, पाणी घेऊन येणारा सेवक ज्या दारातून आत आला होता त्याच दारातून फली नरिमन यांचे स्फूर्तिस्थान असणाऱ्या त्यांच्या पत्नी बाप्सी नरिमन यांनी प्रवेश केला. पुस्तकातील छायाचित्रे स्मरणात ताजी असल्याने त्यांना ओळखण्यास जराही विलंब लागला नाही. त्यांच्या प्रथमदर्शनात प्रकर्षाने जाणवला तो कमालीचा साधेपणा आणि अनौपचारिकपणा. भेटीचा पूर्ण वेळ त्याच दोन गोष्टींचा सुखद अनुभव येत राहिला. त्यांनी हसतमुखाने आमचे स्वागत केले आणि चहा कॉफी विचारली. दार किलकिले करून सेवकाला त्याप्रमाणे सूचना देऊन त्या आमच्या समोर खुर्चीवर बसल्या. आमच्या सहलीच्या ठरलेल्या कार्यक्रमानुसार नेमक्या दिवशीच्याच भेटीची मी मागणी केली असल्याने आम्ही सहलीला आलो आहोत हे त्यांना माहित होते. त्यांनी आमच्या सहलीबद्दल चौकशी केली. सेवकाने खाद्यपेयाचा ट्रे आणून टेबलावर ठेवला. आम्ही ताजमहाल, अक्षरधाम याविषयी बोलत असतानाच फली नरिमन दार उघडून खोलीत आले.

मला अशी जाणीव झाली की त्यांचा प्रवेश होताच खोली उजळली. त्यांनी आम्हा दोघांशी हस्तांदोलन केले. हाताची पकड दृढ होती, दीर्घ होती, ऊबदार होती. त्यांनी आम्हाला खाण्यापिण्याचा आग्रह केला.

भाषांतर करताना मला जे जे जाणवले होते, भावले होते, भिडले होते त्याविषयी मी मनमोकळेपणाने बोललो. त्यांचे चौफेर वाचन, तीव्र स्मरणशक्ती, नर्म विनोद यांची मी मन:पूर्वक प्रशंसा केली. आत्मचरित्र लिहिण्याचे आधीपासून मनात होते आणि त्यासाठी काही नोंदी करणे सुरू ठेवले होते का या माझ्या प्रश्नाला त्यांनी ठाम नकार दिला. प्रकाशकांनी त्यांची काही महत्त्वपूर्ण भाषणे संकलित करून

प्रकाशित करण्याचा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवला होता, तो नाकारून त्यांनी आत्मचरित्राचा पर्याय सुचवला. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन अशीच प्रकाशकांची स्थिती झाली असली पाहिजे! त्यावरून एक गोष्ट सिद्ध झाली की काही खटल्यांचा अपवाद वगळता बाकीचे सर्व तपशील हे त्यांच्या असाधारण स्मरणशक्तीचेच द्योतक होते! खटले, त्यांची युक्तिवादाची भाषणे यांच्या नोंदी मात्र ते अतिशय पद्धतशीरपणे ठेवीत असे बाप्सी यांनी आवर्जून सांगितले.

बऱ्याच वेळा शब्दातून प्रकट होणारा लेखक, कवी आणि प्रत्यक्षातला माणूस यात जमीन अस्मानाचे अंतर असण्याचा अनुभव येतो. परंतु फली नरिमन यांच्या बाबतीत मात्र पुस्तक वाचताना आणि त्याचे भाषांतर करताना त्यांचे जे व्यक्तिचित्र डोळ्यांसमोर उभे राहिले होते आणि मनात साठले होते ते प्रत्यक्ष भेटीत तसेच्या तसे समोर उभे ठाकले! ते आमच्याशी जे बोलले, ज्या पद्धतीने त्या उभयतांनी आम्हाला वागवले त्यातून त्यांच्या सर्व गुणांचा प्रत्यक्ष प्रत्यय आला. वातावरणात जराही तणाव नव्हता, हास्याची कारंजी उडत होती. पुस्तकात वर्णन केलेल्या ज्या ज्या प्रसंगांचा उल्लेख निघाला त्यातील कित्येकांचे वर्णन पुन्हा तसेच्या तसे त्यांच्या तोंडून ऐकताना खूप मजा आली. त्या साऱ्या गोष्टी त्यांच्या स्मरणात कशा कायमच्या खोल रुजलेल्या आहेत हे समजले. त्यांचे नुसते वर्णन करूनच ते थांबले नाहीत तर त्यांनी आम्हा दोघांना आत नेले, घर ओलांडून मागील व्हरांड्यात नेले आणि तेथील भिंतींवर लावलेल्या असंख्य फोटोंपैकी उल्लेख झालेल्या प्रसंगांशी संबंधित फोटो, शिवाय गांधी, नेहरू, भारताचे आणि अमेरिका व इतरही काही देशांचे राष्ट्राध्यक्ष यांच्यासमवेतचे त्यांचे काही संस्मरणीय फोटोही त्यांनी खाली काढून आम्हाला आत्मीयतेने दाखवले. आत जाताना आम्हाला त्यांची पुस्तके, कागदपत्र यांनी ओतप्रोत भरलेली 'स्टडी'ही पाहायचेही भाग्य लाभले.

बाप्सी यांनी माझ्या पत्नीची मोठ्या अत्मीयतेने चौकशी केली. फली आणि बाप्सी यांच्यात जो संवाद घडत होता त्यातून पती पत्नीतील नाते खरोखरच किती घट्ट, जवळचे आहे हे जाणवत होते.

बरोबर नेलेल्या पुस्तकावर मी त्यांची सही मागितली.

To,

Dear Sudarshan & dear Sarita,

With fond regards -

We thank you for translating this book in "our" Marathi language & enjoying it.

असे त्यांनी लिहिले. त्यांनी मला त्यांचे नवे पुस्तक 'The State of the Nation' भेट दिले.


अर्ध्या तासाने मी निरोपाची भाषा सुरू केली पण खोलीबाहेर पडलो तेव्हा पाऊण तास उलटला होता. फली आणि बाप्सी दोघेही आमच्याबरोबर बाहेर व्हरांड्यात तर आलेच शिवाय बंगल्यासमोर गाडी उभी करता येणे शक्य नसल्याने आमच्या गाडीचा ड्रायव्हर गाडी घेऊन लांबवर गेला होता, त्याला फोन करून बोलावून तो येईपर्यंत ते दोघे आमच्या सोबत थांबले, व्हरांड्यातील खुर्च्यांवर बसून गप्पा सुरूच राहिल्या. इतकेच नव्हे तर त्यांनी त्यांची गाडीही आम्हास देऊ केली.

आमची गाडी आली. आम्ही त्या दोघांचा निरोप आणि त्यांच्या अल्पशा सहवासाने दिलेला निर्भेळ आनंद बरोबर घेऊन परतलो.

या भेटीची 'मेमरी कधीच फेड' होणार नाही हे नक्की.

**– सुदर्शन आठवले**

■




# छत्रीची जादू
## आणि इतर कथा

**राजीव तांबे**

**किंमत : ३०/-रु.**


**२ री आवृत्ती**



**ससोबा हसोबाची मस्त
मस्ती वाचता वाचता
सगळेच हसती
हाऽ हाऽ हाऽ**




# विनोदी कथांची चवदार मिसळ




मराठी साहित्यात कथालेखक म्हणून प्रा. द. मा. मिरासदार यांचे योगदान मोठे आहे. ग्रामीण जीवनावर त्यांनी लिहिलेल्या कथा विशेष गाजल्या. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, गडकरी, आचार्य अत्रे, चिं. वि. जोशी, पु. ल. देशपांडे यांनी निर्माण केलेली मराठी विनोदी साहित्याची समृद्ध परंपरा मिरासदारांनी पुढे चालवली. एवढेच नव्हे, तर ग्रामीण वातावरण आणि विनोदी कथा या दोन थरांना एकत्र आणून एक स्वतंत्र गट तयार केला. एकूण २० पेक्षा जास्त कथासंग्रह, रूपांतरित कादंबऱ्या तसेच मी लाडाची मैना तुमची हे वगनाट्य आदि लेखन केले. चित्रपट लेखनाच्या क्षेत्रातही त्यांनी मोठी कामगिरी केली असून एक डाव भूताचा, ईर्षा, ठकास महाठक, गोष्ट धमाल नात्याची आदी अनेक चित्रपटाच्या पटकथा लिहिल्या.

उत्कृष्ट पटकथा संवादलेखनासाठी त्यांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त झाले असून लेखक म्हणून ‘गदिमा पुरस्कार’, अत्रे पुरस्कार, काकासाहेब गाडगीळ पुरस्कार तसेच ‘दीनानाथ मंगेशकर पुरस्कार’ देऊन सन्मान करण्यात आला.

१९९८ साली परळी वैजनाथ येथे भरलेल्या ७१व्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील व द. मा. मिरासदार यांनी महाराष्ट्रात, देशात तसेच परदेशात कथाकथनाचे अनेक कार्यक्रम करून मराठी कथेला लोकप्रिय केले.

'भोकरवाडीतील रसवंतीगृह' या कथासंग्रहात एकूण १९ कथा आहेत. जीव देणे आहे, न झालेला भूकंप, वशीकरण अत्तर, येथे खुर्च्या मिळतील, एका सदोबाची चित्रकथा ही कथांची शीर्षकेच कथांच्या अंतरंगाचे दर्शन घडविणारी समर्थ आहेत.

'जीव देणे आहे' या कथेतील बजरंग जीव देण्याचे सर्व मार्ग असफल झाल्यामुळे एकटाच वाड्यामध्ये विचार करत आहे. जीव देण्याचा मला पूर्ण अधिकार आहे. तरीसुद्धा ती गोष्ट मला करता येऊ नये. म्हणजे काय? जगात अनेक सुखसोयी आहेत, त्यात हीही सोय करून ठेवली पाहिजे. एखादी 'एक्स्प्रेस' या कामासाठी असावी. तिने कधीही वेळ चुकवू नये गावात एखादी तरी विहीर, तलाव असा असावा की, ती या कामासाठीच बांधला जावा, गळफास कसा घ्यावा याचे शिक्षण देणारे वर्ग निघावेत आणि त्याला सरकारी मान्यता असावी. जीव द्यायच्या गोळ्या तरी निदान दुकानात ताबडतोब मिळाव्यात आणि त्या कशा, किती व केव्हा घ्याव्यात ही माहिती दुकानदारानेच गरजू माणसाला द्यावी ही काय हरकत आहे? असे घडलेच पाहिजे नाही तर जागा भाड्याने देणे आहे, या पद्धतीने आपल्याला उद्या वर्तमानपत्रात 'जीव देणं आहे, अशी जाहिरात देऊन माहिती मागवावी लागेल? त्यापेक्षा असंच घडलं, तर ते सोईचे होणार नाही का?

'येथे खुर्च्या मिळतील' ही सुद्धा अशीच एक मसालेदार कथा. देशभक्त बाबूरावांनी खुर्च्यांचा धंदा सुरू केला अन् आश्चर्य वाटून गुरुजींनी त्यांच्या दिवाणखान्यात पाऊल टाकलं 'खुर्च्या'ची चौकशी करायला आणि त्यांना माहिती मिळाली ती अशी धक्कादायक. नंबर दोनचा पैसा सगळ्यांजवळ भरपूर. राजकारणात बसण्याची प्रत्येकाशी जबरदस्त इच्छा. बाबूराव हे गावातले मुरलेले राजकारणी, मार्गदर्शन देण्यासाठी त्यांना ही कल्पना सुचली. त्यांनी देशभक्तीचा एक अभ्यासक्रम तयार केला. पहिला अभ्यासक्रम म्युनिशीपालटी अन् महानगरपालिका हे प्राथमिक शिक्शन (शिक्षण) निवडणुकीच्या टाइमला पैसा सोडायचा दाबून. आपल्या देशात हे एक बरं हाई... पैसा सोडला की काय वाट्टेल ते करायला मानसं तयार असत्यात. साध्या मेंबरच्या खुर्चीची किंमत किती? प्रेसिडेंटच्या खुर्चीची किंमत किती? या खुर्च्यांची किंमत कितीही भरमसाट असली तरी तो शहाण्या माणसाने खुशाल द्यावी आणि पट्दिशी खुर्चीवर बसावे. खुर्च्या पुन्हा ते पैसे दामदुपटीने

परत देतात. रस्ते दुरुस्ती, दिवाबत्ती, कचरा डेपो, प्राथमिक शाळा, जकात नाका या सर्व पैशाच्या खाणी आहेत. पायाळू माणसाला ज्याप्रमाणे पाणी कोठे आहे, हे बरोबर दिसते. तसेच या खुर्चीत बसलेल्या थोर पुरुषास पैशांची खाण कुठे कुठे आहे ते दिसते.

अशा या विविध कथा.

न होणाऱ्या भूकंपाची अफवा उठवून आपला स्वार्थ साधणारे विमा एजंट, फुकटात मिळते म्हणून पैज लावून पातेलेभर लोणी खाणारा आचरट दामू, मित्राचे लग्न होण्यासाठी अनेक लटपटी, खटपटी करणारा मित्र, पिण्याच्या पाण्यासाठी केली जाणारी भोकरवाडीतील समाजसेवा हे सर्व मुळातून वाचणेच इष्ट. आपले मंदिर केव्हा प्रसिद्ध होते तर भक्तांना स्वच्छतेची जाचक वाटणारी अट काढणे, कुठेही केरकचरा घाण करायला मोकळीक देणे, कळकट पुजारी नेमणे आणि मुख्य म्हणजे देवळाच्या बाहेर भिकाऱ्यांची रांग लावणे त्यामध्ये महारोगीपण असतील याची दक्षता घेणे, यामुळे मंदिर फार पवित्र आहे आणि प्रसिद्ध आहे आणि इथला देव भक्तांना पावतो. हे लोकांना पटतं. मंदिराला भरपूर देणग्या मिळू लागतात आणि मंदिराची कीर्ती सर्वत्र दुमदुमू लागते.

एका सदोबाची चित्तरकथा ही सुद्धा मनाला चटका लावून जाते. आधुनिक विक्रीकलेचा गंधही नसलेला सदोबा. भरभराटीची आणि सुबत्तेची काही वर्षे संपल्यानंतर गिऱ्हाईक कमी कमी होत गेलं. फार हाल झाले त्यांचे शेवटी. सदोबा नेवालकर उपासमारीने मेला!


द. मा. मिरासदार यांनी व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात दै. भारत मध्ये पत्रकार म्हणून केली. काही काळ ना. सी. फडके संपादित साप्ताहिक 'झंकार' मध्ये लेखन करत होते. लेखनाबरोबरच त्यांनी सामाजिक कार्यही केलं. अ. भा. विद्यार्थी परिषदेचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते. आणीबाणीच्या काळात त्यांनी केलेली भाषणे गाजली. संस्कार भारतीचे उपाध्यक्ष तसेच मराठी साहित्य परिषद, पुणेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. मराठी साहित्याला त्यांनी मोठी देणगी दिली आहे.

**भोकरवाडीतील रसवंतीगृह**
लेखक - द. मा. मिरासदार
प्रकाशक - मेहता पब्लिशिंग हाऊस
पृष्ठ - १४८, मूल्य १५०रु.
*(बेळगाव तरुण भारत. नोव्हेंबर २०१३)*

■

४ थी आवृत्ती

# की नोट




मूळ लेखक

**आर. एम. लाला,**

**एस. ए. साबवाला**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

नऊ प्रकरणांत विभागलेल्या या पुस्तकात जे.आर.डी. टाटांनी सुमारे पन्नास वर्षांहून अधिक काळात त्यांच्या कंपन्याच्या भागधारकांसमोर दिलेली अध्यक्षीय निवेदने व भाषणे यांतील काही उताऱ्यांचे संकलन आहे. अर्धशतकाहून अधिक काळ देशातील मोठ्या औद्योगिक समूहाचे नेतृत्त्व करणाऱ्या जे.आर.डींच्या मनन चिंतनाचा परिपाक या पुस्तकात पाहायला मिळतो.

आर्थिक प्रश्न, उद्योग, नियोजन, मानवी नातेसंबंध, लोकसंख्या... अशा विस्तृत विषयमालिकेचा परामर्श घेणाऱ्या, जे.आर.डींचे काळाचे पावले ओळखणारे विचार इतिहासाचा मौल्यवान दस्तऐवज बनून वाचकांसमोर येतात व त्याला विचारप्रवृत्त करतात.




२ री आवृत्ती

# ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स

मूळ लेखक : **केन फोलेट**


अनुवाद : **ज्योत्स्ना लेले**

**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

इराणमध्ये इलेक्ट्रॉनिक डाटा सिस्टीम कॉर्पोरेशन (इ.डा.सि.) या अमेरिकन कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांना विनाकारण, विनाचौकशी तुरुंगात डांबले. जामीन ठोठावला. प्रचंड १३,०००,००० अमेरिकन डॉलर! ही वार्ता अमेरिकेत वणव्यासारखी पसरली.

रॉस पेरो या कंपनीच्या मालकाची तळपायाची आग मस्तकाला पोहोचली. क्रांतीच्या अंदाधुंद वातावरणात सर्व सनदशीर मार्ग ठप्प झाले होते. आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी तळमळत असणाऱ्या या आगळ्यावेगळ्या धन्यासमोर आता एकच धोकादायक मार्ग होता. इराणच्या अभेद्य तुरुंगाला भगदाड पाडणे. ऑपरेशन हॉट फूड या धाडसी योजनेचा सूत्रधार होता. निर्भेड, निवृत्त आर्मी कर्नल बुल सायमन योजना असफल झाल्यास दोन जणांऐवजी अनेकांना प्राण गमवावे लागणार आणि वर अपरिमित नुकसान व मानहानी!

सायमनने इ.डा.सि.च्याच अकरा कर्तबगार अधिकाऱ्यांना हाताशी धरले. ही योजना कशी आखली. अल्पशा काळात सर्वांना प्रशिक्षण कसे दिले. तुरुंग फोडला का? ही चित्तथरारक परमशौर्याची सत्यकथा आपल्यासमोर उलगडत जाते. व उत्कंठा शिगेला पोहोचते. सुटका पथकाच्या बारा जणांनी घेतलेली ही जबरदस्त गरूडझेप!





७ वी आवृत्ती

# विरंगुळा

**द. मा. मिरासदार**

**किंमत : १३०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

धकाधकीच्या शोधात ‘विरंगुळा’ शोधणारे तात्या...
ओढग्रस्त परिस्थितीत विठोबाला दिलासा देणारा ‘पाऊस’...
आयुष्याच्या शेवटापर्यंत भिकूची पाठ न सोडणारे त्याचे ‘भोग’...
लग्नात आडकाठी आणणारा बुधाच्या आयुष्यातील ‘धोंड्याचा महिना’...
औषधाचा खुराक खाण्यासाठी ‘मधुचा आजारी पडण्याचा प्रयोग’...
एका दिवसाच्या भाकरीचा प्रश्न सोडवणारं ‘गवत’...
अशा प्रतिकूल परिस्थितीतही आयुष्यातील आनंद शोधणारी सामान्यातील असामान्य माणसं...
द. मा. मिरासदारांनी आपल्या खास शैलीत रेखाटलेली आहेत. ती आपल्याला ‘विरंगुळ्या’चा क्षण देऊन जातात.




२ री आवृत्ती

# इमॅजनिंग इंडिया

मूळ लेखक : **नंदन निलेकणी**

अनुवाद : **अपर्णा वेलणकर**

**किंमत : ६४०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

समकालीन संदर्भात अत्यंत महत्त्वाच्या अशा या पुस्तकात भारताचा प्रदीर्घ इतिहास, गुंतागुंतीचे वर्तमान आणि अनेक शक्यतांना जन्माला घालणारे भविष्य यांचा एक सुसंगत असा अन्वय लावण्याचा प्रयत्न नंदन निलेकणी यांनी केला आहे.
स्वातंत्र्योत्तर काळातल्या समाजवादी धोरणांमागचे तत्कालीन उद्देश कितीही चांगले असले, तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र या धोरणांची परिणती लोकशाही खिळखिळी करणाऱ्या कुचंबल्या वर्तमानात कशी आणि का झाली, याचे सखोल विवेचन निलेकणी यांनी केले आहे.
वर्तमान आणि भविष्य यांचा खंबीर आधार म्हणून उदयाला आलेली भारतातील तरुण लोकसंख्येची दमदार शक्ती हा कळीचा मुद्दा का आहे; याचे विश्लेषण हा या पुस्तकाचा महत्त्वाचा भाग.
माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने होत जाणाऱ्या क्रांतीमुळे केवळ व्यापार, उद्योग आणि सरकारी कारभारातच नव्हे; तर बहुसंख्य भारतीयांच्या आयुष्यात किती रोमांचक परिवर्तन घडते आहे; याचे अत्यंत रोचक वर्णन या पुस्तकात आहे.
जातीच्या गणितांवर बेतलेले राजकारण, कामगार क्षेत्रात दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या सुधारणा, पायाभूत सुविधांची उभारणी, उच्च शिक्षणाचे क्षेत्र आणि भारतातला इंग्रजी भाषेचा वाढता प्रभाव यांसारख्या कळीच्या वादग्रस्त मुद्द्यांचे नंदन निलेकणी यांनी विस्ताराने आणि संपूर्णतः नव्या दृष्टिकोनांसह विस्तृत विवेचन केले आहे.
जिथे काही बलाढ्य कंपन्यांच्या वार्षिक उलाढालीचे आकडे हे छोट्या देशांच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेपेक्षाही मोठे होत चालले आहेत, अशा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शासन संस्थांची नेमकी भूमिका काय; याचाही ऊहापोह निलेकणी यांनी केला आहे.
सार्वजनिक आयुष्यातल्या प्रत्येक क्षेत्रात नवविचारांची-नवनिर्मितीची आणि सुधारणांची गरज अधोरेखित करणारे हे पुस्तक भविष्य तोलून धरू शकतील, अशा नव्या संकल्पना समोर ठेवते.
खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक असणाऱ्या लोकशाही व्यवस्थेपासून सामाजिक सुरक्षेच्या छत्रापर्यंत आणि सार्वजनिक आरोग्याच्या सक्षम क्षेत्रापासून शाश्वत ऊर्जा-धोरणापर्यंतच्या या नव्या संकल्पना वर्तमान राजकारणाला ओलांडून पुढे येतील आणि त्यातूनच देशाचे भविष्य आकाराला येईल, असा युक्तिवाद नंदन निलेकणी यांनी या पुस्तकात मांडला आहे.


२ री आवृत्ती

जॉन ग्रिशॅम
यांच्या तर्कशुद्ध, कायदेशीर
लेखणीतून उतरलेले एक अद्वितीय
थरारनाट्य

# द पेलिकन ब्रीफ

मूळ लेखक
**जॉन ग्रिशॅम**
अनुवाद
**रवींद्र गुजर**

**किंमत : ३४०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**




वॉशिंग्टन मध्ये एका अंधाऱ्या पोनों चित्रपटगृहात एका प्रेक्षकाचा गळा घोटून रहस्यमय खून होतो... सुप्रीम कोर्टातील दोन न्यायाधीश जगातून नाहीसे होतात.
आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेनं डार्बी शॉ या घटनेच्या खोलाशी जाऊन, गुन्ह्यांची संभाव्य उकल आपल्या संशोधनपर निबंधात करते.
डार्बी शॉच्या दृष्टीनं तो अंधारात मारलेला एक वकिली तीर होता... परंतु वॉशिंग्टनच्या राजव्यवस्थेला त्यामुळे सुरुंग लावण्याचा धोका निर्माण होतो. अनपेक्षितपणे डार्बी एका हत्येची साक्षीदार होते... वास्तविक तिथे तिचा बळी जाणं अपेक्षित असतं...
व्हाईट हाऊसच्या अंतर्गत गोटातून ही बातमी दडपून टाकण्यासाठी होणाऱ्या दबावाला न जुमानता डार्बीनं ब्रीफ कोणा कर्दनकाळांच्या हाती पडलं होतं. आपल्या असामान्य प्रतिभेचा वापर त्या दुर्दैवी कारस्थानासाठी कोणी केला? एका निर्भय पत्रकाराच्या मदतीने डार्बीने त्या भीषण रहस्याचा घेतलेला शोध– सत्य जगापुढे आणण्यासाठी केलेला जीवघेणा संघर्ष! पुरावे नष्ट करणारी दुष्ट शक्ती आणि पुरावे गोळा करणारी सुष्ट शक्ती यांच्यातील घनघोर संग्राम... **'द पेलिकन ब्रीफ'**

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे

रौप्यमहोत्सवी

# मराठी बालकुमार साहित्य संमेलन

## राजीव तांबे यांच्या अध्यक्षीय भाषणातील काही विचार



मुलांची अभिव्यक्ती ही आपल्याला समजेल अशीच असली पाहिजे असं नाही तर ती आपण मुलांकडून समजून घेतली पाहिजे.

तुम्ही तुमचं मोठेपण आणि पूर्वग्रह बाजूला भिरकावून दिले आहेत, याची जेव्हा खात्री मुलांना पटते तेव्हाच ती तुमच्याशी दोस्ती करतात आणि त्यांच्या कृतीमागील कार्यकारणभाव तुम्हाला समजावा यासाठी त्यांच्या भावविश्वात तुम्हाला सामावून घेतात.

मुलांसाठी लिहिताना आणि मुलांसोबत काम करताना ही गोष्ट मला सतत सावध करत असते.

बालसाहित्याबाबत भूतकाळाचा तपशीलवार आढावा न घेता वर्तमानात राहून भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न मी इथे करणार आहे.

बालसाहित्याचे किंवा साहित्याचे नेमके प्रयोजन काय? मुलांना शिकवणं, उपदेश करणं, तात्पर्य सांगणं, संस्कार करणं किंवा त्यांना घडवणं हे तर नव्हे आणि नव्हेच. बालसाहित्याचं प्रयोजन आहे, मुलांना दृष्टी देणं आणि मुलांना आनंद देत त्यांच्या विविध संकल्पनांबाबतच्या कक्षा रुंदावत नेणं. बालसाहित्य हे मुलांना शिकवत नाही तर शिकण्याच्या अनेकानेक पद्धती, विविध पर्याय मुलांसमोर सहजी उलगडून ठेवतं आणि मुलाला त्याच्यातील सुप्त शक्ती व सर्जनशीलता यांची जाणीव करून देतं. कारण बालसाहित्याचा पाया हा 'मुलांना गृहीत धरणे' हा नसून 'मुलांवरचा अपार विश्वास आणि मुलांवर निरपेक्ष प्रेम' हा आहे.

मुलांना जसे वेगवेगळे साहित्यप्रकार वाचायला मिळायला हवेत तसंच वेगवेगळे प्रकार लिहायलाही मिळायला हवेत. शाळेत मुलांना खूपच चाकोरीबद्ध लेखन करावं लागतं. ठरलेल्या पद्धतीनेच निबंध लिहिणे. विशिष्ट प्रकारेच कवितेचे रसग्रहण करणे किंवा टीपा लिहिणे. काही वेळा तो त्या सिस्टीमचा एक भागही असतो. पण सततची चाकोरी ही सर्जनशीलतेला मारक ठरते. मग कोवळ्या वयातच मुलांची

सर्जनशीलता ठेचली जाते आणि त्यांचे शिस्तबद्ध सैनिकांत रूपांतर होते.

चाकोरीबद्ध लेखनाचं दडपण कमी केलं की मुलांमधील सुप्त सर्जनशीलता अशी उसळी घेते.

प्रत्येक वर्गाची भित्ती-पत्रिका (वॉल पेपर) जरी सुरू केली तरी त्यावर मुलांना त्यांच्या आवडीचं, त्यांच्या पद्धतीने लिहिता येईल. जेव्हा मुले लेखनाच्या वेगवेगळ्या प्रकारातून स्वत:ला व्यक्त करू लागतील किंवा आपल्या मनातील विचार आपल्याच भाषेत मांडण्यासाठी वेगळे प्रकार शोधू लागतील तेव्हा साहजिकच मुले साहित्यातील विविध प्रकार वाचण्यासाठी उद्युक्त होतील.

पण आज मुलं खरंच काही वाचतात? आणि जर मुले वाचत नसतील तर याला जबाबदार कोण? **पण न वाचण्यासाठी सर्वस्वी मुलांनाच जबाबदार ठरवणं अन्यायकारकच होईल.** मुलांचं वाचन आणि त्याचे शिकण्याचे माध्यम यांचा जवळचा संबंध आहे. मातृभाषा आणि परिसर भाषा एकच असेल आणि मुलाचे शिकण्याचे माध्यमही तीच भाषा असेल तर त्या मुलांचे वाचन अधिक असते, घरात आणि समाजात तो ती भाषा सतत ऐकत असतो आणि चुकांची पर्वा न करता तो बोलतही असतो... नवनवीन संकल्पना समजून घेत असताना त्याची शब्दसंख्या वाढत जाते. जसजशी शब्दसंख्या वाढते तसा त्याचा आत्मविश्वास दुणावतो. त्याची विचार करण्याची भाषा आणि त्याची अभिव्यक्तीची भाषा यांचा घट्ट समन्वय साधला जातो. यामुळेच त्याला जे म्हणायचं आहे ते तो त्याच्या भाषेत, त्याच्या शब्दात बिनचूकपणे मांडू लागतो आणि नेमक्या याच क्षणी जर त्याच्या हाती पुस्तकं आली तर तो उत्तुंग भरारी घेतोच.

‘बालसाहित्य ही गंभीरपणे घेण्याची गोष्ट आहे हे लेखक, कवी, संपादक, चित्रकार आणि प्रकाशक यांनीही समजून घेतलं पाहिजे. मुलांसाठी लिहिताना जसा त्यांच्या वयोगटाचा विचार करावा लागतो तसाच त्या वयोगटाला साजेशी भाषा, वाक्यरचना आणि त्यांचं भावविश्व यांचा विचार करावा लागतो. लेखन शैलीतील चित्रमयतासुद्धा जशी वयोगटानुसार बदलत जाते तशीच वयोगटानुसार मुलांसाठी विविध साहित्य प्रकारांची गरज निर्माण होते. हे वयोगट म्हणजे, शिशू गट, किशोर गट व कुमार गट. हे तीन गट म्हणजे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक वाढीचे वेगवेगळे टप्पे आहेत. या प्रत्येक टप्प्यावरील मुलांचं भावविश्व वेगळं आहे. यामुळेच मुलांसाठी लिहिणाऱ्याला आपण कुठल्या वयोगटासाठी लिहित आहोत याची जाण असणं गरजेचं आहे.

खरं म्हणजे बालसाहित्याला कुठलाच विषय वर्ज्य नाही. कुठलाही विषय समंजसपणे व कल्पकपणे कसा मांडायचा इथे लेखकाचे कसब आहे. पण वेगवगळे साहित्य प्रकार मुलांसाठी समर्थपणे हाताळणारे लेखक आज दिसत नाहीत, मुलांना गूढकथा, विज्ञानकथा, विज्ञान कादंबऱ्या, प्रवासवर्णनं, प्राणीकथा, फँटसीकथा असे

अनेक प्रकार वाचायला हवे आहेत. काही तरुण प्रकाशक असं वेगळं साहित्य मुलांसाठी प्रकाशित करायला उत्सुकही आहेत. मग लेखक का लिहित नाहीत?

'वाचन संस्कृती' रुजविण्यात शाळांप्रमाणेच पालकांची पण महत्त्वाची भूमिका आहे. अगदी लहानपणापासून मुलांना पुस्तकांच्या दुकानात घेऊन जाणं, त्यांना पुस्तकं हाताळायला देणं, मुलांसोबत पुस्तकं वाचणं, मुलांना पुस्तक निवडीचं स्वातंत्र्य देणं आणि आपण वाचलेल्या, वाचत असलेल्या पुस्तकाविषयी मुलांशी आवर्जून बोलणं करावं लागतं. यातूनच मुले पुस्तकांकडे वळण्याची शक्यता असते.

आपण आपल्या वाचनाविषयी मुलांशी मोकळेपणाने बोलू लागलो, त्यांची मते ऐकून घेऊ लागतो की मुले वाचनाविषयी सजग होतानाच आस्वादकही होत असतात. पण त्याचवेळी मुलांच्या भावविश्वातल्या, त्यांच्या अंतरंगातल्या अनेक खुब्या आपल्याला उमगत जातात. विंदांच्या बालकविता वाचताना तर मी अनेकवेळा हा थरार अनुभवला आहे. त्यांची 'सर्कसवाला'ही दीर्घकविता तर मास्टरपीस आहे. या कवितेची शैली इतकी चित्रमय आहे की वाचता वाचता आपल्या डोळ्यासमोरून एक चित्रपटच सरकू लागतो. या कवितेतून विंदांनी मुलांचं मुलांचं भावविश्व अलवारपणे उलगडलं आहे. दोस्ती, प्रेम, असूया, जिव्हाळा आणि असाह्यता या भावभावनांचा गोफ या कवितेत असा घट्ट विणला आहे की कवितेचा शेवट जसाजसा जवळ येऊ लागतो तेव्हा व्याकूळ होणारी मुले मी पाहिली आहेत.

विंदांच्या बालकविता भन्नाटच आहेत. कारण त्या दोन पातळीवर आहेत, जेव्हा त्या कविता मुलं वाचतात तेव्हा त्या त्यांना त्यांच्याच वाटतात आणि जेव्हा मोठी माणसं त्या बालकविता वाचतात तेव्हा त्या कविता त्यांना मुलांकडे पाहण्याचा, मूल समजून घेण्याच्या नवीन दृष्टीकोन देतात. या बालकविता मोठ्या माणसांना अधिक प्रगल्भ करतात.

अनेक मोठ्या माणसांना वाटतं की ते मोठे झाले असल्याने त्यांना आता संस्काराची गरज नाही. त्यांची संस्काराची बॅटरी फुल झाली आहे. मुलांचे वय हे संस्कारक्षम असल्याने त्यांची संस्काराची बॅटरी सारखी चार्जिंगला लावली पाहिजे. येता-जाता, उठता-बसता सतत संस्कारांची फवारणी करायला पाहिजे.' 'बाल संस्कार कथा, संस्कार सीडीज् आणि संस्कार वर्ग असल्या मुलांना पकवणाऱ्या खुळचट कल्पना तात्पर्य छाप माणसांच्या डोक्यातूनच निपजल्या आहेत. संस्कार हे करता येत नाहीत किंवा संस्काराची कुठलीही रेसीपी नाही तर संस्कार हे होत असतात आणि ते फक्त मुलांवरच नाही तर जख्ख म्हाताऱ्या माणसांवरसुद्धा होत असतात, अगदी दगडावरसुद्धा होत असतात हे सत्य जर मोठ्या माणसांनी जाणून घेतलं तर मुले अधिक आनंदी होतील.

सध्या अनेक वर्तमानपत्रांच्या रविवार पुरवणीतून मुलांचे पान गायब होत आहे

आणि ज्या पुरवणीत मुलांचे पान आहे तिथे दर्जेदार बालसाहित्य अभावानेच आढळत आहे. काही पुरवण्यातून तर ‘संकलित साहित्य’ हे बालसाहित्य म्हणून खपवलं जात आहे. आणि ‘बालसाहित्याची समीक्षा’ ही तर फार लांबची गोष्ट झाली.

आचार्य अत्रेंनी स्वत: पाठ्यपुस्तकांची निर्मिती करून, संपादन करून आणि त्यात लिहून ही आजच्या बालसाहित्यिकांपुढे एक वेगळाच आदर्श ठेवला आहे. सई परांजपे यांच्या एकांकिका आणि त्यांचं ‘हरवलेल्या खेळण्यांच्या राज्यात’ अजूनही तितकंच ताजं आहे. तेंडुलकरांच्या नाटीका आजच्या मुलांना आपल्याच वाटतात. इंदिरा संत, शांताबाई, मंगळवेढेकर आणि वसंत बापट यांच्या काही बालकविता व जीएंची ‘बखर बिम्मची’ कालातीत आहेत.

आता ‘इ-बुक’ सुरू झालं आहे. आत्ता तरी किमान ४ टक्के मुलांना इ-बुक वापरता येईल. छपाईचा खर्च नसल्याने पुस्तकाची किंमत ही कमी आहे. सध्या तरी अनेक प्रकाशक आपल्या छापील पुस्तकांचेच इ-बुक मध्ये रूपांतर करत आहेत. म्हणजेच हातातल्या पडद्यावर दिसणाऱ्या मजकूराला ते इ-बुक म्हणत आहेत. प्राथमिक अवस्थेत हे समजून घेता येईल. पण पुढच्या ५ वर्षात तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होईल आणि उपकरणे स्वस्त होतील. पुढील ५ वर्षाचा वेध घेत आत्तापासूनच लेखक व प्रकाशकांना त्यांच्या कार्यशैलीत बदल करावे लागतील. हे बदल दोन पातळ्यांवर असतील, आशय (कंटेण्ट) आणि सादरीकरण (प्रेझेंटेशन) पुढील ५ वर्षात पुस्तकाची व्याख्या ही बदलणार आहे. रुढ अर्थाने वाचण्याची व पाने उलटण्याची पुस्तके असतीलच पण आता ‘इंटरॲक्टीव्ह टच स्क्रीन पुस्तके’ येऊ लागली आहेत. त्यानंतर ‘सेल्फ मॉनिटरींग व्हर्चूअल इंटरॲक्टीव्ह पुस्तके’ येत आहेत. या पुस्तकांची पुढची पिढी म्हणजे ‘कस्टमाईज्ड इंटरॲक्टीव्ह एक्सटेंडेड शेअरींग बुक्स’ असणार आहे. वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान व त्यामुळे निर्माण होणाऱ्या अफाट शक्यता समजून घेऊन सादरीकरणाच्या पद्धतीत तर आमूलाग्र बदल करावा लागणारच आहे पण आशयाची मांडणी ही नवीन तंत्रज्ञानाची कास धरूनच करावी लागणार आहे.

मी मुलांसाठी लिहित असताना माझे आदर्श कोण आहेत? मला रवींद्रनाथ टागोर, गिजुभाई बधेका, तोत्तोचानची लेखिका तेत्सुको कुरोयानागी, स्वामींच्या गोष्टी लिहिणारे आर. के. नारायण, रस्कीन बाँड, देनीसच्या गोष्टी लिहिणारे व्हिक्टर द्रागुन्सकी, लेखनाच्या शैलीचा विचार केला तर एनीड ब्लायटन आणि विज्ञान प्रसाराला आपलं आयुष्य समर्पित करणारे, मुलात मूल होणारे अरविंद गुप्ता, प्रत्येकी उपेक्षित मूल जणू आपलंच आहे असं समजून त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करत त्याच्या शिक्षणाचा ध्यास घेणाऱ्याला रेणू गावसकर आणि महाश्वेता देवी असे खूप जण आहेत. पण या सर्वात मला रवींद्रनाथ श्रेष्ठ वाटतात.

रवींद्रनाथांनी वयाच्या ऐंशीव्या वर्षी बालशिक्षणाचा ध्यास घेतला. बंगाली भाषा शिकण्यास मदत करणाऱ्या 'सहज पाठ' या तीन पुस्तिका लिहिल्या. त्यानंतर लिहिली अंकलिपी, हे सहज पाठ बंगालमधील प्रत्येक मुलाला, तोंडपाठ आहेत ते शासनाने सक्ती केली म्हणून नव्हे तर ते मुलांना आपले वाटतात म्हणून. हे सहज पाठ म्हणजे 'शरीर शिक्षणाचे पण आत्मा म्हणजे गाणी, गोष्टी, कविता, संगीत व गंमती-जमती' मुलांचं नातं हे आत्म्याशी असतं शरीराशी नाही याची रवींद्रनाथांना जाणीव होती. मुले गोष्टी वाचत, गाणी म्हणत, गमती-जमती करत कधी शिकली हे त्यांना कळतंच नसे. करी मनोरंजनातून शिक्षण जो मुलांचे जडेल नाते प्रभूशी तयाचे असा त्यांचा दृष्टिकोन होता. माझ्यासाठी ते वंदनीय आहेत.

मुलांनी मजेत शिकावं यासाठी मी प्रयत्न करत असतो, म्हणजे मी नेमकं काय करतो? बालसाहित्यिक म्हणून किंवा मुलांचा लेखक म्हणून 'मला कशाची खंत वाटते? किंवा कुठल्या गोष्टीबाबत मी असमाधानी आहे?'

शिक्षकांना मुलांना शिकवताना कोणत्या अडचणी येतात? कुठले घटक किंवा संबोध समजून घेताना मुलांचा गोंधळ होतो? अभ्यासातला कुठला भाग फारंच किचकट आहे असं वाटतं? हे मी त्यांच्याकडून समजून घेतो व मग तो कठीण भाग सोपा होण्यासाठी त्यांना एखादा नवीन खेळ, उपक्रम किंवा मजेशीर स्वाध्याय सुचवितो. थोडक्यात त्यांच्याच मदतीने त्यातून मार्ग काढतो.

मी मुलांसाठी काम करतो म्हणजेच मी सगळ्या मुलांशी बांधील आहे असं समजतो. पण तरीही मी नॉर्मल मुलांसाठीच काम करतो ही माझी खंत आहे. मला अंध, अपंग, कर्णबधीर, तृतीयपंथी मुले, उपेक्षित आणि मतिमंद मुलांसाठी काम करायचं आहे. त्यांचे प्रश्न मला समजून घ्यायचे आहेत. त्यांना शिकताना येणाऱ्या अडचणींतून काही मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत.

मध्यंतरी मी काही महिने सिडनीला गेलो होतो. तिथे काही शाळा पाहिल्या. वर्गात बसलो. खूप नवीन गोष्टी शिकलो. मला इतर देशांतील शाळाही पाहायच्या आहेत. त्यांच्या शाळांतल्या चांगल्या गोष्टी, शिकण्याच्या नवनवीन पद्धती मला देशातल्या मुलांसाठी आणायच्या आहेत.

मुलांना निर्भय वातावरणात आनंदाने स्वत:हून शिकता यावं, हेच काम आता करायचं आहे. लवकरच अशी संधी मला मिळेल याची मला खात्री आहे.

**– राजीव तांबे**
rajcoppergmail.com
www.rajivtambe.com
Cell : 9322399859
Resi : 02512454343


■

६ वी आवृत्ती

# सांगावेसे वाटले म्हणून

## शान्ता शेळके


**किंमत : १००/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**



कविता आणि गीते यांच्याइतकाच ललितलेखन हाही शान्ताबाईंच्या आवडीचा साहित्यप्रकार आहे. आतापर्यंत वेगवेगळ्या नियतकालिकांतून त्यांनी सदर लेखनाच्या निमित्ताने ललितलेख लिहिले आहेत, त्याप्रमाणे स्वतंत्रपणेही असे लेखन त्यांनी विपुल केले आहे. भोवतालच्या जगाविषयीचे अपार कुतूहल, मनुष्यस्वभावाचे कंगोरे न्याहाळण्याची आवड आणि स्वत:ला आलेले सुक्ष्मातिसूक्ष्म अनुभवही इतरांपर्यंत पोहोचवण्याची उत्सुकता या शान्ताबाईंच्या ललितलेखनामागील प्रमुख प्रेरणा आहेत. भरपूर वाचनामुळे येणारी संदर्भसंपन्नता, काव्यात्म वृत्तीतून निर्माण होणारी रसवत्ता आणि उत्कट जीवनप्रेम यांमुळे त्यांचे ललितलेख अत्यंत वाचनीय झाले आहेत. 'आनंदाचे झाड', 'पावसाआधीचा पाऊस', 'संस्मरणे', 'मदरंगी', 'एकपानी', या त्यांच्या ललितलेख-संग्रहाच्या परंपरेतलाच 'सांगावेसे वाटले, म्हणून' हा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण संग्रह. 'हेमाला मुलगी झाली', 'ययातीचा वारसा', 'फसवी दारे', 'संतुष्ट', 'मॅडम', 'पुन्हा पुन्हा ज्युन इलाइझ' या आणि यांसारख्याच इतर अनेक सुरेख लेखांनी वाचकांना तो जितका रंजक, तितकाच उदबोधक वाटेल, यात शंका नाही...

# 'रुचिरा'च्या पन्नासाव्या आवृत्तीच्या निमित्ताने.....






नमस्कार,

'रुचिरा'च्या पन्नासाव्या आवृत्तीच्या निमित्ताने ओगले कुटुंबिय आणि मेहतांचं अभिनंदन.

'रुचिरा' हे पुस्तक मेहतांकडे आल्यावर पहिल्या आवृत्तीपासून माझा या पुस्तकाशी संबंध आला. आज विशेष निमित्तानं कमलाबाईंची आठवण आली आणि मन भरून आलं, म्हणून थोडं बोलतो.

'मनातल्या मनात मांडे खाणं' ही म्हण मराठीत प्रचलित आहे. हा पदार्थ आता जवळजवळ नष्ट झाल्यासारखा असला, तरी मी मांडे मनातल्या मनात न खाता, खरोखरीचे, कमलाबाईंच्या हातचे, त्यांनीच पानात वाढलेली, त्यांच्यासमोर बसून खाल्लेत.

'रुचिरा'च्या पहिल्या आवृत्तीच्या पदार्थांची फोटोग्राफी मी आणि उदय बांदिवडेकर दोघांनी मिळून केली आहे. ते सगळेच्या सगळे पदार्थ कमलाबाईंनी दिवसरात्र खपून, स्वत:च्या हाताने तयार केलेत, या गोष्टीचा मी साक्षीदार आहे. मला आठवतंय हे फोटोग्राफीचं काम मी ओगलेंच्या सदाशिव पेठेतल्या घरी जाऊन आम्ही आठवडाभर रोज सकाळ, दुपार-संध्याकाळ, वेळ-काळ न पाहता ओगले कुटुंबियांना जास्तीत जास्त जेवढा त्रास देता येईल तेवढा त्रास देऊन केलेला आहे. एक प्रकारचा 'फूड फेस्टिव्हल' म्हणा ना!

'कमलाबाई ओगले फूड फेस्टिव्हल'!

भाऊ, म्हणजे प्रसन्नाचे वडील आणि प्रसन्नाची आई यांनादेखील आम्ही

लाइटिंगचे बाऊन्सर्स आणि छत्र्या धरायला भाग पाडलं. फोटो चांगले यावेत, पुस्तक चांगलं व्हावं व फोटोग्राफी संपल्यावर रात्री हे उत्तम उत्तम पदार्थ खायला मिळणार आहेत, याकडेच आमचा डोळा लागलेला असायचा. कमलाबाईंना जे सोईचे पडतील ते ते पदार्थ त्या एकेका दिवशी करायच्या. त्यामुळे पुडिंग, चित्रान्न किंवा चकली, डाळिंबी उसळ किंवा केशरी भात आणि सुरळीच्या वड्या आणखीन भिन्न प्रकारचे चार-पाच प्रकार असं काहीही कॉम्बिनेशन त्या त्या दिवशी व्हायचं. आम्ही फार आनंदानं ते खायचो. मला आठवतयं तेवढे सगळेच्या सगळे दिवस आम्ही एकदाही घरी जेवलो नव्हतो.

आणि त्यामुळेच की काय आमच्या घरी रुचिरामध्ये सांगितल्याप्रमाणं पदार्थांमध्ये 'वाटी चमच्याचं माप' ही पद्धत आणखी जोमानं सुरू राहिली.

इडली-वड्याची छोटी आठवण सांगतो आणि थांबतो. हे दाक्षिणात्य पदार्थ करताना पीठ आदल्या दिवशी भिजवून आंबवून ठेवावं लागतं. आदल्यादिवशी तशी थोडी तयारी करावी लागते. त्यामुळे आज करू, उद्या करू; असं करता करता शेवटच्या दिवसापर्यंत ते पीठ भिजवणं वगैरे कमलाबाईंकडून काही झालं नाही. फोटो काढण्याची वेळ आली तेव्हा कमलाबाई म्हणाल्या, "मी ते काही भिजवलं वगैरे नाही आणि मला आता मला पुरेसा कंटाळाही आलाय या सगळ्याचा ह्या दहा-बारा दिवसात. आणि अजून एक खरं सांगू का चंद्रमोहन, आपण कितीही केलं ना तरी हॉटेलमधल्यासारखा इडली-डोसा काही घरी होत नाही. चवीला चांगले होतात पण दिसायला जरा बेंगरूळच दिसतात आपले घरी केलेले डोसे. तेव्हा आपण सरळ शेजारच्या प्रीती हॉटेलमधून आणू. तुम्ही त्याची छान मांडणी करा आणि काढा सुंदर सुंदर फोटो." ...तर अशा ह्या 'प्रॅक्टिकल कमलाबाई!'

त्यांचं नाव निघालं, की आठवते ती त्यांची प्रसन्न मुद्रा आणि मुख्य म्हणजे आठवतो, पदार्थ करतानाचा त्यांचा तो कॉन्फिडन्स!!

अहो, छान-छान पदार्थ करताना, वाटी-चमच्याचं माप वापरताना, कॉन्फिडन्स लागतो, ऐऱ्यागैऱ्याचं काम नाही, ते!

आज बाजारात रोजच्या रोज स्वयंपाकावरची बेसुमार पुस्तकं येत असताना आणि टीव्हीवरच्या कुकरी शोजचा रात्रंदिवस भडिमार चालू असताना, घरातल्या किचन कॅबिनेटमध्ये ह्याचं कॉन्फिडन्समुळं दिमाखान मिरवतंय, ते कमलाबाई ओगल्यांचं 'रुचिरा'च!!!

सगळ्यांना शुभेच्छा, धन्यवाद.

**– चंद्रमोहन कुलकर्णी**

■

# ‘कमलाबाई ओगले’ पुरस्कारार्थींचा परिचय

## ★ अर्चना गोडबोले :

ग्लोबल वॉर्मिंग, पर्यावरण प्रदूषण हे शब्द आता आपल्याला नित्याचे झाले आहेत. पण प्रत्यक्षात हे सगळे थांबविण्यासाठी, पर्यावरण जतन करण्यासाठी प्रयत्न करणारे काही मोजकेच लोक आहेत. त्यातल्याच एक म्हणजे अर्चनाताई गोडबोले. Applied Enviornmental Resarch Foundation या संस्थेतर्फे गेली १८ वर्षे सातत्याने पश्चिम घाटातील जैवविविधता जतन करण्यासाठी प्रत्यक्ष काम करणाऱ्यांपैकी एक. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक संस्थांचे जाळे उभे करून त्यांच्यामार्फत पर्यावरण जतन आणि संवर्धन यासाठी सातत्याने प्रयत्नशील. ‘क्लिंटन ग्लोबल इनिशिएटिव्ह’ मधल्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधी म्हणून यांना बोलवण्यात आले होते. उत्तर पश्चिम घाटातील देवराईंचे जतन आणि संवर्धनासाठी केलेल्या कामासाठी त्यांना ‘व्हिटले असोसिएटेड ॲवॉर्ड २००७’ देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

## ★ अश्विनीताई कुलकर्णी :

अश्विनीताई आणि प्रगती अभियान हे एक अनोखे समीकरण आहे. ‘जे जे वंचित त्यांच्यासाठी संघटना हे सूत्र बनावे’ याच भावनेतून अश्विनीताईंनी प्रगती अभियानाची स्थापना केली.रोजगार हमी योजनेसंदर्भात ग्रामीण भागातील स्वयंसेवकांना मार्गदर्शन करण्याच्या कामातून अश्विनीताईंच्या कामाला सुरवात झाली आणि मग त्यांना त्यातल्या समस्या जाणवायला लागल्या आणि त्यातूनच प्रगती अभियानची निर्मिती झाली. प्रगती अभियानाच्या त्या संस्थापक सचिव आहेत. प्रगती अभियान माहितीचा अधिकार, रोजगार हमी योजना, कृषी विषयक योजना यासारख्या विविध विषयांवर काम करते. सध्या अश्विनीताई नाशिकमधील आदिवासी भागात काम करणाऱ्या वचन संस्थेच्या निर्देशक म्हणून काम करत आहेत. याशिवाय सेंटर फॉर डेव्हलपमेंट, रिसर्च आणि डॉक्युमेंटेशन, बायफ, महाराष्ट्र ऊर्जा विकास प्रधिकरण अशा विविध संस्थांशी जोडलेल्या आहेत. अनेक मान्यवर संस्थांच्या त्या मानद सदस्या आहेत. विविध विषयांवरचे त्यांचे शोधनिबंध प्रसिद्ध झालेले आहेत. अनेक वृत्तपत्रांतूनही त्या लिखाण करत असतात.

## ★ गौरी खवणेकर :

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता केवळ आंतरिक जिद्द व इच्छा यांच्या बळावर आपण या समाजाच देणं लागतो. या भावनेतून काम करणारे काही लोक असतात. ज्यांच्यामुळेच समाजव्यवस्था तग धरून उभी असते. असाच एक चेहरा म्हणजे गौरी खवणेकर. पोस्ट नानकुली, जि. रत्नागिरी, पेडणेकरवाडा हीच गौरीताईंची ओळख.

कोकणातल्या अतिशय दुर्गम भागात भगीरथ संस्थेची ही कार्यकर्ती विकासाची गंगा दारोदार पोचविण्यासाठी पाणी संवर्धनाचे आणि जतनाचे प्रयत्न करते आहे. कुठल्याही साधनसामुग्रीची शिक्षणाची त्यांना गरज नाही. गावातल्याच बायकांची मदत घेऊन नदीवर बंधारा घालणे, गाळ उपसणे यासारखी कामे करत गौरीताई अहोरात्र झटत असतात. पुरस्कारासंबंधी विचारणा करण्याकरिता गौरीताईंना फोन केला तेव्हा त्या म्हणाल्या, '' पुण्याला यायचं? पुरस्कार? कशासाठी? मी काय केलं?'' गौरीताईंचा तो नकारही मनाला भावला. वाटलं की गीतेतला निष्काम कर्मयोग याहून वेगळा नसावा.

## ★ चेतना सिन्हा :

अर्थ आणि बँकिंग क्षेत्रातलं अतिशय मान्यवर नाव. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, शेतीतज्ज्ञ असलेल्या चेतनाताई या देशातील पहिल्या ग्रामीण बँक माणदेशी सहकारी बँकेच्या संस्थापक आहेत. स्त्री ही घरची लक्ष्मी असते. पण या लक्ष्मीच्या हाती खऱ्या अर्थाने आर्थिक सत्ता यावी या उद्देशातून गरीब आणि दुष्काळप्रवण क्षेत्रातील सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी या बँकेची स्थापना केली आणि ग्रामीण भागातील महिलांना Micro-credit सुविधा देऊन देशाच्या भावी उद्योजिका घडवत आहेत. फेडरल रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर सल्लागार म्हणून चेतनाताईंचे मत विचारात घेते. ग्रामीण भागातील युवती व युवकांसाठी अनेक उपक्रमही संस्थेमार्फत चालविले जातात.

अर्थमंत्री पी. चिदंबरम् यांच्या हस्ते Social Enterprenear year 2013 या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. याशिवाय २००५ चा जानकीदेवी पुरस्कार, Yale University ची मानद फेलोशिप मिळाली आहे. इंदिरा गांधीनी १९८४ साली जाहीर लादलेल्या आणीबाणीच्या काळात जयप्रकाश नारायण विद्यार्थी चळवळीत सहभाग.

## ★ छाया कुलकर्णी :

आताच्या छाया कुलकर्णी. पूर्वीच्या छाया वैद्य..... लहानपणापासून छायाताईंना कमलाबाईंचा सहवास लाभला आणि त्यांनी कमलाबाईंच्या हाताखाली पाककलेचे धडे गिरवले. आता सध्या मुंबईत त्या केटरिंगचा व्यवसाय करतात.

## ★ प्रीती पाटील :

प्रीती पाटील या मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये केटरिंग अधिकारी म्हणून काम करतात. हे काम करत असतानाच तिथे वाया जाणारे अन्न पाहून या अन्नाचा कसा विधायक उपयोग करता येईल याचा विचार केला आणि B.Tech in Food Science & Catering Tech. केलेल्या प्रीतीताईंनी आपल्या ज्ञानाचा उपयोग करून गच्चीवर शेती फुलविली आणि आपल्या समविचारी मित्र-मैत्रिणीबरोबर त्यांनी याच कामासाठी Urban Leaves नावाची संस्था स्थापन केली. गच्चीवरच्या शेतात नारळ आंब्यापासून ते तांदळापर्यंतची सर्व पिके घेतली आणि इमारतींच्या जंगलात प्रीतीताईंनी हिरवाई निर्माण केली. डॉक्टर, इंजिनीअर, गृहिणी, वकील अशा क्षेत्राातील समविचारी मित्रांबरोबर प्रीतीताईंनी आतापर्यंत ५ कम्युनिटी गार्डन्स मुंबईमध्ये उभी केली आहेत. Urban Leaves तर्फे अनेक मार्गदर्शक उपक्रमही चालविले जातात. प्रीतीताई किचन गार्डनर्स इंटरनॅशनल या संस्थेच्या मानद सभासद आहेत.

## ★ भारती कन्हैयालाल ठाकूर :

हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. लेखिका, सामाजिक कार्यकर्ती, जंगल निरीक्षक, विविध साहसी मोहिमांची आवड असणारे व्यक्तिमत्व अशी भारतीताईंची विविध रूपे आहेत. भारतीताईंनी १५२ दिवसांची नर्मदा परिक्रमा केलेली आहे. या अनुभवांवर 'नर्मदा परिक्रमा : एक अंतर्यात्रा' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. हिंदी व ब्रेल भाषेतील आवृत्ती. 'पाऊल पुढे पडताना' या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार २०१२. विवेकानंद केंद्राचे काम त्यांनी केले आहे. या अंतर्गत कन्याकुमारी कार्यालय आसाम गोलाघाट विवेकानंद केंद्राची शाळा १९८८. केंद्र सरकारच्या सेवेतून २००३ साली स्वेच्छानिवृत्ती घेऊन आता त्या मध्यप्रदेश मंडलेश्वर येथे शाळा सोडून दिलेल्या मुलांसाठी Nimad Abhyuday Real Development Association हा प्रकल्प चालवितात. यात सुमारे १००० मुले ३१ शिक्षक, आणि ३ समन्वयकांचा सहभाग आहे.


याशिवाय नाशिक ते दिल्ली ही सायकलवरून केलेली मोहिम, कैलास पदभ्रमण यात्रा, सह्याद्री हिमालयातील अनेक गिर्यारोहण मोहिमा यातही त्यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय आहे.

## ★ सुचेता कडेठाणकर :

सुचेताताई गेली १० वर्षे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात Symentic Software India या कंपनीत Principal Information Developer म्हणून काम करत आहेत. तसेच २ वर्षांचा पत्रकारितेचा India Express group नामवंत वृत्तसमुहातला अनुभव. आशियातील गोबीचे वाळवंट पार करणारी पहिली महिला म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल. १६२६ किलोमीटरचा अतिशय खडतर शारीरिक व मानसिक क्षमतांची कसोटी पाहणारा हा प्रवास त्यांनी ५१ दिवसात पूर्ण केला. ९ देशातील १३ ट्रेकर्स यात सहभागी झाले होते त्यापैकी ७ जणांनी हा ट्रेक पूर्ण केला. सुचेताताई त्यातील एकमेव आशियाई महिला होत्या. सुचेताताई यांनी हिमालयातील अनेक ट्रेक केले आहेत. तसेच सह्याद्रीतील १५०शेहून आधिक मोहिमा केल्या आहेत. याशिवाय Enduro ३ ही १८० किलोमीटर सायकलिंग,८०किती ट्रेकिंग आणि नद्या पार करणे अशा विविध गोष्टींचा समावेश असलेली स्पर्धा ही त्यांनी जिंकली आहे. India Today या सुप्रसिद्ध नियतकालिकातर्फे दिला जाणारा Young Achiever Award तसेच हिरकणी पुरस्कार, लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस् असे अनेक विक्रम त्यांच्या नावे आहेत.

## ★ स्मिता गोडबोले :

स्मिताताई या व्यवसायाने वकील आहेत. वकीली करत असताना त्यांना विविध प्रकारच्या कौटुंबिक समस्या सोडविण्यात गुप्तहेर किती महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. याची जाणीव झाली आणि त्यांनी पूर्णत: गुप्तहेर व्यवसायात प्रवेश केला. पती-पत्नीतील संबंध, मुलांचे गैरवर्तन अशा विविध प्रकारच्या समस्या सोडविण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. याशिवाय त्यांनी संगीताचा डिप्लोमा पूर्ण केलेला आहे. आकाशवाणीवरील अनेक कार्यक्रमांमध्ये सहभाग. ■






## ✾ लीलावती भागवत यांचे निधन

ज्येष्ठ बालसाहित्यकार लीलावती भागवत (वय ९३) यांचे २४ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. ज्येष्ठ बालसाहित्यकार कै. भा. रा. भागवत यांच्या त्या पत्नी होत.

एमएनडीटी विद्यापीठातून त्यांनी १९४० साली पदवी संपादन केली. बालमित्र या मासिकामध्ये त्यांनी भा. रा. भागवत यांच्या समवेत काम केले. मराठी आणि हिंदी या भाषांवर प्रभुत्व असलेल्या लीलाताईंनी काही काळ शिक्षिका म्हणून काम केले. आकाशवाणी मुंबई केंद्रामध्ये त्यांनी वनिता मंडळ हा कार्यक्रम यशस्वी केला. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या उभारणीत योगदान देणाऱ्या लीलावती भागवत यांनी कऱ्हाड बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते.


## ✾ ज्येष्ठ रंगकर्मी विनय आपटे यांचे निधन



आपल्या तडफदार अभिनयाने मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत आपला ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते विनय आपटे (वय ६३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी वैजयंती आपटे, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. त्यांचा जन्म १७ जून १९५१ रोजी झाला. चतुरस्त्र आणि वेगळ्या जातकुळीचा अभिनेता म्हणून विनय आपटे यांची ओळख होती. सचिन खेडेकर, सुनील बर्वे यांच्यासह अनेक कलाकारांना व्यावसायिक रंगभूमीवर आणण्याचे धाडस त्यांनी केले होते. त्यांच्या अकाली निधनामुळे मराठी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

मराठी, हिंदी चित्रपट, मालिका आणि नाटक यामध्ये विनय आपटे यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. तडफदार आणि गंभीर अभिनयाने अनेकांना प्रेरणा दिली होती. सध्या स्टार प्रवाह या वाहिनीवरील 'दुर्वा' या मालिकेत ते काम करत होते. आपली मते अतिशय ठामपणे मांडण्यात त्यांचा हातखंडा होता.

### ✽ राष्ट्राध्यक्षांना हलवणारा कवी



'आय ॲम नीट हम्बल पर्सन ॲन्ड आय ॲम नॉट स्टुपिड; आय नो आय ॲम अ पोएट दॅट् हॅज अफक्टेड् धीस नेशन' असे सार्थ गौरवाने म्हणणारे इजिप्तचे क्रांतिदूत कवी अहमद फऊद नेग्म ऊर्फ अल फगूमी यांचे नुकतेच दीर्घ आजाराने कैरो येथे निधन झाले.

नेग्म वयाच्या सातव्या वर्षी अनाथ झाले. त्यांचं शिक्षणही फारसं झालं नव्हतं घरचीही पराकोटीची गरिबी होती. त्यांनी घरगुती कामगार म्हणून काम केलं. पण त्यांच्या कवितांनी मात्र माजी राष्ट्राध्यक्ष गामल अब्दुल मुबारक यांना चागलंच अडचणीत आणलं. त्यामुळे त्यांना एकंदरीत १८ वर्ष तुरुंगात काढावी लागली. पण त्यानी राजकीय नेत्यांवर कविता लिहिणं थांबवल नाही आणि आपली राजकीय भूमिकाही बदलली नाही. ते अतिशय कडक शब्दांत राजकीय नेत्यांवर टीका करत.

नेग्म 'लोकांचे कवी' म्हणून ओळखले जात. २०११मध्ये मुबारक यांच्या विरोधात लहरीर चौकात उतरलेल्या नागरिकांनी नेग्म यांच्या कवितेचं वाचन केलं होतं.

■

"मी असे मानतो की, चांगले प्रश्न मनाला पडणे हे उत्तरे मिळवण्यापेक्षाही महत्त्वाचे असते. उत्तम बालवाङ्मय नेहमीच आपल्या मनात प्रश्न उभे करते किंवा आपल्याला प्रश्न विचारण्यास भाग पाडते. अशा प्रकारे नव्याने पडणारे प्रश्न नक्कीच कुणाचे तरी भावविश्व समृद्ध करत असतात."

**– मेडेलेनीन ले ईगल**




# बालनगरी

## जादूचं तळं

भिवा सुताराला एकदा एक मोठ्ठा आरसा सखूताईंकडे पोहोचवायचा होता. आरसा खूपच मोठा होता. भिवाच्याच उंचीचा आणि जडही. त्यामुळे उचलून नेताना भिवाची खूपच दमछाक झाली. त्यातून रस्ता रानावनांतला, उंच-सखल. सखूताईंचं घर खूपच लांब. त्यामुळे जंगलाच्या मध्यावर पोहोचेपर्यंतच भिवा खूप दमला. थोडी विश्रांती घ्यावी म्हणून त्यानं आरसा जमिनीवर ठेवला. तिथलं गवत आणि इतर रानटी झाडांच्या मधोमध, आणि स्वत: एका मोठ्या चिंचेच्या झाडाला टेकून बसला. बसला कसला, दमल्यानं त्याला झोपच लागली.

चिंगू आणि मंगू ही दोन माकडं तिथून येत होती. कशातही नाक खुपसणं हेच काम होतं त्यांचं. त्यामुळे कुठल्याही गोष्टीचा त्यांना सर्वांआधी पत्ता लागायचा. साहजिकच जंगलाच्या मधोमध हे काय चकचकीत असं वाटून ती तिकडे धावली.



"हे बघ काय ते! नवं तळं!" चिंगू म्हणाला.

"छान छान, चमकदार तळं!" मंगू म्हणाला. खरंच आरसा एखाद्या स्वच्छ पाण्याच्या तळ्यासारखाच दिसत होता. वरच्या निळ्या आकाशाचं, हिरवट काळ्या झाडांचं, पोपटी गवताचं प्रतिबिंब त्यात पडलं होतं.

"अचानक हे तळं इथं कसं आलं

बुवा?'' चिंगू म्हणाला. पण वेगळंच आहे हे. छोटंसं पण मस्त.''

''खरं तर एवढ्यात पाऊसही पडलेला नाहीय. मला कळत नाही कसं ते! हे एखादं जादूचं तळं असेल का रे?''

''असेलसुद्धा.'' मंगू.

''मंगू, आपण त्यातलं पाणी पिऊ या थोडं? एखादवेळी आपण मागू ते देईल ते!''

''पण ते कुणाच्या मालकीचं असलं तर?''

''तरी काय झालं? पाणी प्यायलेलं कुणाला कळणार आहे? चल. ओंजळीत येईल तेवढं पिऊ. त्याचवेळी आपल्याला हवं असेल ते मागायचं.''

''चिंगूचा हात आरशापर्यंत गेला. अर्थात पाण्याबदली त्याला तळ्याचा पृष्ठभाग टणक लागला. तो थक्कच झाला. नितळ पाणी तिथं नव्हतंच.


''अरे, तळं थिजून बर्फ झालंय. बघ. पाणी नाहीच राहिलेलं. फक्त बर्फ!'' तो म्हणाला.

''म्हणजेच ते जादूचं तळं आहे.'' इति मंगू. ''कळलं? गरम हवेत नाहीतर तळं थिजेल कधी? शक्यच नाही.''

''बरोबर आहे तुझं. गरम वातावरणात तळं थिजलं तर ती जादूच असणार. ज्याचं कुणाचं ते असेल त्यानं हे मुद्दामच केलं असणार. कोणी पाणी पिऊ नये म्हणून.''

''तरी आपण त्याला बनवू शकतो.'' मंगू कुजबुजला. आपण बर्फ फोडू आणि पाणी पिऊ. हो की नाही?''

''होय रे होय. चल चल. कोणी इकडे यायच्या आत बर्फ फोडून पाणी पिऊन टाकू पटकन्.'' चिंगू म्हणाला.



आणि दोघांनी दोन दगड घेऊन आरशावर जोरात मारले. 'खळ्ळ्' आरश्याचे तुकडे तुकडे झाले. पण चिंगू मंगूला आश्चर्य वाटलं ते त्याखाली पाणी नव्हतं याचंच.

''कमाल आहे! कुणाला तरी जाऊन हे सांगायलाच हवं,'' मंगू म्हणाला

आणि त्यांना झोपेतून उठलेला भिवा दिसला. ते त्याच्याकडे धावले.

''अहो, शुक् शुक् इकडे नं जादूचं तळं आहे.''

''आम्हांला कळलं ते जादूचं आहे ते. कारण ते थिजून कडक झालंय.''

''म्हणून आम्ही बर्फ फोडला. खालचं गार पाणी पिता यावं म्हणून. पण खाली पाणीच नव्हतं थेंबभरसुद्धा. तुम्ही पाहिली होती अशी जादू?''

''काय बोलताय तुम्ही मूर्खासारखं?'' भिवा चिडून म्हणाला.

या दोन्ही आगाऊ माकडांना तो चांगलाच ओळखत होता आणि ज्यात त्यात नाक खुपसायची त्यांची सवयही त्याला ठाऊक होती.

''जादूचं तळं म्हणे! आणि तेही थिजलेलं. अगदी बर्फ झालेलं, या अशा गरम हवेत! आचरट नाहीतर!''

चिंगू-मंगू त्याला तळ्यापाशी घेऊन गेले. भिवानं आरसा फुटलेला पाहिला आणि तो अवाक् झाला.

''अरे देवा! माझा आरसा! तो मी सखूताईंना विकत देणार होतो. चांडाळांनो काय केलंत तुम्ही? जिथं-तिथं अडमडायची तुमची सवय कधी जाणार? इतका मोठा-सुंदर आरसा. आता त्याची किंमत भरून द्या. काय वाटेल ते करून. नाहीतर जीव घेईन मी तुमचा,'' भिवा संतापानं किंचाळला.

चिंगू-मंगूनं पळण्याचा प्रयत्न केला पण भिवानं दोघांची मानगूट गच्च पकडली होती. ते चांगलेच घाबरले होते. भिवाकडे पाहून रडत चिंगू म्हणाला, ''पैसे नाहीत आमच्याकडे, पण हे एक कडं आहे. ते घेऊन आम्हाला सोडा. पुन्हा नाही असं करणार?''

भिवानं कडं पाहिलं. ते होतं सोन्याचं. सूरजमल व्यापाऱ्याकडे वितळवायला दिलं तर तो याचे सहज हजार रुपये देईल. तो एकदम हसला आणि चिंगूमंगूला म्हणाला, ''ठीक आहे. आत्ता मी तुम्हाला सोडतो. पण पुन्हा असं कराल तर माझ्याशी गाठ आहे. लक्षात ठेवा.'' आणि त्याने चिंगूमंगूच्या माना सोडल्या. त्यासरशी दोघांनी धूम ठोकली.


''कुठलं रे ते कडं?'' मंगूनं विचारलं.

''त्यादिवशी नाही का यमूताईच्या खिडकीत हात घालून घेतलं होतं? तेच ते!''

■

**४ थी आवृत्ती**

# व्हाय मेन डोन्ट लिसन अँण्ड विमेन कान्ट रीड मॅप्स




**बार्बरा आणि ॲलन पीस**

अनुवाद
**ॲड शुभदा विद्वांस**

**किंमत : १४०/-रु.**
**पोस्टेज :३०/-रु.**

स्त्री व पुरुष यांच्यातील नातेसंबंध बिघडतात याचे कारण म्हणजे पुरुषांना हे समजत नाही की बायका त्यांच्यासारखे का नाहीत; आणि बायकांना वाटते की आपण जसे करतो तसे पुरुष का करत नाहीत.

याचे कारण म्हणजे स्त्री व पुरुष वेगळे आहेत. ते समान पेशींपासून बनलेले आहेत, एवढी एकच गोष्ट त्यांच्यात समान आहे. पण हे दोघे वेगवेगळ्या जगात रमतात त्यांची मूल्ये वेगवेगळी असतात. पण फारच थोडे पुरुष हे मान्य करतात.

एक सामान्य गोष्ट अशी की, स्त्री व पुरुष कुठल्याही धर्माचे, पंथाचे, वर्गाचे असले तरी त्यांचे दृष्टिकोन व विश्वास सारखेच असतात.

# ओळखा पाहू

**जानेवारी २०१४ मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष**



..........................

विजेत्यास कोणत्याही पुस्तकाच्या खरेदीवर आकर्षक सवलत देण्यात येईल. ही सवलत फक्त एका खरेदीसाठी राहील.

आपली उत्तरे दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल मार्च २०१४ च्या अंकात जाहीर होईल.

**: उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे - ४११०३०.

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची वाचकांसाठी सुवर्णसंधी...**

पुणे आणि कोल्हापूर कार्यालयापासून ७ कि. मी. पर्यंतच्या अंतरावर कॅश ऑन डिलिव्हरीची सुविधा!

**५००/- रुपये किंवा अधिकच्या खरेदीवरील पुस्तके कॅश ऑन डिलिव्हरीच्या माध्यमातून आपल्याला घरपोच मिळू शकतात. त्यासाठी वर्गणी मनीआर्डर/डिमांड ड्राफ्टद्वारा कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. अथवा एस. बी. आयच्या खात्यातही पैसे भरता येतील.**

STATE BANK OF INDIA
SBIN0000455 A/C NO 32749992008

ऑनलाईन वाचकांसाठी सुवर्णसंधी

# मेहता मराठी ग्रंथजगत

## Digital Edition

DIGITAL EDITION

### मेहता मराठी ग्रंथजगत चा अंक आता डिजीटल स्वरूपात

- इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्यामुळे हवा तिथे पाहू शकता.
- तुमच्या मोबाईलवरही वाचू शकता.
- वाचण्यासाठी मेहता पब्लिशिंग हाऊस ॲप मार्केटमध्ये मोफत उपलब्ध.
- ही आवृत्ती संपूर्ण रंगीत स्वरूपात.

**आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत**

| एक वर्षाला | तीन वर्षांना | पाच वर्षांना |
|---|---|---|
| २०% | २५% | ३०% |

| १ वर्षाची वर्गणी | ३ वर्षांची वर्गणी | ५ वर्षांची वर्गणी |
|---|---|---|
| ₹१०० | ₹३०० | ₹४०० |


**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.**

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.: PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 Jan.2014 Posting Date : 11 Jan.2014

## आगामी




मूळ लेखक

**ख्रिस्तोफर रिच**

अनुवाद

**दीपक कुळकर्णी**

# रुल्स ऑफ डिसेप्शन्स

सी.आय.ए. आणि डिव्हिजन या दोन अमेरिकी गुप्तचर संघटनांतील स्पर्धेचे रूपांतर इराण-इस्रायल युद्धात झाले. यामध्ये विमान हल्ले थोपविण्यासाठी जीवाची बाजी लावणारे अधिकारी यांची चित्तथरारक संघर्ष कथा.

डॉक्टर जोनाथन रॅन्सम आणि त्याची लावण्यवती पत्नी एम्मा, गिर्यारोहण करण्यासाठी आल्प्स पर्वतात गेलेले असतात. अचानक आलेल्या एका हिमवादळात ते दोघेही सापडतात; आणि त्यात एम्माचा मृत्यू होतो...

एम्माच्या मृत्यूनंतर जोनाथनच्या हातात एक पाकीट पडते. त्यात त्याला एम्माने इतके वर्षे त्याच्यापासून दडवून ठेवलेले, एक महाभयानक सत्य कळते...

ते सत्य म्हणजे; अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची, आंतरराष्ट्रीय दहशतवादाची व गुप्तहेरांची गुन्हेगारी दुनिया – अशी दुनिया की, जिथे प्रत्येक चेहऱ्याआड आणखी एक चेहरा लपलेला असतो. जिथे फक्त साध्य महत्त्वाचे असते, साधनांबद्दल कसलाही विधिनिषेध नसतो!

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.